# माणूस

शनिवार । २२ जानेवारी १९७७ । साठ पैसे


मागास वर्गातील मुलांच्या
I. Q. मध्ये काही उणेपणा नसून,
त्यांचे पर्यावरण ( वातावरण )
आजच्या शालेय शिक्षणाला
अनुकूल नसते व ही उणीव
भरून काढायला आपला
अध्यापकवर्ग उणा पडतो.
त्यामुळे ती मागे पडतात–

□

–श्री. रामानंद सिन्हा
–गीता साने

## साप्ताहिक माणूस

वर्ष सोळावे – अंक चौतिसावा

२२ जानेवारी १९७७

मूल्य : साठ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४३४५९

¤


# मागास वर्ग आणि सवलती

गीता साने

भारतीय संविधानाप्रमाणे मागास वर्गांना बऱ्याच सवलती मिळतात व त्यांतहि शिक्षण–क्षेत्रांत त्यांचे प्रमाण अधिक आहे. ह्या सवलतींबद्दल वृत्तपत्रांमधून अधून–मधून वादळी चर्चा चालू असतात. मागास गटांमधून येणारी मंडळी, सवलतींना लायक नसतात हा एक नेहमी उपस्थित होणारा मुद्दा. शिक्षण–क्षेत्रांत वरील गटाच्या मुलांवर होणारा खर्च अनाठायीच समजण्यात येतो.

अशा चर्चांमध्ये वस्तुस्थितीचे भान राखणे आवश्यक असते व ते भान सुटल्यास, चर्चेला वितंडेचे स्वरूप येऊ लागते; म्हणून वरील मुद्याच्या संदर्भात मला मिळालेला, एक नवा व अनपेक्षित पुरावा, त्याबरोबरच ऐकलेल्या दृष्टिकोणासह येथे नमूद करीत आहे. पुरावा देणारे गृहस्थ श्री. रामानंद सिन्हा, निवृत्त आय. ए. एस्; ह्यांचा शासन व शिक्षण ह्या क्षेत्रामधला अधिकार मोठा असून, जॉब ओरिएंटेड कमिटीचे चेअरमन ह्या नात्याने त्यांनी लिहिलेला अहवाल अत्यंत महत्त्वाचा आहे. निवृत्तीनंतर श्री. सिन्हा, धनबादचे पाटलीपुत्र व जमशेदपूरचे गांधी मेमोरियल, ह्या दोन मेडिकल कॉलेजच्या बोर्डांचे अध्यक्ष ह्या नात्याने ह्या खाजगी कॉलेजांच्या विकासाठी महत्त्वाचे कार्य करीत आहेत. ते स्वत: उच्च जातीचे व सत्ताधारी वर्गातील असल्याने, त्यांची दृष्टी मागास गटाबद्दल, वृथा अभिमानाची किंवा पूर्वग्रह विनिश्चित आहे, असे म्हणण्यास वाव नाही.

श्री. सिन्हांचे मत, मागास गटांना मिळणाऱ्या सवलती जेव्हा फुकट जातात तेव्हा त्याला कारण आपण असतो, असे आहे. आपले म्हणणे विशद करताना, त्यांनी आपले खालील अनुभव व निरीक्षण सांगितले.

बिहार राज्यामधली, नेत्रहाटचे सरकारी, रांचीचे सेंट जॉन व जमशेदपूरचे के. एम्. पी. एच ही तीन हायस्कूल्स अग्रगण्य समजली जातात. त्यापैकी नेत्रहाटचे हायस्कूल, पब्लिक स्कूलच्या धर्तीवर असून दरवर्षी प्रवेश परीक्षा घेऊन निवडक विद्यार्थ्यांनाच तेथे प्रवेश मिळतो. बहुतेक विद्यार्थी वरच्या थरातून आलेले असतात व अपेक्षेप्रमाणे, सेकंडरी बोर्डाचा त्यांचा निकालही उत्कृष्ट असतो.

बाकीची दोन हायस्कूल्स मिशनरी चालवतात व तेथे प्रवेश देताना निवडीचा निकष लावीत नाहीत व सेंट जॉनमध्ये शेकडा सत्तर विद्यार्थी आदिवासी असतात. वरील दोन्ही शाळा नावाजलेल्या असून, बोर्डाचे निकाल शेकडा २८ असताना सेंट जॉनचे निकाल शेकडा ७० लागलेले आहेत. त्या शाळेतून पहिल्या वर्गात येणारांची संख्या बरीच असून त्यापैकी अर्धे–अधिक विद्यार्थी आदिवासी असतात. के. एम्. पी. एच. हायस्कूलचे आकडे त्यांनी दिले नाहीत; पण ह्या शाळेत आदिवासी मुलांचे प्रमाण मोठं असून त्यांचे निकालहि चांगले असतात.

असाच अनुभव आणखी एका भागातील शाळांमधून आल्याचे श्री. सिन्हांनी सांगितले. नेत्रहाटजवळच, तेथील डोंगराळ दुर्गम प्रदेशात, महुआडार गाव वसलेले आहे. व हा सर्व प्रदेश आदिवासींचा आहे. महुआडार येथे एक मुलींचे व एक मुलांचे अशी दोन मिशनरी हायस्कूल्स असून, तिसरे हायस्कूल बिहार सरकारच्या आदिवासी कल्याण खात्याचे आहे. मिशन शाळांचा मुख्याध्यापक एक जर्मन इंजिनीयर मिशनरी असून त्याने बी. ए. बी. टी. पर्यंतचे शिक्षण भारतात आल्यावर घेतले आहे. ह्या मिशनरीने जर्मनीत देणग्या मिळवून आपल्या शाळांसाठी एक वर्कशॉप व एक प्रयोगशाळा उभारलेली आहेत. महुआडारला, स्वातंत्र्यकाळात एक प्रयोग म्हणून स्कूल–कॉम्प्लेक्स स्थापन करण्यात आला; म्हणजे महुआडार आंचलचे तीन भाग करून एकेका भागातील मिडल स्कूल्स एकेका हायस्कूलला जोडण्यात आली; व प्रत्येक मिडल स्कूलला त्याच्या भोव-

तालच्या प्राथमिक शाळा जोडण्यात आल्या. महुआडारची तीनही हायस्कूल्स, मिशनरी शाळांचे वर्कशॉप व प्रयोगशाळा आळीपाळीने व नियमित वापरतात. मिडल स्कूलसना आठवड्यातून एक दिवस येथे काम करण्याची संधी मिळते. ह्या स्कूल-कॉम्प्लेक्सची स्वतःची एक समिती असून हायस्कूलचे मुख्याध्यापक आळीपाळीनें तिचे सभापती व सर्व मिडल स्कूलसचे मुख्याध्यापक तिचे सदस्य असतात. आठवी वर्गाची परीक्षा ही समिती घेते. त्या परीक्षेत मिशनमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा निकाल सरकारी शाळेतील विद्यार्थ्यांपेक्षा पुष्कळच चांगला असतो.

श्री. सिन्हांच्या मते, मिशनरी शाळांमध्ये अध्यापक वर्ग कसून मेहनत करतो व विद्यार्थ्यांकडून करवितो. त्यामुळे त्यांच्या शाळेमधले आदिवासी विद्यार्थीही इतर मुलांच्या तोडीचे गुण मिळवू शकतात.

अध्यापक वर्गाने मुलांकडे लक्ष दिल्यास, त्याचा परिणाम त्यांच्यावर फार अनुकूल होतो. असा माझाही अनुभव आहे. धनबादच्या औद्योगिक क्षेत्राची वस्ती अखिल भारतीय स्वरूपाची सरमिसळ आहे व हा जिल्हा सीमेवर असल्याने शेजारच्या प्रगत राज्यातील नागरिकांचे प्रमाण त्यांत भरपूर आहे.धनबादला पूर्वी मुलींच्या सरकारी शाळा नसल्याने, वरील प्रगत नागरिकांनी आपल्या मुलींसाठी एक शाळा स्थापन केली. व तेथे त्या मुलींना मातृभाषेत शिक्षण मिळू लागले. पुढे त्याच शाळेत इतर भाषिक मुलीसाठी हिंदी वर्ग उघडण्यात आले. १९५६ मध्ये मुख्याध्यापिका म्हणून मी ह्या हायस्कूलमध्ये काम करू लागले तेव्हा शाळेचा हिंदी विभाग उपेक्षित होता. त्याचे निकाल बेताचेच असत व त्या विभागाच्या मुलींच्या I. Q. कमीच असतो असा अध्यापिकांचा प्रामाणिक समज होता. हे चित्र दोन वर्षात बदलले. शाळेच्या निकालात प्रथम श्रेणीचे प्रमाण दोन्ही गटांत वाढले व हिंदी विभागातील मुलींना तर दुसऱ्या विभागातील मुलींच्या तोडीच्या प्रथम श्रेणी व त्यांच्या तोडीची, टक्केवारी यशात मिळू लागली.

शाळेचा अध्यापक वर्ग कसून मेहनत करीत नसल्याने, महाराष्ट्रात 'Classes'चे पीक आलेले आहे तर बिहारमध्ये प्रत्येक मुलाला खाजगी शिकवणी अटळ झालेली आहे. गरीब विद्यार्थ्यांना शिकवण्या किंवा क्लासेस परवडत नाहीत. प्रगत वर्गातील मुलांच्या घरातील वातावरण, भाषा, इत्यादी शिक्षणाला पोषक असतात; मागास वर्गातील मुलांना ह्या संधीहि उपलब्ध नसतात.मागासवर्गातील मुलांच्या I. Q. मध्ये काही उणेपणा नसून, त्यांचे पर्यावरण, आजच्या शालेय शिक्षणाला अनुकूल नसते, व ही उणीव भरून काढायला आपला अध्यापक-वर्ग उणा पडतो. त्यामुळे ती मुले मागे पडतात.

गेल्या पंचवीस-तीस वर्षांत भारत सरकारच्या विविध खात्यात घेण्यात आलेल्या अस्पृश्य अधिकाऱ्यात महारांचे प्रमाण बरेच असे, त्याचे कारणही डॉ. आंबेडकरांचे सिद्धार्थ कॉलेज असेल का ?

शिक्षण-क्षेत्रात हेळसांड, विद्यार्थ्याला जन्मभर नडत असते. ही हेळसांड अशीच चालत राहिली तर आत्मोद्धारासाठी हा वर्ग विदेशी मिशनऱ्यांकडे वळणे अपरिहार्य आहे, व हे पाऊल त्यांच्या कल्याणाचे आहे. हे आपल्याला मान्य करावे लागेल. तेव्हा उपेक्षित वर्ग सवलतीचा उपयोग करू शकत नाही. तेव्हा त्या सवलती काढून घ्याव्यात, असे म्हणण्याऐवजी, त्या सवलती वस्तुतः त्यांना उपयोगी कशा पडतील, त्या सवलतीचा उपयोग ते वास्तवात कसा घेऊ शकतील ह्याचा विचार करणे आज जास्त जरूरी आहे. □

# महाराष्ट्र राज्यांतील मागासवर्गीय जाती-जमातींसाठी उपलब्ध असलेल्या कल्याणकारी योजनांची माहिती

**१ : विद्यार्थ्यांसाठी शिकवणी-फी, परीक्षा-फी आणि शिष्यवृत्त्या :** मागास वर्गातील पूर्व शालान्त विद्यार्थ्यांसाठी सक्तीच्या फीची भरपाई करण्याची तसेच परीक्षा-प्रवेश फी भरण्याची तजवीज या योजनेत आहे. अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देखील दिल्या जातात. राज्य सरकारच्या शिक्षण, क्रीडा व समाज कल्याणकारी खात्याच्या ठरावानुसार (क्र. १०६८/८३५६७-जे दि. २४-१२-१९७०) सरकारने असे आदेश दिले आहेत की निरनिराळ्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार या शिष्यवृत्त्या दिल्या जाव्यात.

**२ : माध्यमिक शिक्षणोत्तर शिष्यवृत्त्या :** उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रु. २७ ते ७५ पर्यंत भिन्न-भिन्न दराने शिष्यवृत्त्या देण्यात येतात. तसेच शिकवणी फी, परीक्षा फी यांचीही सोय होऊ शकते. मात्र त्यासाठी विद्यार्थ्याने मागील वर्षाची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक असते. वैद्यकीय आणि इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना मात्र एक अपवाद माफ करण्यात येते.

**३ : बालवाड्यांसाठी आर्थिक सहाय्य :** इच्छिक संघटना तसेच महिला मंडळांनी चालवलेल्या बालवाड्यांना मान्यप्रत बाबींवर झालेल्या खर्चाच्या ९० टक्के आर्थिक सहाय्य दिले जाते. सर्व जाती-जमातींच्या मुलांना प्रवेश देण्यासाठी या बालवाड्यांना प्रोत्साहन दिले जाते. अशा एकूण १८० बालवाड्या आहेत.

**४ : आश्रमशाळा :** अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीतील विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळांची सोय आहे. यांत वसतीगृहाची सोय असते व कारागिरी, शेतकी आणि इतर औद्योगिक प्रशिक्षण दिले जाते. अशा तऱ्हेच्या ६९ आश्रमशाळा राज्यात आहेत.

५ : अभ्यासगृहे : मागास वर्गातील विद्यार्थ्यांना जागेच्या अडचणींमुळे घरी अभ्यास करणे गैरसोयीचे असते. म्हणून अशी अभ्यासगृहे चालविण्यासाठी सरकार ऐच्छिक संघटनांना आर्थिक सहाय्य देते. अशा अभ्यासगृहामध्ये फर्निचर व दिवाबत्तीची व्यवस्था केलेली असते. अशी एकूण ४ अभ्यासगृहे महाराष्ट्र राज्यात आहेत.

६ : सुधारित शेतकी साधनाचा प्रसार : मागास वर्गीय शेतकऱ्यांना लोखंडी नांगर व अन्य शेतकी अवजारे खरीदण्यासाठी आर्थिक मदत दिली जाते. ती ६२॥ टक्के कर्ज व ३७॥ टक्के मदतीच्या रूपांत अशा प्रमाणात असते.

७ : तेल पंपाचा पुरवठा : अर्धविकसित ग्रामीण भागांतील शेतकऱ्यांना त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी पुढीलप्रमाणे आर्थिक परिस्थितीसाठी पुढीलप्रमाणे आर्थिक मदत केली जाते. : अ) पंपाच्या किमतीचा तिसरा हिस्सा इतकी रक्कम व्याजमुक्त कर्ज म्हणून दिली जाते. ब) दोन–तृतियांश रक्कम मदत म्हणून दिली जाते.

८ : मिश्र सहकारी संस्थांमध्ये शेअर–भांडवलाची गुंतवणूक : आर्थिक दुरावस्थेमुळे मागास वर्गीय लोकांना सहकारी संस्थेचे सभासद बनणे कठीण जाते. सभासद होऊ इच्छिणाऱ्यांना शेअर्सच्या पूर्ण किंमतीएवढे कर्ज दिले जाते. या कर्जाला १०० रुपयांची मर्यादा असून ते ५ वर्षात वसूल केले जाते.

९ : जमीन सुधारणा : सामान्यतः गरीब मागासवर्गीय लोक जमीन सुधारण्यासाठी पैसा खर्च करू शकत नाहीत. म्हणून त्यांना २५ टक्के मदत व ७५ टक्के व्याजमुक्त कर्ज, जमीन सारखी करणे, बांध घालणे, तण काढणे अशा तऱ्हेच्या कामासाठी मिळू शकते. अशी मदत प्रत्येक व्यक्तीला ५०० रुपयापर्यंत मिळू शकते, व कर्ज १५ वर्षापर्यंत फेडायचे असते.

१० : विहिरी खोदणे : या योजनेखाली (अ) नवीन विहिरी खोदणे व (ब) जुन्या विहिरींची दुरुस्ती करणे या कामासाठी आर्थिक मदत दिली जाते. नवीन विहिरीसाठी २००० रुपयापर्यंत व्याजमुक्त कर्ज दिले जाते. जे ४००० पर्यंत वाढवता येते, आणि जुन्या विहिरींच्या दुरुस्तीसाठी १००० रुपयांचे कर्ज मिळते–ते २००० पर्यंत वाढवता येते.

एकूण खर्चाच्या ३० टक्के किंवा रुपये ५००, यापैकी जी कमी असेल इतकी रक्कम कर्जाच्या परतफेडीपोटी (मदत) म्हणून नवीन बांधताना दिली जाते. कर्ज तीन हप्त्यांत दिले जाते व १० हप्त्यांत वसूल केले जाते.

११ : कुटिरद्योग व व्यवसायासाठी कर्ज आणि मदत : यासाठी ५०० रुपयापर्यंत रक्कम सहाय्य म्हणून मिळू शकते. त्यातील २५ टक्के मदत व ७५ टक्के व्याजमुक्त कर्ज असते. वैद्यकीय व्यवसायासाठी १००० रुपयापर्यंत सहाय्य मिळते, त्यापैकी रु. १२५–०० मदतरूप असतात.

१२ : मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी झगडणाऱ्या ऐच्छिक संघटनांना अनुदाने : मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या संघटनांना त्यांच्या एकूण ७५ टक्के अनुदान मिळू शकते.

१३ : वैद्यकीय मदत देणाऱ्या ऐच्छिक संघटनांना अनुदाने : आदिवासींसाठी वैद्यकीय मदत करणाऱ्या ऐच्छिक संघटनांना अनुदाने दिली जातात. औषधांचा, पेशंटसच्या जाण्या-येण्याचा, चष्मे व दाताच्या कवळ्या आदी बाबीवर होणारा खर्च दिला जातो. तसेच वैद्यकीय साधनांची किंमतही भरून दिली जाते.

१४ : पालेमोड : पावसाळी मोसमांत आदिवासी शेतकरी पैशाअभावी कठीण अवस्थेत असतात. जमीन मालक व सावकार याचा गैरफायदा उठवतात. पैशांच्या अथवा वस्तूंच्या रूपाने कर्ज देऊन ते अवाजवी दराने व्याज आकारतात. अशा समाजकंटकांच्या तावडीतून या जमातींची मुक्तता करण्याचे दृष्टीने सरकारने एक योजना आखली आहे. या योजनेनुसार या शेतकऱ्यांना गरजेच्या काळात ७॥ टक्के दराने २५० रुपयांपर्यंत कर्ज दिले जाते. त्याची परतफेड पीक आल्यानंतर पैशाने अथवा मालाने करायची असते. ☐


☆ ☆

दुसऱ्या आवृत्तीच्या
वाटेवर असलेली

राजहंस प्रकाशने

☐ सांगत्ये ऐका
हंसा वाडकर
(तिसरी आवृत्ती)

☐ टॉलस्टॉय
एक माणूस
सुमती देवस्थळे

☐ श्रीग्रामायन
श्री. ग. माजगावकर

☐ शतपावली
रवींद्र पिंगे

☐ पुरंदऱ्यांची दौलत

☐ पुरंदऱ्यांची नौबत
ब. मो. पुरंदरे

☆ ☆

## मुक्काम पुणे

मुकुंद मणूरकर

# तुमचा खेळ होतो, पण—

ही एक छोटीशी हकीकत आहे. वाटलं तर हीला अन्यायाचा एक सुरेखसा प्रकार समजा, किंवा लहान मुलांचं भावविश्व निर्दयपणे फोडून टाकण्यांचा खुनशीपणा म्हणा किंवा पुढील आयुष्यात वारंवार होणारे अन्याय सहन करण्यासाठी मन घट्ट व्हावे म्हणून छोटयांना मोठयांनी पाजलेला बालामृताचा डोस समजा.

आठ-नऊ वर्षांच्या या मुली. प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या. लोकनृत्याच्या स्पर्धेसाठी जमल्यात त्या. इतर अनेक शाळाप्रमाणे यांनीही आपलं नृत्य सादर केलंय्. नृत्य बऱ्यापैकी जमूनही गेलंय्. आता थोडयाच वेळात परीक्षकांकडून जाहीर होणाऱ्या निर्णयासाठी त्या धडधडत्या अंतःकरणाने बसल्या आहेत. परीक्षक निर्णय सांगू लागले, पहिला नंबर झाला. दुसरा नंबर झाला. तिसरंही नाव पुकारलं गेलं. पण अजून यांच्या नावाचा काही पत्ताच नाही. आता एक शेवटचा चौथा नंबर राहिलाय. तो मिळाला तर दुसऱ्या दिवशी होणाऱ्या अंतिम फेरीत यांना नृत्य करण्याची संधी मिळणार आहे. या छोटया छोटया पोरींचे प्राण अगदी कानाशी आलेत. आणि काय आश्चर्य! चौथा नंबर यांनाच दिला गेला. मग काय आनंदी आनंद. क्षणापूर्वीच्या उत्सुकतेची जागा आता चौफेर आनंदाने घेतली. अक्षरशः उधळून गेल्या त्या.

मुलींप्रमाणेच मुलींच्या नृत्यशिक्षका, मुलींचे पालक, शाळेतील इतर शिक्षक-शिक्षिका यांनाही आनंदाचं भरतं आलं. चौथा नंबर का होईना, अशा तऱ्हेचं यश शाळेला बऱ्याच दिवसांनी मिळालं होतं. सर्वांचे चेहरे एकंदरीत प्रफुल्लित. या छोटया मुलींना एकत्र जमवून गेला महिनाभर केलेल्या मेहनतीला शेवटी यश मिळालं होतं तर. मोठया समाधानाने आणि दुसऱ्या दिवशीच्या नृत्यासंबंधी भल्या मोठमोठ्या अपेक्षांची चित्रे रंगवीत या छोटया आपापल्या घरी गेल्या.

दुसऱ्या दिवशी सकाळी रीहर्सलला या पुन्हा शाळेत जमल्या. चिवचिवाट करत आपल्या कामात गर्क झालेल्या असतानाच शाळेचा टेलिफोन खणखणला. आणि ती चमत्कारीक बातमी ऐकू आली. पलिकडून प्राथमिक शिक्षक संघाच्या चिटणीस असलेल्या कुणी एक बाई बोलत होत्या. 'काल तुमच्या शाळेला जो नंबर मिळालाय ना तो चुकीचा होता. तुमचा मुळी नंबर आलेलाच नाही. तुमच्यापेक्षा जास्त मार्कस् नू. म. वि. ला मिळालेत.' आणि नंतर अत्यंत कोरडया स्वरात त्यांनी सांगितलं की आता काही तुमच्या मुलींना आज संध्याकाळी नाचासाठी आणू नका. सर्वांचीच तोंडे खाडकन् उतरली. छोटया पोरींचं तर काही विचारायलाच नको. काही ओरडल्या. काही मुसमुसल्या. तर काही रडल्यासुद्धा. आदल्या दिवशीचं कौतुक, आखलेले बेत मातीमोल झाले.

पण नुसतं बसून चालण्यासारखं नव्हतं. काही हालचाल करायलाच पाहिजे. आदल्या दिवशी जाहीर झालेला निकाल आता चुकला कसा? मग परीक्षकाकडे मोर्चा. परीक्षक म्हणजे दर्दी मंडळीच होती. कृष्णदेव मुळगुंद, सुचेता जोशी व प्रभा मराठे, पैकी मुळगुंद व सुचेता जोशींनी निसंधिग्ध शब्दांत सांगितलं की आम्ही तुम्हालाच नंबर दिलेला होता. नू. म. वि. चे मार्कस् तुमच्यापेक्षा कमीच आहेत. इतकंच नव्हे तर त्यांनी सल्लाही दिला की तुम्ही जाऊन चांगल्या भांडा.

मग दौरा प्राथमिक शिक्षक संघाच्या चिटणीसांकडे. या कठोर अंतःकरणाच्या बाईबरोबर यांचा झालेला संवाद असा—

'आमचा नंबर आला नव्हता तर कालच तसं का सांगितलं नाही?'

'काल आम्हाला नव्हतं सांगायचं!'

'पण एकदा नंबर दिल्यावर तुम्ही तो कसा बदलता?'

'आम्हाला बदलावासा वाटला म्हणून. आणि खरं तर तुमचा नंबर आलाच नसता. आम्ही परीक्षकांना तीनच नंबर जाहीर करायला सांगितले होते. त्यांनी चौथा नंबर त्यांच्या अधिकारात जाहीर केलाय.'

'पण नू. म. वि. ला तर आमच्यापेक्षा कमी मार्कस् आहेत. परीक्षकांनी पण आम्हाला तसं सांगितलंय.'

'तरीही आम्हाला नू. म. वि. लाच नंबर द्यायचाय्. चौथा नंबर आम्ही कुणालाही देऊ.'

तर असा हा मामला. पूर्णपणे दडपला गेलेला. आणि म्हणून दुर्लक्षित झालेला. शाळेत अनेक वर्षे खर्ची घातलेल्या या चिटणीस महाशया इतक्या निर्दय कशा? मुलांचं साधं मानसशास्त्र त्यांना कळू नये? नंबर दिलाच गेला नसता तर ठीक पण एकदा दिल्यावर तो एका रात्रीत फिरवला कसा गेला? बरं, खरोखर मार्कात काही चूक असती तर गोष्ट वेगळी, पण मुळगुंद, सुचेता जोशींसारखे जाणकार परीक्षक स्वच्छ शब्दांत सांगताहेत की निकाल बरोबर होता, नू. म. वि. ला यांच्यापेक्षा कमीच मार्कस् होते. तरीही नृत्यातले ओ की ठो कळत नसणाऱ्या या बाई केवळ शिक्षक संघाच्या चिटणीस या नात्याने जाहीर झालेला निकाल फिरवताहेत. आणि अगदी नू. म. वि. ला नंबर द्यायचाच होता तर त्या दुसऱ्या मार्गाने देऊ शकत होत्या. अजून एक पाचवा नंबर जाहीर करून नू. म. वि. ला अंतिम फेरीत नेऊन बसवायचे होते. त्यासाठी या पोरींचे पाय कशाला ओढले?

किंवा पोरींनी तक्रार करतो म्हटल्यावर

तुम्ही माझ्याविरुद्ध काहीही करू शकणार नाही असा स्वच्छ शब्दांत निर्वाळा देणाऱ्या या बाईंना मुलींचं मानसशास्त्र चांगल्या प्रकारे माहीत असावं. त्यांच्या दृष्टीने हा आयुष्यात वारंवार होणारे अन्याय सहन करण्यासाठी मन दगडी व्हावं म्हणून प्रेमभराने दिलेला बालामृताचा डोसच असावा!

●

## पी. एम्. टी. व काटकसर

महानगरपालिकेच्या वाहन – व्यवहार खात्याचा कारभार नव्याने हाती घेतलेल्या बाबासाहेब देवकरांनी आपल्या पहिल्याच पत्रकार परिषदेत सांगितले की, यंदा पी. एम. टी. ची भाडेवाढ होणार नाही.त्याऐवजी जास्तीत जास्त काटकसर करण्याचे मार्ग अवलंबिले जातील. (या घोषणेला चोवीस तास होतात न होतात तोच दुसऱ्या दिवशी त्यांनी पेट्रोल भाववाढीमुळे पी एम. टी. ची भाडेवाढ अपरिहार्य असल्याचे सांगितले!)

काटकसरीच्या योजना सांगताना त्यांनी तोटयात चालणारे काही मार्ग बंद करण्याची योजना विचाराधिन असल्याचे सांगितले. आज तोटयात मार्ग कुठले चालतात? शहरातील कुठलाच मार्ग तोटयात जात नसेल. शहराच्या आजूबाजूचा भाग म्हणजे कात्रज, बिबवेवाडी, हडपसर, मुंढवा, येरवडा, औंध, पाषाण वगैरे ठिकाणी ज्या बसेस धावतात त्यापैकी काही काही बसेसमध्ये दिवसातील काही विशिष्ट वेळी चार-पाचच प्रवासी असतात. त्यामुळे हे असले मार्गच तोटयात चालत असावेत. पण हे मार्ग बंद करणे हा त्यावरचा उपाय होऊ शकतो का? जरी चार–पाचजणच बसमधून प्रवास करीत असले तरी त्या त्या विशिष्ट वेळी पुण्याहून तिकडे किंवा तिकडून शहरात त्यांना जावंच लागतं. बसच बंद पडल्यावर त्यांच्या वाहतुकीची व्यवस्था काय? चार-पाचजणांसाठी बसने फेरी मारावी ही गोष्ट पटली नाही तरी स्वीकारायला हवीच. कारण बस नसल्यास दुसरी वाहतुकीची सोय म्हणजे रिक्षा. पण या भागात रिक्षा मिळणे ही फार अवघड गोष्ट आहे. काही काही भागात तर दिवस दिवस रिक्षा फिरकत नाहीत. (आणि रिक्षा मिळाली तरी ती परवडणार नाही ही गोष्ट अगदीच वेगळी.) पुरुषवर्ग एकवेळ सायकलवरून ये–जा करू शकेल. पण बायका, वृद्ध बायका यांनी काय करावं? तेव्हा हे बसमार्गच बंद करावेत ही गोष्ट व्यवहारी ठरली तरी अन्यायकारक असेल.

त्याऐवजी दुसरे एक काटकसरीचे मार्ग आहेत. पी. एम. टी. चे मॅनेजर दादा देसायांनी एक मार्ग सांगितलाय. सध्याचं जे बसचं तिकीट असतं त्या तिकीटाचा मोकळ्या जागेचा भाग एका दोरीने जरी कमी केला तरी लाखो रुपयांची बचत होईल. आणि तिकीटावर बाजूने मोकळी जागा तर बरीच असते. शिवाय तिकीटावर जाताना आणि येताना या सदराखाली एक ते छत्तीस आकड्यांचे दोन अगम्य चौकोन छापलेले असतात. प्रवासी ज्या थांब्यावर चढेल त्या आकड्यावर पंच करून तिकीट दिलं जातं. याचा उद्देश एवढाच की, प्रवाशांनी तिकीट बरोबर काढलंय की नाही, सांगितलेलं ठिकाण येऊन गेलं तरी प्रवासी अजून बसमध्येच बसलाय् की काय, हे तिकीटतपासनीसाला कळावं. पण तिकीटतपासनीसांच्या कामाची पद्धत बघितल्यावर ते एवढं डिटेलमध्ये बघत नाहीत हे लक्षात येतं. त्यांच्या दृष्टीने आवश्यक बाब म्हणजे प्रवाशाजवळ तिकीट असणं ही. आणि तिकीट बघायचंच झालं तर ते सिरीयल नंबर तेवढा बघतात. मग त्या चौकोनातील आकड्यांवर पंच करण्याचे प्रयोजनच काय? आणि मग ते चौकोन हवेतच कशाला? ते काढून टाकल्यास कितीतरी जागा वाचेल आणि लक्षावधी रुपयांची बचत होईल.

हा मार्ग स्वीकारायचा नसेल तर दुसरा उपाय म्हणजे तिकीटांवर जाहिराती छापणे. अनेक शहरांतील बसेसमध्ये तिकीटांवर जाहिराती छापलेल्या आहेत. आज पोस्टखात्यानेही कार्डे, आंतर्देशीय पत्रे वगैरेंवर जाहिराती छापायला सुरुवात केली आहे. मग पुणे महानगरपालिकेला अशा जाहिराती छापण्यात कोणता कमीपणा वाटतो?

तेव्हा या अशा प्रकारे आणि स्वतः बाबासाहेबांनी सांगितलेल्या काही योजनांद्वारे पी. एम. टी. ला खूप काटकसर करता येईल. तेवढ्यासाठी वर उल्लेखलेले मार्ग बंद करण्याचे कारण नाही. उलट नवीन मार्ग तयार करणे आणि असलेले मार्ग आणखी लांबवणे याचीच अपेक्षा पी. एम. टी. कडून आहे. ☐


**नव्याने प्रकाशित झालेली काही पुस्तके**

**काळाची पाउले** । कृष्णाबाई मोटे । डेमी २३२ । रु. १५।–

**निळे दिवस** । प्रभाकर पाध्ये । डेमी २५६ । रु. १६।–

**चक्रपाणि** । रा. चिं. ढेरे । डेमी ३४४ । रु. ४०।–

**विश्वकर्मा साहित्यालय**
२०३५/२ सदाशिव पेठ, टिळक रस्ता
पुणे ४११ ०३०        दूरध्वनी : ४१२०९

पुस्तके

# तीव्र, तप्त हौतात्म्याची अपूर्व एकाकी झुंज !

## थिंग्ज् फॉल अपार्ट / चिन्वा अॅछेबे

प्रा. गोपाल दत्त कुलकर्णी

स्वसमूह श्रेष्ठतावाद ही जरी मानवशास्त्रीय संकल्पना असली तरी, जेव्हा ती प्रत्यक्ष मानवी व्यवहारात बोकाळते तेव्हा कळत, न कळत गैरसमज किंवा अन्याय घडण्याची शक्यता निर्माण होते-नव्हे घडतातच. एकूण आफ्रिकेवर आमच्या हातून असाच प्रमाद घडला आहे. आफ्रिका खंड निव्वळ सुजलाम्–सुफलाम् भूप्रदेश नाही, तर जगातल्या कुठल्याही खंडाइतके ते सुसंस्कृत खंड आहे याचा बऱ्याचवेळा आमच्या कातडीचा रंग थोडा कमी 'कृष्ण' म्हणून आम्हाला विसर पडतो. जागृत आफ्रिकेच्या अस्वस्थ आत्म्याचे अंतरंग जाणून घेणे हे एक आव्हानच आहे. चिन्वा अॅछेबेची 'थिंग्ज् फॉल अपार्ट' ही कादंबरी या ज्वालामुखीतून वाहणाऱ्या लाव्हारसाची एक तप्तमुद्रा वाटावी अशी धगधगीत आहे. कादंबरीच्या कथावस्तुतून उठणारे आगीचे लोट घायाळ वाघाच्या विच्छिन्न शरीरावरील पिवळट्या पट्ट्यासारखे नेत्र दिपवून टाकतात. वेदनेच्या बळातले बळ अनुभवण्यासाठी 'थिंग्ज् फॉल अपार्ट' अगत्य वाचनीय आहे.

मनगटातल्या मस्तीवर मोठेपणा प्राप्त झालेल्या ओकोंक्वोची ही कहाणी सुरू होते ती ओकोंक्वोच्या जयघोषात. 'मार्जार' अॅमॅलिसे या पैलवानाला त्याने अस्मान दाखविलेले असते. त्यानंतर या अठरा वर्षाच्या ताज्या तरुणाची कीर्ति सतत वीस वर्षेपर्यंत आसमंतात, जमातीत गणगोतात 'प्रतिपश्चंद्ररेखेव' नव्हे तर वणव्यासारखी वाढत जाते. ओकोंक्वो दिसायला उग्र, उंचापुरा, धिप्पाड होता. त्याच्यात दोष एवढाच की तो तोतरा बोलत असे. त्याला सर्वात तिटकारा होता तो अपयशाचा (उनेको त्याचा बाप जन्मजात अपेशी म्हणून ओकोंक्वो त्याचाही मनःपूर्वक तिरस्कार करतो.) ओकोंक्वोला धडाधड बोलता येत नसले तरी मनोमन स्वसामर्थ्याची जाणीव होती. बेकार, भूमीहिन ओकोंक्कोने उमुओफिया या आपल्या गावात सधन शेती कमावली, तीन बायका केल्या व जमातीचे अनभिषिक्त 'सुखिया' पद प्राप्त केले. जमातीतल्या युद्धात खड्गहस्त म्हणून ओकोंक्वो शौर्य गाजवी. अशाच एका प्रतिशोधप्रेरित युद्धात ओकोंक्वोवर, बदला म्हणून शत्रूकडील इन्हेमेकुना या अकरा वर्षाच्या मुलाची हत्त्या करण्याचे कार्य, सोपविण्यात येते. ओकोंक्वोच्या भरलेल्या घरात ते पोर वाढते. ओकोंक्वोवर 'बापाची माया' जडविते, आणि एक दिवस या उग्र बापाच्या कोयत्याला बळी पडते.

ओकोंक्वोच्या देहात कुठे कोवळीक असावी असे कादंबरी वाचतांना तरी वाटत नाही. मार्दव आणि अपेश यांची सांगड त्याच्या रांगड्या डोक्यात असावी. ओकोंक्वोने स्वतःला अशा स्वनिर्मित आदर्शाच्या उंचीवर नेवून बसविलेले असते की खाली उतरायचे म्हटले तरी अशक्य व्हावे. तो इतक्या क्षुल्लक कारणांनी भडकतो की बस्स् ! अगदीच विलक्षण ! एकदा क्र. ३ च्या पत्नीला बाहेरून येण्यास थोडा उशीर होतो (बाईच ती, केशरचनेसाठी गेलेली, त्यातून जीवलग मैत्रिणीकडे !) तर हा तिला गुरासारखा झोडपून काढतो. एकदा क्र. २ ची बायको त्याच्या रागाला बळी पडते. कारण केळीचे झाड नव्हे, पाने तोडली म्हणून शिक्षा काय तर तिला अंगणात उभी करून ठासणीची बंदुक झाडतो. त्याचा नेम चुकतो, हे ओकोंक्वोचे सौभाग्य ! इकेमेकुनाची हत्या, एझीन्मा ही त्याची सुंदर मुलगी, मुलगा म्हणून का जन्माला आली नाही ही खंत, थोरला मुलगा एनुबोये पुळचट–आजोबासारखा निपजला ही व्यथा त्याला आतून कुरतडत असते. ओकोंक्वो बोलून काहीच दाखवत नाही. इकेमेफुनाची हत्या 'नेमेसिस'च्या टिटवीसारखी ओकोंक्वोच्या डोक्यावर फिरत राहते. इथून पुढे संथ सावध असणारे कथानक वेगाने विनाशाच्या दिशेने झेपावते, नकळत घडलेल्या चुकीलाही माफ न करणाऱ्या ओकोंक्वोचा देव, ओकोंक्वोच्या कुठल्याच दोषाला माफ करत नाही. चौफेर कर्तृत्ववान यशाने वेढलेल्या ओकोंक्वोने नकळत आत्मनाशाची बीजे पेरली होती.

कादंबरीचा पहिला भाग संपतो तेव्हा ओकोंक्वोच्या हातून नकळत आणखी एक हत्या घडते. एका आप्ताच्या दशक्रियाविधीच्या समारंभात त्याच्या हातून गोळी उडते व एक पोर मरते. ओकोंक्वोसारख्या शूराचा नेम वारंवार चुकत राहावा ना ! त्या गुन्ह्यासाठी त्याला परंपरागत सात वर्षांच्या वनवासाची सजा भोगावी लागते. ज्या जमातीच्या जख्ख परंतु तेवढ्याच जटील आणि अनिवार्य रूढीपरंपरासाठी त्याने इकेमेफुनाला वधले होते, त्या चालीरीतीच्या पालनासाठी तो विजनवास विनतक्रार स्वीकारतो. त्या इकेमेफुनाला मरण आले ते त्याने न केलेल्या गुन्ह्यासाठी, ओकोंक्वोच्या हातून मेलेले पोर असेच 'निष्कारण' मरते. चुकले तरी शिक्षा, न कळत आणि मुद्दाम चुकले तरी शिक्षा या जगात शिक्षा होण्यासाठी गुन्हा करावा लागतोच असे नाही. ओकोंक्वोच्या जमातीत जुळी मुले जन्माला आली तर जंगलात फेकून द्यावी लागत. म्हणजे एकूण जगात जन्माला येताना एकटे या की दुकटे, शिक्षा आहेच. अज्ञातवासात ओकोंक्वो मातुलगृही राहतो. तीन बायका, अकरा मुले यांच्यासह राहतो, राबतो. बापाचे आप्त–सोबती येनटी सुखाचे

सोबती. संकटकाळी उपयोगी पडले ते 'माहेर.' उचेंडू मामाकडे राहात असताना ओकोंक्वोला 'पांढऱ्या पायाच्या' गोऱ्या मिशनरीचे पहिले साक्षात् दर्शन घडते. सुरुवातीला गोऱ्यांची 'महारोगी' किंवा 'अल्बीनो' म्हणून कुचेष्टा होते-(आम्ही नाही का 'गोरी माकडे' म्हणून हसत राहिलो?) एका गोऱ्याला ठार मारण्यात येते. गोऱ्या माणसाच्या एका रक्ताच्या थेंबासाठी काळ्यांच्या रक्ताचे पाट वाहविण्यात येतात, हे इतिहास-सूत्र कुणीच जाणत नाही. एवढी 'व्यापकता' आदिवासीजवळ कुठली? गोऱ्याजवळ पल्लेदार, प्रभावी बंदुक होती. नवे हत्यार, नवी संस्कृती व नवा धर्म यांचा एल्गार होता एका सरळ, भोळ्या, अव्यवहारी आदिवासी जनतेशी.

तिकडे ओकोंक्वोच्या गावीही ही 'गोरी' लागण लागली होती. ओकोंक्वोचे जमात बांधव धर्मांतर करून प्रभु ख्रिस्तास शरण गेले होते. ओकोंक्वोचा-ज्येष्ठ पुत्र देखील ख्रिस्ती होतो. नवा धर्म-नवे मंदिर-नवे अधिकारी काळ्या आदिवासीच्या संस्कृतीचा ग्रास घेत होते. लाल मायची काळी लेकरे, जंगलचे राजे आपल्या घरात 'चोर' ठरले होते. मार खात होते. शिक्षा भोगत होते. असह्य अपमानाला उत्तर म्हणून डिस्ट्रीक्ट कमिशनरच्या हुजऱ्यांना 'राखी ढुंगणाचे' म्हणून हिणवत होते. ज्याला अन्यायाचा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य नसते, त्याच्यासाठी परमेश्वराने शिव्या निर्माण केल्या आहेत. ओकोंक्वोला शिव्या देण्याचीही सोय नव्हती. (तोतरा होता ना?) शिवाय त्या मंदसामर्थ्य हतप्रभ जमातींत मर्द होता तो तेवढाच! ओकोंक्वो विचार करत होता. 'माझ्या बांधवांना काय झाले आहे? त्यांची युयुत्सु वृत्ती कुठे लोपली?' फारशी खोलबुद्धी नसलेला ओकोंक्कोने गोऱ्यांना आपल्या पितृभूमीवरून निपटून काढण्याचा निश्चय केला, तरी त्याचा जीवभावाचा स्नेही ओबेओरिको त्याला सांगतो, 'मित्रा, गोऱ्यांना हाकून लावायला ते कुठे आहेत संख्येने जास्त? मुठभर तर आहेत! त्यांच्या भजनी लागलेले आपलेच गणगोत आहेत. त्यांचे काय करायचे? जेव्हा स्वजनच आपले वैरी झालेत व आपली लढाई 'आपल्याशीच' आहे. आपलेच बांधव धर्म बदलताच, बदलून गेले. गोऱ्या माणसाने भावाभावातल्या भावबंधनावरून सुरी चालविली. आपल्याला जोडून ठेवणाऱ्या बंधालाच हिसडा बसला, धागे विस्कटले. आपले आपण सांधण्यापलीकडे दुभंगले आहोत रे!'

ओकोंक्वोला गोऱ्यांचा अनावर राग आला होता. नवा वेश, नवा धर्म, नवी राज्यव्यवस्था, नव्या बाजारउठव्यांच्या बाजारी पेठा-यांचा भयंकर संताप येत होता. मिस्टर ब्राऊन नावाचा समंजस मिशनरी सर्वांनाच 'धीरे चलो'चा संदेश देत होता. तरीदेखील 'नवे बाटगे' अस्सल ख्रिस्त्यांपेक्षा अधिक कडवेपणाने वागत होते. नव-शिक्षित आदिवासी नोकऱ्या करून पैसा खुळखुळवत बाजारात फिरत होते. वादळात विस्कटलेल्या वाळक्या गवताच्या जुडीसारखी अनेकशः सैरभैर झालेली जमात पाहून ओकोंक्वो अहोरात्र जळत-तुटत होता. रेव्हरंड स्मिथ नवा धर्मगुरू म्हणून येतो. जे जे कृष्णवर्णी ते वाईट असे तत्त्वज्ञान घेऊनच येतो. एका क्षुल्लक प्रसंगाने दोन्ही बाजूंनी ठासून भरलेल्या सुरुंगाच्या कोठारावर ठिणगी पडते. ओकोंक्वो विरुद्ध नवी संस्कृती अशी शेवटची लढाई सुरू होते. ओकोंक्वोचे लोक ख्रिस्त्यांचे प्रार्थनास्थळ उध्वस्त करतात. प्रार्थनास्थळ उध्वस्त करून परकीय आक्रमणे रोखता येतात?

त्या प्रसंगानंतर दोन दिवसांनी ओकोंक्वोसह सहाजणांना अटक करण्यात येते. अपमान करून, मुंडण करून, दंड वसूल केल्यानंतर सर्वांची सुटका होते. या घटनेनंतर सारा उमुफोयियाचा परिसर कान टवकारून अशुभाचा ठाव घेणाऱ्या श्वापदासारखा फुरफुरू लागतो. ओकोंक्वो सूडाची शपथ घेतो. 'माझ्यापुरता मी एकटा झुंजेन, प्राण गेला तरी बेहत्तर, लाचार होऊन सरपटणार नाही!'

गावात दवंडी पिटून सभा बोलावली जाते. सारे गावकरी गोळा होतात. गोऱ्यांना पिटाळून लावण्यासाठी काळी-आपली-माणसे देहाचा धूळ करतील याची ओकोंक्वोला खात्री नसते. परंतु तो स्वतःपुरता निर्धार करून येतो. सारी जमात मिशनरी 'मीठ' पडून नासली होती. 'जमात पाली सारखी असते', शेपूट तुटले तर पुन्हा उगवते अशा अर्थाची म्हण आता ओकोंक्वोच्याच गावात खोटी पडली होती. दोरा हरवल्यानंतर ओघळलेल्या मण्यासारखी जमात ओघळली होती. जमिनीवर सांडलेल्या पाण्यासारखी वाहून गेली होती. कुलगोत्राचा स्वाभिमान-स्वधर्माचा गर्व सर्वजण कसे विसरले होते? सभेत सूडाची, बंडाची, युद्धाची, जिहादची बांग देण्यात येते. तोच कमिशनरचा कृष्णवर्णीय हुजऱ्या सभा बेकायदेशीर असल्यामुळे बंदीचा हुकूम बजावतो! हा अपमान म्हणजे ओल्या जखमेवर अॅसिड ओतण्याचा प्रकार ठरतो! सभा चित्रासारखी-षंढासारखी हतबद्ध होते. ओकोंक्वोने कमरेचा कोयता काढला केव्हा आणि सप्पकन्-खच्चकन् आवाज होऊन त्या हुजऱ्याचे मुंडके धडावेगळे झाले केव्हा? मात्र वस्तुस्थितीची जाणीव होताच, हुजऱ्याच्या धडाच्या पायाशीच पडलेले त्यांचे मुंडके पाहून सभेत एकच हलकल्लोळ उठतो. 'ओकोंक्वोने का मारले त्याला?'

गोरा कमिशनर आणखी लालबुंद होऊन ओकोंक्वोच्या अंगणात लवाजम्यासह हत्यारी, अत्याचारी बागीला अटक करण्यासाठी येतो.

'ओकोंक्वो कुठे आहे?' तो दरडावून विचारतो.

'तो इथे नाही, तो जिथे आहे ती जागा दाखवतो आम्ही.'

ओकोंक्वोचे मित्र कमिशनरला घराच्या परसदारी येतात. उंच झाडाच्या फांदीवरून ओकोंक्वोचे कलेवर लाचारपणे लोंबत असते. मार्क अँटनी ब्रूटसच्या मृत्युनंतर जशी श्रद्धांजली वाहतो, तशीच श्रद्धांजली ओबेएरिका (ओकोंक्वोचा मित्र) वाहतो पण किती कटू आणि विषादपूर्ण!

'आमच्या उमुफोयियाचा हा महापुरुष होता! तो गेला! तुम्ही त्याला आत्महत्या करायला लावले. तो कुत्र्याच्या मौतीने मेला!' जमातीच्या परंपरेनुसार जमातबांधवाला मारणे हे जसे पाप होते, तसेच स्वतःचा जीव घेणे हेही पाप होते! तो धर्मांतर करून ख्रिश्चन झाला तरी आफ्रिकन मातीतलाच होता ना! पापांचा पिसारा देवाने माणसांसाठीच खास तयार केलेली चीज असली तरी शेवटी ही पापेच 'काळविटाची शिंगे' ठरून माणसाला मूठमाती देतात. ओकोंक्वोने जाती बांधवाला मारले हे पाप पुसण्यासारखे नव्हते. रँडला मारणाऱ्यालाही फाशीच, द्रविडाला मारणाऱ्यालाही फाशीच!

ओकोंक्वोच्या हातून जमातीबांधवांचा खून घडला त्याची शिक्षा त्याने स्वतःलाच दिली–फाशीची ! स्वतःचा जीव घेऊन त्याने जन्मदात्या पृथ्वीचा उपमर्द केला म्हणून अखेरचे अंत्यसंस्कार करतात ते ओकोंक्वोचे वाटगे जातीबांधव. ज्यांचा मनःपूर्वक तिरस्कार केला, त्यांच्या हातून मूठमाती मिळावी हा काळाचा महिमा, 'ड्रॅमॅटीक आयरनी' की दैवाचा दुर्विलास ! ओकोंक्वो बापाला 'अँगवाला' म्हणून हसत असे, शेवटी दुर्दैवाचा मोठा वाटा कुणाच्या ललाटी लिहिला होता. सामान्य म्हणून जन्माला आलेला ओकोंक्वो अतिसामान्य असामी म्हणून मेला का ? नियतीचा सूड म्हणतात तो हाच का ? पवित्र पूर्वजांच्या भूमीवरून ज्यांना पिटाळून लावण्यासाठी ओकोंक्वोने प्राणांची बाजी लावली, त्याचे दयाबुद्धीने त्यांनीच दफन करावे ना ? याहून आणखी दुर्दैव ओकोंक्वोला देखील मागून मिळाले नसते. 'थिंग्ज् फॉल अपार्ट' ही 'फ्रेज' यिट्स्च्या ज्या कवितेतून घेतली त्या 'सेकंड कमींग' मधील कवन आता सार्थ वाटू लागते.

'Turning and turning in the widening gyre, The falcon cannot hear the falconer; The Things fall Apart; the centre can't hold Mere anarchy is loosed upon the world.'

अँछेबेची कादंबरी ओकोंक्वोच्या अंगाने फुलत-वाढत जाते व त्याच्या मृत्युने 'संपन्न' होते. ओकोंक्वो हा खानदानी लढवय्या शोभावा, अधिक योग्य शब्द म्हणजे 'अविचारी' हुतात्मा वाटावा असा आहे. (त्याला अविचारी म्हणायचे कारण बहुतेक व्यवहारी माणसांचा 'विचार' म्हणजे कायर नेभळटपणा असतो म्हणून !) Those who basely creep upon their bellies या जातीच्या माणसांपेक्षा तो विलक्षण वेगळा आहे. 'I was ever a fighter, one fight more' म्हणत मरणाला ललकारणारा मर्दाच्या जातीचे बहाद्दर बीज आहे ओकोंक्वोचे. नेपोलियनच्या कोशात जसा 'अशक्य' हा शब्द नव्हता, तसा ओकोंक्वोच्या आयुष्यात 'निराश माघार' नव्हती. त्याच्या दुर्दैवाने आयुष्यातली अखेरची लढाई त्याला एकाकी लढावी लागते. त्याच्या बापाचे शब्द तेव्हा खरे ठरतात : 'It is more difficult and more bitter when a man fails alone !'

शेतात 'याम' (रताळ्यासारखा कंद) पिकविताना नांगर, शत्रूचा निःपात करण्यासाठी कोयता, आणि स्वकीयांचा तेजोभंग करणारी ओकोंक्वोची जीभ सारख्याच सामर्थ्याने चालत. त्याची 'चूक' (शोकात्मिकेच्या नायकात ती असतेच.) म्हणजे त्याने स्वतःसाठी एवढे उत्तुंग आदर्शाचे सिंहासन उभे केले होते की, त्यावरून स्थानबद्ध होण्याच्या भीतीने तो सतत अस्वस्थ आहे. भीतीच्या भीतीचा जबरदस्त पगडा ओकोंक्वोच्या उरावर सतत आहे. या भीतीतून त्याच्या स्वभावातला ताठरपणा, आक्रमक संतापीपणा जन्माला येतो. अति राग आणि भीक माग ! संतापाची आग प्रेमाची, मार्दवभावनांची राख करून टाकते. माणसे तुटतात, दुरावतात. यशाची झिंग एवढी जबरदस्त पराणी आहे की, त्यापुढे तो काहीही करण्यास मागे पाहणार नसतो. सीमेचे गुणावगुण एकत्र येऊन ओकोंक्वो नावाचे सुंदर रसायन तयार झाले आहे.

या कादंबरीची विभागणी तीन भागांत आहे. अॅरिस्टॉटलप्रणित आरंभ, मध्य आणि अंत या धर्तीची. ओकोंक्वोच्या हातातला कोयता जसा धारदार, तेजस्वी आणि सरळ घाव घालणारा, तसेच या कादंबरीचे निवेदन आहे. कादंबरीतला कितीतरी भाग 'बाह्य' वाटावा असा जोडलेल्या ठिगळासारखा आहे. (विवाहप्रसंग, न्यायदान, सण–समारंभ.) अर्थात अँछेबेंनी ती भरपूर मनोरंजक ठरतील अशा प्रकारे गुंफली आहेत. शेवटी कडू गोळीलाच गोड वेष्टण लागते असे नाही, गोड गोळीदेखील आकर्षकपणे सादर करावी लागते, हे कलाक्षेत्रातले सत्य आहे. अँछेबेंनी उपलब्ध केलेले लाल आफ्रिकन मातीचे दर्शन, मराठी मातीशी छान नाते जुळवेल असे आहे. हा योगायोग हृदयंगम आहे. मानवशास्त्राचे (मानवशास्त्राला नृवंशशास्त्र किंवा मानववंश शास्त्र असे अजून का म्हणतात ? Anthropology या संयुक्त शब्दात 'वंश' कुठेही नाही !) ग्रंथ वाचणाऱ्यांना आफ्रिकन आदिवासींचे सामाजिक–सांस्कृतिक जीवन जगभर इथून–तिथून 'मानवी' असते हे ज्ञात आहेच. कादंबरीचे आणखी एक वैशिष्टच म्हणजे संपूर्ण १८८ पृष्ठांच्या कादंबरीत रोमँटिक वर्णनासाठी १८८ शब्ददेखील नाहीत. कादंबरीतील इतर पात्रे–ओकोंक्वोचे गावकरी, गणगोत, बायका पोरे, आप्तमित्र, व शत्रू–ओकोंक्वोच्या गडद चरित्राला उठाव देणाऱ्या फिक्या रंगांसारखी वावरतात.

कादंबरीभर तिमिरबरन ओकोंक्वो आकाशातल्या घननीळ मेघासारखा भरभरून राहिलेला दिसतो. 'थिंग्ज् फॉल अपार्ट' ही कादंबरी ओकोंक्वोच्या मृत्यूच्या भैरवीने संपलेली करुण मैफल आहे. बहुतेक 'जिवंत' कथा मृत्यूने संपाव्यात हाही प्रतिष्ठित साहित्यिक संकेत आहे. ही कथा ओकोंक्वोच्या करुण पराभवाची आहे. शूराला पराभव आणि मृत्यू एकच असतात. मृत्युप्रमाणेच पराभवही 'विसाव्याचे' अटळ ठिकाण असते. सामान्य यशापेक्षा असा पराभव किंवा अपयश केव्हाही वांछनीय असते. ब्रूटसचा पराभव, 'ओल्डमॅनचा' पराभव, राणा प्रतापचा पराभव हे विजयाहून अधिक वैभवशाली नसतात का ? ओकोंक्वो जिद्दी, हट्टी नसता तर कदाचित 'ट्रॅजेडी' टळली असती; मग character is destiny या तत्त्वाचा अर्थ काय ?

चिन्वा अँछेबेंच्या कादंबरीतून जागृत आफ्रिकेच्या अस्मितेची धडकन दाणदाण ऐकू येते. तीन विभागांत सांगितलेल्या या कर्मकहाणीत शतशः विदीर्ण झालेल्या आदिम आफ्रिकेतल्या वनवासी जनांची आधुनिक संस्कृतीच्या पहिल्या आघातामुळे उडालेली दाणादाण वर्णन केलेली आहे. बालकवींच्या 'भिंत खचली कलथून खांब गेला' या जातिवंत काव्यपंक्तीसारखा हृदयस्पर्शी हेलावणारा अनुभव 'थिंग्ज् फॉल अपार्ट' च्या वाचकांना यावा. शेक्सपियरचा हॅम्लेट 'The world is out of joint' असे म्हणतो तेव्हा त्याला काय वाटते, ते ओकोंक्वोला वाताहात झालेली जमात पाहून होत असते. 'गोरी' संस्कृती ही एखाद्या 'अर्थ मुव्हर' प्रमाणे सुसांडत येते आहे, ओकोंक्वो आपल्या समर्थ बाहूंनी ती रोकण्याचा व्यर्थ प्रयत्न करतो, त्याची ही दिलचस्प कहाणी आहे. तो मोडून पडतो, वाकत नाही !

पृष्ठ २८ वर

# नवा विरोधी पक्ष

## काही अपेक्षा, काही शंका

**या. दा. रानडे**

संघटना काँग्रेस, जनसंघ, भारतीय लोकदल आणि समाजवादी पक्ष हे चार पक्ष एकत्र येऊन देशात नव्या विरोधी पक्षाची स्थापना येत्या प्रजासत्ताक दिनी करण्याचे घाटत आहे. या चारही पक्षांच्या कार्य-कारिणींच्या बैठकी यापूर्वी होऊन या निर्णयास मान्यता देण्यात येईल, असा पक्ष स्थापण्याचा विचार गेले दहा–अकरा महिने चालू आहे. वीस मार्चला मुंबईत कम्युनिस्ट वगळून बाकी विरोधी पक्षांच्या प्रमुख नेत्यांची बैठक भरून या प्रश्नाचा विचार झाला. एकीकरणाची ही हालचाल वरील चार पक्षांच्या नेत्यांनीच सुरू केली. संसदेत एक पक्ष म्हणून काम करण्यास त्यांनी त्यापूर्वीच सुरुवात केली होती. पण या नव्या पक्षाचे कार्य संसदेपुरतेच मर्यादित न राहता संसदेबाहेरही त्याने कार्य करावे या उद्देशाने पक्षाची आता रीतसर स्थापना होत आहे.

अनेक पक्षांना कार्य करण्यास मोकळीक असलेली संसदीय पद्धतीची लोकशाही आपण स्वीकारली आहे. अशी लोकशाही यशस्वी होण्यासाठी सत्तारूढ पक्षास पर्यायी असा तुल्यबळ विरोधी पक्ष असावा लागतो. स्वातंत्र्याच्या एकूण वीस वर्षांत असा प्रभावी पक्ष आपल्याकडे निर्माण होऊ शकला नाही, ही वस्तुस्थिती आहे.

प्रभावी विरोधी पक्ष का निर्माण होऊ शकला नाही? आतापर्यंतचे प्रयत्न का असफल झाले? प्रयत्नांची दिशा कोठे चुकली? राज्यकर्त्या पक्षाच्या धोरणालाही याबाबत दोष दिला जातो ते कितपत बरोबर आहे? नव्या पक्षाची स्थापना होत असतानाच याबाबतीत पुन: एकदा आत्मनिरीक्षणाच्या भूमिकेतून मोकळ्या मनाने चिंतन होणे आवश्यक आहे.

समाजवादी पक्ष हाच देशात काँग्रेसला तुल्यबळ पक्ष होऊ शकेल अशी समाजवादी नेत्यांची समजूत होती. १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांनी मोठ्या संख्येने उमेदवार उभे केले होते. पण या निवडणुकीच्या निकालांनी त्यांना पहिला मोठा हादरा दिला. असाच मोठा पराभव आचार्य कृपलानींनी स्थापन केलेल्या किसान मजदूर प्रजा पक्षाचा झाला. या दोन पक्षांनी एकत्र येऊन मग प्रजासमाजवादी पक्ष स्थापन केला. पण त्यातून प्रभावी विरोधी पक्षाची उभारणी होऊ शकली नाही. या अपयशाचे कारण तात्त्विक बैठकीचा विचार न होताच हे एकीकरण झालेले होते. 'दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी दूरदर्शीपणाने तात्त्विक प्रश्न बाजूला ठेवले' असे त्यावेळी श्री. जयप्रकाश नारायण यांनी एकीकरणासाठी मुंबईस भरलेल्या परिषदेत सांगितले होते. पुढे प्रजासमाजवादी पक्षात फूट पडून लोहिया गट बाहेर पडला. दोन्ही पक्षांच्या एकीकरणाचे १९६३ च्या सुरुवातीस प्रयत्न झाले त्यावेळी त्याला फारसे यश आले नाही. दोन वर्षांनी एकीकरण होऊन संयुक्त समाजवादी पक्ष स्थापन झाला. पण स्थापना परिषदेतच फूट पडून प्रजासमाजवाद्यांचा एक गट अलग झाला व त्यांनी प्रजासमाजवादी पक्ष पुनः स्थापन केला. १९७१ च्या निवडणुकीतील अपयशानंतर दोन्ही पक्ष पुनः एकत्र आले आणि त्यातून समाजवादी पक्ष स्थापन झाला पण प्रभावी विरोधी पक्ष म्हणून तो देशाच्या राजकारणावर प्रभाव पाडू शकला नाही आणि आता स्वतःचे विसर्जन करून नव्या विरोधी पक्षात हा पक्ष सामील होत आहे.

विरोधी पक्षांमधील दुसरा प्रवाह म्हणजे कम्युनिस्ट व त्यांचे सहप्रवासी पक्ष, हे सर्व डावे पक्ष एकत्र येऊनही प्रभावी विरोधी पक्ष निर्माण होऊ शकला नाही. त्यांच्या संयुक्त आघाड्या स्थापन झाल्या. केरळ आणि पश्चिम बंगालमध्ये काही काळ सरकारेही अधिकारावर आली पण पुढे फूट पडल्याने ही सरकारे गडगडली. कम्युनिस्ट आणि मार्क्सवादी यांच्यातील दरी वाढत गेली. केरळमध्ये कम्युनिस्ट, त्यांच्या बाजूचे डावे गट आणि काँग्रेस यांचे संयुक्त मंत्रिमंडळ अधिकारावर आले. काँग्रेसला आता कम्युनिस्टांच्या सहकार्याची आवश्यकता नसल्याने कम्युनिस्टविरोधी प्रचार मोहीम त्यांनी सुरू केलेली आहे त्यामुळे कम्युनिस्टांना काँग्रेसमध्येही स्थान नाही आणि विरोधी पक्षातही स्थान नाही अशी त्यांची केविलवाणी अवस्था झाली आहे. मार्क्सवादी, समाजवादी आणि इतर छोटे डावे पक्ष एकत्र येऊन त्यातून एक प्रभावी संयुक्त आघाडी उभी राहू शकली असती पण समाजवाद्यांना मार्क्सवाद्यांपेक्षा जनसंघ, संघटना काँग्रेस, भारतीय लोकदल हे पक्ष अधिक जवळचे वाटतात असे दिसते.

देशातील उजवे पक्ष हा विरोधी पक्षामधील तिसरा प्रवाह. उजव्या पक्षांनी एकत्र येऊन एकच प्रभावी पक्ष स्थापण्याचे प्रयत्न का केले नाहीत? जनसंघ स्वतंत्र पक्ष आणि संघटना काँग्रेस हे प्रमुख उजवे पक्ष या प्रत्येक पक्षाचे आपल्या सामर्थ्याबद्दल अवास्तव अंदाज होते. १९७१ च्या निवडणुकातील अपयशाने त्यांना त्यांचे खरे स्थान दाखवून दिले. या पक्षांनी संयुक्त समाजवादी पक्षांच्या सहकार्याने १९७१ च्या निवडणुकीत बडी आघाडी स्थापन केली होती व केंद्रात सत्तारूढ होण्याची स्वप्ने ते पहात होते पण प्रत्यक्षात बडे अपयश त्यांच्या पदरी पडले. विरोधी पक्षांची केवळ संयुक्त आघाडी पुरेशी नाही. त्यांनी एक पक्ष स्थापन केल्यानेच प्रभावी विरोधी पक्ष निर्माण होईल ही कल्पना पुढे आली. ओरिसातील उत्कल काँग्रेसचे नेते विजू पटनाईक यांनी पुढाकार घेऊन सात छोट्या पक्षांचे एकीकरण घडवून आणले. त्यातून भारतीय लोकदल हा पक्ष स्थापन झाला. पण प्रभावी विरोधी पक्षाचे स्थान तो मिळवू शकला नाही. स्वतंत्र पक्षाने आपले विसर्जन करून तो भारतीय लोकदलात सामील झाला. पण बाकी विरोधी पक्षांनी आपले स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवले. आपले सामर्थ्य अपुरे पडत आहे. आपल्या एकट्याच्या बळावर आपण विशेष काही करू शकत नाही अशी जाणीव आता या सर्वच पक्षांना झाली असून एकत्र येऊन ते नवा पक्ष उभारीत आहेत. मध्यंतरी फेडरल पक्षाची कल्पना पुढे आली होती पण संयुक्त आघाडीचेच ते दुसरे नाव होते.

देशात प्रभावी विरोधी पक्ष स्थापन झाला तर हवाच आहे पण या चार पक्षांच्या एकीकरणातून असा पक्ष कितपत निर्माण

होईल याची शंका वाटते. कॉंग्रेस विरोधाशिवाय या चार पक्षांमध्ये समान भूमिका नाही. मध्यंतरी १९६७ नंतरच्या काळात सत्ता हाती येण्याची संधी येऊनही कॉंग्रेसपेक्षा अधिक चांगला व स्वच्छ कारभार हे पक्ष करून दाखवू शकले नाहीत. तात्त्विक भूमिका, धोरण व कार्यक्रमविषयक मतभेद बाजूला ठेवून एकपक्ष उभा राहू शकेल. पण मतभेद बाजूला ठेवल्याने नाहीसे होत नाहीत. ते डोके वर काढतातच आणि हे मतभेद कायम असताना एकजुटीने व प्रभावीपणे कार्य कसे होईल ?

नवा पक्ष स्थापन करताना केवळ निवडणुकीची दृष्टी नसावी. विधीमंडळातील कार्य, विधीमंडळाबाहेर विधायक कार्य आणि जनतेवर होणाऱ्या अन्यायाच्या निवारणासाठी शांततापूर्ण संघर्ष असे तिहेरी कार्य नव्या पक्षाने हाती घ्यावयास हवे. आमचे राजकारण निवडणूक प्रधान व सत्ताभिमुख झालेले असून त्यासाठी संधिसाधू समझोते व करार केले जातात. विधिमंडळातील कार्यापेक्षाही बाकी दोन कार्यक्षेत्रे अधिक महत्त्वाची मानून त्यास वाहून घेणारे कार्यकर्ते ज्या पक्षाजवळ असतील तोच कालांतराने जनतेचा पाठिंबा मिळवून प्रभावी पक्ष बनवू शकेल. या लांब पल्ल्याच्या मार्गानेच आपणास जावे लागणार आहे. □

# सोलकढी

## □ कलंदर फलंदाज

ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडिज यांनी नुकताच चुरगाळून टाकलेला इंग्लंडचा क्रिकेट संघ सध्या भारताचा दौरा करतो आहे. टोनी ग्रेग संघनायक आहे. ग्रेग काही उमदा आणि कलंदर खेळाडू नव्हे. तो चांगला चिकट आणि चिडखोरचेंडू आहे. ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडिजकडून झालेल्या पराभवाची भली भरपाई भारतीय दौऱ्यात करावी, असा त्याचा हिशेब दिसतो. त्याची कल्पना पहिल्या दोन कसोटी सामन्यांवरून येते. या सामन्यात भारतीय गोलंदाजी तशी भुसभुशीत नव्हती. भुसभुशीत होती ती भारतीय फलंदाजी. भारतीय डाव सातत्याने कोसळले याबद्दल तक्रार कशाला करायची ? ते आवाज न करता कोसळले याबद्दल मात्र तक्रार करायला हवी.

अशी तक्रार करताना आमच्या फारूक इंजिनियरची आठवण होते. फारूक काही भरवशाचा फलंदाज नव्हता. पण उमदा आणि कलंदर खेळाडू जरूर होता. तो असता तर ओल्ड, विलिस, लीवर, ग्रेग, अंडरवूड यांना आठ-दहा तरी यादराखे तडाखे नक्की बसले असते. फारूकमुळे पराभव टळत नाही; पण पराभवातसुद्धा तोंडाची चव जात नाही. गेल्या दोन्ही सामन्यांत आमचे (आणि इंग्लंडचेसुद्धा) खेळाडू इंपोझिशन काढावे तसे क्रिकेट खेळले. फारूक असता तर हिरण्याजिकण्यापलीकडचे लख्ख क्रिकेट थोडेतरी पाहायला मिळाले असते.

पण फारूक इंजिनियर पडला इंग्लंडमध्ये. कामधामक्रिकेट सोडून दौऱ्यासाठी भारतात येणे त्याला साधण्यासारखे नव्हते. आणि आम्ही सुद्धा, छोटे, गैरकसोटी सामने खेळणाऱ्या खेळाडूंमधूनच कसोटी-संघ निवडला जावा, असे ठरवले. त्यामुळे फारूक इंजिनियरचा विचार करावा लागला नाही. हे तसे ठीकच झाले. नवा यष्टीरक्षक अबू हसन सय्यद अहमद किरमाणी जणू उप-इंजिनियरच आहे. पण सुनील गावसकर, गुंडाप्पा विश्वनाथ, ब्रिजेश पटेल भारतीय संघात असताना फारूक इंजिनियरची याद पुन्हापुन्हापुन्हा यावी यात सगळे आले.

गेली काही वर्षे फारूक इंजिनियर इंग्लंडमधल्या लँकेशायर या विख्यात परगण्याच्या संघातून काऊंटीसामने खेळतो आहे. देशोदेशीच्या प्रतिभाशाली क्रिकेटपटूंना हे इंग्लिश परगणे आपल्या संघांकडून खेळवतात; त्यांना भरपूर पैसे देतात; क्रिकेटचा खेळ आकर्षक करायचा प्रयत्न करतात. आपल्या धडकधमाल खेळाने इंजिनियरने लँकेशायरच्या रसिक प्रेक्षकांना गच्च आनंद दिला आहे. इंजिनियर रंगात आला म्हणजे चेंडूला, चेंडूफेक्याला, आणि चेंडूपकडयांना केविलवाणे करून सोडतो. हातातली बॅट चेंडू थोपटण्यासाठी नसून धोपटण्यासाठी आहे, असे इंजिनियरने सुरुवातीपासून मानले. त्यामुळे धावसंख्येचा हिशेब मांडत तो क्रिकेट रमीसारखे कधीच खेळला नाही. त्याच्या कारकीर्दीत भारतातल्या फार थोडया खेळाडूंना हे साधले. हे आपले उगाच म्हणायचे. खरे म्हणजे कोणालाच साधले नाही. त्यामुळे इंजिनियरचे आम्हीसुद्धा बऱ्यापैकी कौतुक केले.

खरे कौतुक मात्र इंग्लिशक्रिकेट शौकिनांनी केले. इंजिनियर आता निवृत्त होईल. म्हणून गेले वर्षभर त्याच्यासाठी शाबासकीचे सामने भरवण्यात आले होते. त्या सामन्यांमधून फारूक इंजिनियरला करमुक्त असे वट्ट पंचेचाळीस हजार पौंड मिळतील. इतकी मोठी रक्कम यापूर्वी कोणत्याही क्रिकेटपटूला मिळालेली नाही. १९४८ साली लँकेशायरच्याच सिरिल वॉशब्रुकला चौदा हजार पौंड मिळाले होते. एवढ्या पैशांचे हा फारूक इंजिनियर करणार तरी काय, असा प्रश्न विचारणाऱ्याला अवघड जागी गळू होईल, एवढेच सांगतो.

सी. के. नायडू, मुश्ताक अल्ली, लंडू रांगणेकर आम्ही पाहिले नव्हते. पण आम्ही फारूक इंजिनियर पाहिला आहे. (आणि कदाचित ब्रिजेश पटेल पाहू.)

निवृत्तीनंतर, फाड फाड फलंदाजी करण्याचे क्लासेस भारतात आणि इंग्लंडमध्ये फारूक इंजिनियरने काढावे, अशी जाहीर सूचना या निमित्ताने अनंतराव करून राहिले आहेत.

—अनंतराव



# अशी चौकशी, अशी फाशी!

लेखांक दहा । र. धों. घाणेकर

धावा! धावा हो धावा– निक्सनला वाचवा.

निरनिराळ्या वेळी निरनिराळी, बेछूट व असंबद्ध विधानें करून जनतेची दिशाभूल करणे हा राजकारणी पुरुषांचा सत्तेवर आल्यावर स्वभावच बनत जातो. २० जानेवारी १९६९ ला निक्सन राष्ट्रपती झाला आणि निरनिराळ्या विषयांवर अशीच असंबद्ध विधाने करण्यास निक्सनची सुरुवात झाली.

सप्टेंबर १९६८ मध्ये निवडणूक प्रचारावर असताना अमेरिकेत विद्यार्थ्यांचे दंगेधोपे चालू होते. अशा धामधुमीत निक्सननें एक पत्रक काढले होते त्यात तो म्हणाला होता– 'विद्यार्थ्यांचे हे एक लांछनास्पद कृत्य आहे पण खरं दोषी कोणी असेल तर कायद्याचे उल्लंघन करणारा विद्यार्थीवर्ग नसून त्यांना चेतना देणारा प्राध्यापक वर्ग होय.'

खरं पाहिलं असता अमेरिकेत कोणत्याही युनिव्हर्सिटी प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना जाळपोळ व लुटालूट करण्यासंबंधी चेतना दिलेली नव्हती. उलट त्या गोष्टींचा धिक्कारच केला होता परंतु राज्यकर्त्यांची नीतीच बिघडलेली असली म्हणजे कोणावर तरी कसला तरी ठपका टाकून आपण दूर बसून मजा पाहण्यात त्यांना एक आसुरी आनंद मिळवावयाचा असतो.

१९६८ मध्ये निग्रो व गोरे विद्यार्थी ह्यांचे सतत झगडे चालू होते. दंगेधोपे, जाळपोळ ह्यांना ऊत आलेला होता आणि ह्याला खरे कारण म्हणजे तरणेबांड अमेरिकन जवान काही महिने युद्धशास्त्र शिकविल्यावर इंडोचायना युद्धावर धाडले जात होते व अननुभवी असल्याकारणाने मरत होते, जायबंदी होत होते. शत्रूच्या गोटांत कैदेत जाऊन पडत होते, हे अमेरिकन विद्यार्थ्यांना नापसंत होते. आतापर्यंत अशा तऱ्हेनी हजारो अमेरिकन तरूण सैन्य व्हिएटनाम युद्धात गारद झाले होते.

६ एप्रिल १९६९ ला न्यूयॉर्क टाईम्सने बातमी छापली की निक्सन व्हिएटनाममधून सर्व अमेरिकन सैन्य काढून घेण्याच्या तजविजीत आहे.

२८ एप्रिल १९६९ ला कॉलेजचा प्रिन्सिपॉल कॅलव्हिन पिपटन् ह्याने निक्सनला पत्र लिहिले, 'जोपर्यंत आपले राज्यकर्ते आंतरदेशीय प्रश्न सोडवत नाहीत व परदेशातून निष्कारण चालविलेले युद्ध थांबवित नाहीत तोपर्यंत युनिव्हर्सिट्यांतून चाललेली विद्यार्थ्यांची चळवळ बंद होईल असे मला वाटत नाही. तेव्हा व्हाईट हाऊसनी ह्यांची शक्य तितक्या लौकर दखल घेणे हे शहाणपणाचे ठरेल.'

त्या पत्राला स्वतंत्रपणे उत्तर न देता मॉर्डसन येथील बीटल स्टेट कॉलेज व कॉलोरॅडो स्प्रिंग्ज येथील एअर फोर्स अॅकॅडेमी येथील ३ व ४ जून १९६९ ला केलेल्या भाषणातून निक्सन म्हणाला,

'Students have some rights. They have a right to guidance, to leadership and direction. They also have right to expect their teachers to listen and to be reasonable but also to stand for something reason against the rule of force.'

अशी परिस्थिती असताना ह्याचवेळी न्यूयॉर्क टाईम्सने अत्यंत गुपित ठेवलेली बातमी छापली, 'Raids on Combodia go unprotested'

ही बातमी छापलेली वाचल्याबरोबर निक्सनची व मिचेलची तळपायाची आग मस्तकाला जाऊन भिडली. जनतेला, काँग्रेसला व सिनेटला न विचारता कंबोडीयावर हल्ले सुरु केले होते हे गुपित

फोडण्याचा मान न्यूयॉर्क टाईम्सने मिळविला. व त्याबद्दल बक्षिस काय मिळाले तर ताबडतोब एक आठवड्याच्या आत स्वातंत्र्याविषयी निक्सन मिचेलला संशय होता अशा ११ सरकारी नोकरांचे, सिक्युरिटी कौन्सिलमधील ५ जणांचे व ४ वार्ताहरांचे फोन्स टॅप केले गेले.

विद्यार्थी वर्ग आतल्या आत धुमसतच राहिला.

३ सप्टेंबर १९६९ ला उत्तर व्हिएटनामच्या अध्यक्ष हो चि मिन्ह स्वर्गवासी झाला. त्याचे वय ७९ वर्षांचे होते आणि–

६ सप्टेंबर १९६९ ला व्हिएटनाममध्ये असलेल्या कम्युनिस्ट व अमेरिकन सैन्याधिकाऱ्यांनी युद्धबंदी जाहीर केली. परंतु त्यात खोचं अशी होती की दक्षिण व्हिएटनाम सैन्याधिकाऱ्यांनी आपली संमती दिली नव्हती.

ही जाहीर केलेली युद्धबंदी म्हणजे अमेरिकेच्या तरूण वर्गावर फेकलेली धूळफेक! आतून युद्ध चालूच होते, अमेरिकन सैन्य परत येत होते. युद्धात अमेरिकेची पिछेहाट होत होती.

१२ ऑक्टोबर १९६९ ला वार्ताहर परिषदेत बोलताना निक्सनने सांगितले की ह्या घडीला इंडोचायनामध्ये ५ लाख ४२ हजार ५०० अमेरिकन सैन्य आहे ते ३ वर्षाच्या अवधीत संपूर्णपणे अमेरिकेत परत आणले जाईल.

जनतेला आपण चांगलाच दिलासा दिल्याचे समाधान निक्सनला लाभले. परंतु विद्यार्थीवर्ग हा आतून चळवळ करीतच राहिला. कारण निक्सनच्या वक्तृत्वावर त्यांचा मुळीच विश्वास नव्हता. कसेतरी सहा महिने गेले. १९७० चा मार्च महिना उजाडला, आणि तरूण अमेरिकन क्रांतिकारक संघटकांनी अमेरिकेत निरनिराळ्या ठिकाणी बॉम्बहल्ले करावयास सुरुवात केली.

६ मार्च १९७० ला खुद्द न्यूयॉर्क शहरातील वेस्ट ११ स्ट्रीट वरील एका बसक्या घरातून बॉम्ब फोडल्याचे धडधड आवाज परिसरात ऐकू येऊ लागले. आजूबाजूची मंडळी येईपर्यंत त्या घरातून दोन तरूण स्त्रिया व तीन तरूण पसार झाले. ३ तरूण मुले मृत्युमुखी पडली. घर सपशेल बेचिराख झाले.

मानहाटीन ह्या भागात आम्ही बॉम्ब टाकणार आहोत अशी पत्रके फेकण्यात आली. एका आठवड्याच्या आत मानहाटीन ह्या शहरातून १५००० लोक घरेदारे सोडून बाहेर निघून गेले. २२ मार्चला २ ठिकाणी बॉम्ब फेकण्यात येऊन नासधूस करण्यात आली. पोलीस पहारा बसला. रात्रीच्या गस्ती सुरू झाल्या. झडत्या–धरपकड चालूच होती.

२३ जून १९७० ला कॅलिफोर्नियामधील सॅन रॅफेल येथे भर न्यायालयात दोन बॉम्ब टाकण्यात आले. न्यायाधीश व ३ माणसे दगावली.

५ जुलै १९७० ला व्हिसकॉनसिन युनिव्हर्सिटीमध्ये संशोधन खात्याच्या बिल्डींगमध्ये बॉम्ब टाकण्यात आला. १ विद्यार्थी व १ प्राध्यापक नाहक बळी पडले.

९ सप्टेंबर १९७० ला हारवर्ड युनिव्हर्सिटीत तोच प्रकार झाला. सरकारी पत्रकानुसार सबंध १९७० ह्या वर्षी अमेरिकेत ३०००० बॉम्बस्फोट झाले व राहते घर सोडून पन्नास हजारांच्यावर माणसे दूर गेली.

३० एप्रिल १९७० ह्यादिवशी निक्सननी रेडिओ व टेलिव्हिजन वरून जाहिरपणे सांगितले की कंबोडियावर अमेरिकन व दक्षिण व्हिएटनाम सैन्य चारी बाजूंनी आक्रमण करीत आहेत पण ते आक्रमण केवळ अमेरिकन सैन्य सुरक्षितपणे बाहेर काढून अमेरिकेत आणण्यासाठीच आहे.

१ मे उजाडला आणि प्रिन्सटन युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी मोर्चे काढले, सत्याग्रह सुरू केला, वर्गातून जाण्याचे बंद केले, सामानाची मोडतोड करण्यास सुरुवात केली.

ह्याच दिवशी वॉशिंग्टनजवळच्या मेरिलॅन्ड युनिव्हर्सिटीतील विद्यार्थ्यांनी दंगेधोपे करण्यास सुरुवात केली. शेजारच्या रिझर्व्ह ऑफिसर ट्रेनिंग कॅम्पमधील कार्यालय लुटले, तिजोऱ्या फोडून दहा हजार डॉलर्स लुटले. जाळपोळी केल्या. पोलीस बंदोबस्तात शभरच्या वर विद्यार्थी जखमी झाले.

ह्याच दिवशी कॉर्नेल फॅकल्टीमधील नॅशनल स्टुडन्टस असोसिएशनच्या विद्यार्थ्यांनी मोठमोठाले फलक हातात घेऊन मोर्चे काढले. निक्सनला शेकडो तारा पाठविल्या. 'युद्धबंदी जारी करा. कंबोडियावरील आक्रमण थांबवा.'

२ मेला ज्या ठिकाणी १९००० विद्यार्थी शिकत होते, ती केन्ट स्टेट युनिव्हर्सिटी विद्यार्थ्यांनी पेटवून दिली. ओहिओचा गव्हर्नर जेम्स होम्स ह्याने पायदळाची १४५ पलटण बंदोबस्तासाठी तिकडे रवाना केली. ५ मेपर्यंत ह्या कॅम्पसमध्ये १२ विद्यार्थी मेले व २४७ जखमी झाले.

ह्याच दिवशी लाँग इसलॅन्ड युनिव्हर्सिटीत विद्यार्थ्यांनी २ इमारतींना आगी लावल्या. लाखो डॉलर्स किंमतीच्या सामानाची नासधूस केली.

२ लाख ८० हजार विद्यार्थी शिकत असलेल्या कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीतील डिननी धोक्याची परिस्थिती दिसल्याबरोबर गव्हर्नर रोनाल्ड रीगन ह्याला टेलिफोनवरून लष्कर मागून घेतले व त्यांच्या ताब्यात युनिव्हर्सिटी देऊन टाकली.

३ मेला मेक्सिको युनिव्हर्सिटीमध्ये जाळपोळ, मारामाऱ्या सुऱ्याचे हल्ले ह्याला उत आला.

मिन्नीसोटाच्या युनिव्हर्सिटीमधील ४०,००० विद्यार्थीवर्गाने गव्हर्नरच्या बंगल्यावर मोर्चा काढला व निक्सनला हाकलून द्या अशा अर्थाची पत्रके वाटली.

कोलोरॅडो स्टेट युनिव्हर्सिटीमधून विद्यार्थीवर्ग आगी लावून बाहेर पडला. पोलिसांचा गोळीबार चालूच होता.

दक्षिण कॅरोलिना युनिव्हर्सिटीत आगी लावण्याचे, खजिना लुटण्याचे प्रकार फार मोठ्या प्रमाणावर झाले.

पेन्टॅगॉन, पोलीस दळ, नॅशनल गार्डस, लष्करी दळ युनिव्हर्सिटयांमधून संरक्षण देण्यासाठी बाहेर पडली.

४ मेला न्यूयॉर्क युनिव्हर्सिटीचा प्रेसिडेन्ट जेम्स हेस्टर याने अमेरिकेतील ३६ युनिव्हर्सिटयांचे प्रेसिडेन्टस व १०० कॉलेज डीन्स ह्यांचे सही केलेले पत्र निक्सनला धाडले. त्यात त्यांनी म्हटले होते, 'तरूण विद्यार्थीवर्गात फैलावत चाललेली नैराश्याची दखल वेळीच आपण लक्षात घेऊन निःसंदिग्ध शब्दांत व्हिएटनाममधील युद्ध बंद केल्याची घोषणा लवकरात लवकर केलेली चांगली.'

ह्या विद्वान मंडळींनी निक्सनभेटीची विनंती केली परंतु ती विनंती निक्सन, एहरलिचमन व मॉयनीहन ह्यांनी नाकारली.

अलास्का स्टेटचा गव्हर्नर वॉल्टर हिकेल ह्याला निक्सनने Secretary of Interior नेमले होते. १९६९ च्या पूर्वी ही जागा नव्हती. जॉन्सनच्या कारकीर्दीत मंत्रिमंडळ २१ मंत्र्यांचे होते, ते १९६९ मध्ये निक्सनचे ३० मंत्र्यांचे मंत्रिमंडळ झाले. वॉल्टर हिकेलनी मंत्रिपदावर आल्याबरोबर पहिल्या प्रथम फेडरल सरकारकडून कॅलिफोर्नियाच्या कोपऱ्यावरील सेंटा बार्बराच्या भागात युनियन ऑईल कंपनीला तेल काढण्याचे जे परवाने मिळाले होते ते रद्द केल्याचे जाहीर केले. तसेच चेव्हरॉन ऑईल कंपनीवर, ती मेक्सिकोच्या समुद्रधुनीत गलिच्छ व दोषाई तेल सोडते व त्यामुळे आजूबाजूच्या शंभर मैलांच्या परिसरात रोगराई फोफावली गेली असल्याचे नमूद करून त्या कंपनीवर खटले भरले.

वरील कृत्याबद्दल मिचेल कंपनी एकदम नाराज.

मंत्री झाल्यापासून, विद्यार्थ्यांनी चालविलेल्या चळवळीचा निक्सन राजवटीला धोका असल्याचे हिकेल नेहमीच म्हणत असे.

४ व ५ मेला निक्सनची स्वतंत्रपणे गाठ घेऊन त्याच्या कानावर आपले मत घालावे असा त्यांनी प्रयत्न केला परंतु त्यांच्यामध्ये मिचेल एहरलिचमन ही Berlin Wall नेहमीप्रमाणेच आडवी आली.

शेवटी ६ मेला त्याने निक्सनला एक स्वतंत्र पत्र लिहिले, व त्याची प्रत प्रसिद्धीसाठी न्यूयॉर्क टाईम्स व इतर दैनिकांकडे पाठवून दिली. ७ मे १९७० च्या अंकातून ते पत्र छापून आले. पत्रातील मुख्य सारांश असा होता की, विद्यार्थी वर्ग बिथरला आहे त्यांची समजूत घालून हिंसाचारापासून त्यांना परावृत्त करणे हे राष्ट्रपतीचे कर्तव्य आहे, ते टाळून चालणार नाही.

निक्सन, मिचेल, एहरलिचमन–सर्वजण एकदम भडकले.

ह्या पत्राने वॉल्टर हिकेल हा नकळत विद्यार्थीवर्गाचा नेता झाला. निक्सन शांतपणे विचार करीत होता. मंत्रिपदावरून हिकेलला काढून टाकण्यासंबंधी त्याला सल्ला दिला गेला पण तसे ताबडतोब करणे म्हणजे विद्यार्थी चळवळीला अधिक उत्तेजन दिल्यासारखे होईल म्हणून त्याने नाद सोडून दिला.

हिकेलचा १९ वर्षांचा मुलगा जॅक हा सॅनफ्रान्सिस्को युनिव्हर्सिटीत शिकत होता. त्याची व हिकेलची सी. बी. एस. नी ७ मेला टेलिव्हिजनवर मुलाखत घेतली, त्यात दोघांनीही स्पष्ट सांगितले की, निक्सननी विद्यार्थ्यांच्या विचारसरणीचा सहानुभूतीने विचार केला पाहिजे व कम्बोडियावरील आक्रमण थांबवून अमेरिकन सैन्य स्वदेशी परत आणले पाहिजे.

८ मे १९७० ह्या दिवशी रात्री ८॥ वाजता निक्सनचे टेलिव्हिजनवर भाषण होणार असल्याचे जाहीर झाले.

२६ सप्टेंबर १९६९ ला विद्यार्थी चळवळीविषयी म्हणताना निक्सन म्हणाला होता–कोणत्याही परिस्थितीत अशा चळवळींनी दबून जाणारा मी राष्ट्रपती नव्हे.

तोच निक्सन आज ८ मे १९७० ला टी. व्ही. वर अत्यंत नम्रपणे सांगू लागला, 'विद्यार्थी वर्गाला शांतता पाहिजे आहे, व्हिएटनाममध्ये ह्यापुढे एकही अमेरिकन सैनिक मारला जाऊ नये एवढेच नव्हे तर सर्व अमेरिकन सैन्य मायभूमीला परत ताबडतोब आणले जावे, ही त्यांची इच्छा आहे. मी ह्या सर्व गोष्टी जाणतो आणि मी आज असे आश्वासन देतो की, ह्या तिन्हीही गोष्टी ताबडतोब अंमलात कशा येतील ह्याविषयीच माझे चिंतन चालू आहे व योग्य वेळी मी ते करून दाखवीन.'

६ मे १९७० पासूनच निरनिराळ्या युनिव्हर्सिटयांमधील विद्यार्थ्यांचे मेळावे भव्य आणि मोठमोठाले फलक घेऊन निक्सनचा धिःकार करण्यासाठी वॉशिंग्टनमध्ये जमा झाले होते. प्रकरण हाताबाहेर गेलेले आहे हे निक्सननी पूर्ण जाणले. वॉशिंग्टनमध्ये तासातासाला विद्यार्थ्यांची संख्या वाढतच होती. ८ मेच्या दिवशी संध्याकाळी एक लाखाच्या वर विद्यार्थी जमा झाले. मिरवणुका निघत होत्या, निक्सनच्या धिःकार आरोळ्या स्वतः निक्सनच्या कानावर व्हाईट हाऊसमध्ये पडत होत्या. पोलीस बंदोबस्त वाढत होता परंतु दंगेधोपे झाले तरच गोळीबार करायचा; नाही तर शांतपणे परिस्थिती काबूत ठेवावयाची असा हुकूम दिला गेला होता.

भव्य लिंकन मेमोरियलच्या भोवती विद्यार्थी सर्व बाजूने आराम घेत होते. काही विद्यार्थी आळीपाळीने जागे राहून पाहारा देत होते. २ दिवस हिंडून हिंडून व आरडाओरडा करून दमून गेल्यामुळे रस्त्यारस्त्यांवरून, बगिच्यातून व मोकळ्या मैदानातून विद्यार्थी झोपलेले होते.

दुसऱ्या दिवशीचा काय कार्यक्रम होता ते त्यांचे त्यांनाही माहीत नव्हते. ८ मेला रात्री ८॥ वाजता निक्सनचे टी. व्ही. वरील भाषण संपले. वॉशिंग्टनमध्ये १ लाख विद्यार्थ्यांचा पसरलेला सागर निक्सनला तीव्र वेदना देत होता. कावऱ्याबावऱ्या स्थितीत तो आपल्या शयनगृहात घुसला. गळ्याभोवतालचा टाय सैल करीत मनाशीच तो काहीतरी पुटपुटत होता. कोटाची दोन बटणे काढून अंगातला कोट काढून तसाच तो शेजारच्या कोचावर त्याने फेकून दिला.

९–२२ ला टेलिफोनचे नळकांडे हातात घेऊन त्याने किसिंजरला फोन केला. नंतर स्वतःची लाडकी लेक ट्रिशिया, नंतर सेक्रेटरी ऑफ स्टेट रोजर्स नंतर......

किती? पुरा एकेक मिनिट देखील तो टेलिफोन करत नव्हता. काय बोलत होता व कशाविषयी बोलत होता–काहीकाही म्हणून कळत नव्हते. रात्री १०–३५ ला टेलिफोन करण्याचा निक्सनने जो सपाटा लावला तो काही विलक्षणच. त्या रात्रीचे टेलिफोन लॉग बुक काय दाखविते ते पाहा.

### टेलिफोन लॉग बुक ८-९ मे १९७०

| | | |
|---|---|---|
| ९–२२ | रात्री | हेन्री किसिंजर |
| १०–३५ | ,, | रोझ मेरी वुड्स |
| १०–३७ | ,, | हल्डमन |
| १०–३९ | ,, | मिसेस निक्सन |
| १०–५० | ,, | डॅट नॉर्मन पील |
| १०–५६ | ,, | सेक्रेटरी जॉन व्होल्पे |
| १०–५९ | ,, | कॉंग्रेसमन फालटन |
| ११–०२ | ,, | वुइल्यम सफायर |
| ११–०७ | ,, | सेक्रेटरी जॉर्ज युएल्स |

| | | |
|---|---|---|
| ११–११ | रात्री | हेन्री किसिंजर |
| ११–१४ | ,, | रेव्हरंड बिली ग्रॅहॅम |
| ११–२१ | ,, | व्हिरा लिचमन |
| ११–२६ | ,, | हल्डमन |
| ११–२८ | ,, | वॉल्टर हिकेल |
| ११–३१ | ,, | रोझ मेरीवुडस |
| ११–३४ | ,, | डॉ. डॅनियल मोयनीहन |
| ११–४० | ,, | हल्डमन |
| ११–५० | ,, | क्लिफ मिलर |
| १२–०३ | ,, | रोझ मेरीवुडस |
| १२–१८ | ,, | हल्डमन |
| १२–२४ | ,, | हेन्री किसिंजर |
| १२–२९ | ,, | दुय्यम सेक्रेटरी जॉन्सन |
| १२–३३ | ,, | हेन्री किसिंजर |
| १२–४६ | ,, | हल्डमन |
| १२–४७ | ,, | रॉन झिगलर |
| १२–४८ | ,, | पॅट्रिक बुलसमन |
| १२–५८ | ,, | गव्हर्नर नेलसन रॉकफेलर |
| १–०७ | ,, | हरबर्ट क्लीन |
| १–१३ | ,, | मॅन्सी निकलसन् |
| १–१५ | ,, | रॉन झिगलर |
| १–२२ | ,, | हेलेन थॉमस |
| १–२६ | ,, | रेबेझो |
| १–२९ | ,, | मिचेल |
| १–३१ | ,, | गव्हर्नर थॉमस डिवे |
| १–४१ | ,, | हल्डमन |
| १–५१ | ,, | रोझ मेरी वुडस |
| १–५५ | ,, | हेन्री किसिंजर |
| ३–२४ | ,, | पॉल क्रिस |
| ३–३८ | ,, | डॉ. हेन्री किसिंजर |
| ३–४७ | ,, | रॉन झिगलर |
| ३–५० | ,, | हेलेन थॉमस |

आणि ९ तारखेच्या पहाटेचा शेवटचा टेलिफोन निक्सनने ४–२२ ला केला तो त्याचा विश्वासातला नोकर तळमजल्यावर होता त्याला मिनोला सांचेझ यास.

त्या रात्रीचे टेलिफोन पाहिले म्हणजे निक्सनच्या मनाची स्थिती चटकन ध्यानात येते.

रात्रीचे झोपावयाचे कपडे घालून तो अंथरुणावर आडवा झाला. तळमळ तळमळ चालू होती. केव्हा डोळा लागला ते त्याचे त्यालाच कळले नाही. २॥ वाजता जाग आली. पुन्हा तो उठला आणि हातात टेलिफोनचे नळकांडे घेऊन फोन करणे सुरू. पुन्हा तीच माणसे. तेच बोलणे. काहीसुद्धा फरक नाही.

३ वाजून ५० मिनिटांनी केलेला शेवटचा टेलिफोन हेलेन थॉमसला होता. रात्रीचे अंगावर चढविलेले कपडे त्यांनी काढून टाकले व दुसरा चांगला लोकरीचा सूट घातला.

खुर्चीवर काही वेळ शांतपणे बसून त्याने मनगटावरील घड्याळाकडे नजर टाकली. ४ वाजून २२ मिनिटे झाली होती.

त्याने तळमजल्यावर राहणारा आपला विश्वासू नोकर मिनेलो सांचेझ ह्याला टेलिफोनवरून वर बोलावून घेतले. सांचेझनी लिनोझ गाडी दक्षिण दिशेच्या हिरवळीवर आणून उभी केली. सर्चलाईटचा उजेड पडल्याकारणाने आजूबाजूस गुप्त पहारेकरी खडबडून जागे झाले. एहरलिचमनला वर्दी गेली. त्याने एजिलक्रोनला व्हाइट हाऊसकडे ताबडतोब पिटाळले पण तो पोहोचण्याच्या अगोदरच निक्सनची गाडी बाहेर निघून गेली होती.

४–३५ वाजता निक्सन एकटाच व्हाईट हाऊसमधून निघाला तो थेट लिंकन मेमोरिअलपाशी येऊन थडकला. आतापर्यंत इतक्या शांतपणे त्याने लिंकन मेमोरिअलच्या भव्य कमानीवर कोरून ठेवलेली अक्षरे वाचली नव्हती. प्रकाशाच्या झोतामध्ये त्याने ती आता वाचली; मोठ्याने वाचली व तो आपल्याशीच हसला–

'In the temple, as in the hearts of the people for whom he saved the Union, the memory of Abraham Lincoln is enshrined forever.'

अवतीभोवती सगळीकडे विद्यार्थीच विद्यार्थी निजलेले त्याला दिसले. एका कोपऱ्यात ८ विद्यार्थी उभे राहून जागता पहारा देत होते. ती ८ विद्यार्थ्यांची टोळी सिरॅक्यूज ह्या युनिव्हर्सिटीत शिकणाऱ्यांची होती. त्यांच्याशी उभ्या उभ्याच निक्सन बोलत होता. त्यांच्यापैकीच दोघांनी पलीकडच्या बाजूला कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांच्या टोळीचे लोक निजले होते त्यांना उठवून आणले.

निक्सन स्वतः लिंकन मेमोरिअलपाशी आलेला आहे ही वार्ता वणव्यासारखी विद्यार्थीवर्गात पसरली. सगळ्यांना आश्चर्याचा धक्का बसला. सगळीकडे एकच गडबड गोंधळ.

जवळ जवळ पाऊण तास निक्सन तेथे होता. विद्यार्थ्यांची समजूत घालणे चालले होते. निक्सनशी बोलण्यापेक्षा त्याच्याशी हस्तांदोलन करण्यासाठीच झुंबड. काय बोलावे, काय करावे, हेच कुणास सुचेना.

व्हिएटनामवर काही विद्यार्थी प्रश्न विचारीत होते. त्यांना त्यांनी खालील प्रमाणे उत्तर दिले :

'My goal in vietnam is to stop the killing and end the war. Not get into Combodia but to get out of Vietnam.'

चायना, हिंदुस्थान, मलेशिया, रशिया यांच्याविषयी निरनिराळे विद्यार्थी निरनिराळ्या प्रकारांनी प्रश्न विचारीत होते. निक्सन त्यांचे व्यवस्थितपणे उत्तर देऊन समाधान करीत होता.

बरोबर आलेला सांचेझ पुन्हा पुन्हा सांगत होता की, मोटार उभी आहे. त्यात आपल्याला कोणीतरी बाहेरून टेलीफोन करीत आहे, तो घ्यावा पण निक्सनचे बोलणे चालूच होते.

## ती रात्र निक्सनने पूर्ण जागूनच काढली....

बाहेरच्या जगाकडे न पाहता अमेरिकाच सुधारावी, व राष्ट्रपतींनी आपले आयुष्य त्यातच खर्च करावे, असे एका विद्यार्थ्याने सुचविले. त्याला उत्तर देताना निक्सन म्हणाला, 'मला तुमचे म्हणणे जरूर पटते. इतके जरी सगळे केले तरी देखील काहीतरी शिल्लक राहणारच. मला आठवतं ४० वर्षापूर्वी माझी वृत्ती तुमच्या तरुण विद्यार्थ्याच्या सारखीच होती. तुमच्या म्हणण्याप्रमाणे सर्व गोष्टी झाल्या आहेत, असे घटकाभर मानले. तरीदेखील अध्यात्मिक इच्छा ही शिल्लक राहते. ती भूक भागविणे व कधी भागविता येईल हे पाहणे, हे आपले सर्वांचे आद्य कर्तव्य आहे, असे तुम्हास नाही का वाटत?'

दोन दोन हजार मैल लांबीवरून महाविद्यालयीन विद्यार्थी वॉशिंग्टनला आले होते. ते निक्सनचे आध्यात्मिक वादावरील निरूपण ऐकण्यासाठी आले नव्हते. त्यांना युद्धबंदी पाहिजे होती. दुसरे काहीही नको होते. अमेरिकेचे तरुण, देशाचा काहीही फायदा नसताना, दहा हजार मैलांवरील कोणतातरी एक देश स्वतंत्र राहण्यासाठी धडपडत असताना रणांगणावर मारला जातो आहे, हे त्यांना सहन होत नव्हते. त्यांच्या दृष्टीने मागील चार राष्ट्रपतींनी दोन लाख तरुणांची हत्या व्हिएटनाममध्ये काहीही फायदा नसताना करविली आणि निक्सन त्यांचीच री ओढत आहे.

६ वाजून ३२ मिनिटांनी निक्सन आपल्या मोटारीतून निघाला तो वॉशिंग्टनच्या काही भागांतून हिंडून मे फ्लॉवर हॉटेलमधील रिब रूममध्ये गेला. तिथे त्याला कोणीच ओळखीचे भेटले नाही, किंवा दुसऱ्या कोणी त्याला ओळखले नाही.

व्हाईट हाऊसमध्ये ६॥ वाजता सकाळी एकच गोंधळ. मे फ्लॉवर हॉटेलमध्ये खाऊन पिऊन निक्सन व्हाईट हाऊसमध्ये ७॥ वाजता परतला. निक्सनच्या ह्या विद्यार्थ्यांच्या मध्ये मिसळण्याचा कांहीच परिणाम झाला नाही, हे पुढील घटनावरून ध्यानात येण्यासारखे आहे.

१५ मे ह्या दिवशी सकाळी मिसीसिपी येथील जॅक्सन स्टेट कॉलेजमध्ये निग्रो विद्यार्थ्यांनी दंगाधोपा करण्यास सुरुवात केली. बंदोबस्त ठेवण्यासाठी गोळीबार झाला. त्यात ४ विद्यार्थी दगावले. व २२ विद्यार्थ्यांना जबर जखमा झाल्या.

२० मे ला अमेरिकेतील २० निग्रो कॉलेजच्या मुख्याध्यापकांनी निक्सनची व्हाईट हाऊसमध्ये मुलाखत घेतली. ओहिओच्या सेंट्रल स्टेट युनिव्हर्सिटीचा मुख्य प्रेसिडेंड हार्मन ब्रॅनसन ह्याने निक्सनला स्पष्टपणे सांगितले :

The increasing alienation of black-youths is being blamed in no small part of the policies and practices of your administration and especially the rhetoric of spiro Agnew and John Mitchell.'

'Health, Education and Welfare' म्हणजेच HEW. ह्याचा सेक्रेटरी डॉ. ॲलन याने हेकेलच्या ७ मेच्या वक्तव्याप्रमाणे निक्सनकडे धाडण्यासाठी एक पत्र तयार करून ठेवले. २१ मे ला त्याला एहरलिचमनने बोलावून घेऊन सांगितले की, फेडरल सरकारने शिक्षण खात्यावर चालू वर्षी १५० कोटी डॉलर अधिक खर्च करण्याचे ठरविले आहे. कंबोडियावरील आक्रमण व विद्यार्थ्यांची चळवळ ह्याविषयी एहरलिचमन काहीच बोलला नाही.

डॉ. ॲलन चिडला, संतापला. त्याने आपल्या पदाचा राजीनामा पाठवून देण्याचे ठरविले. त्यावेळी त्याच्या खात्याचा मुख्य रॉबर्ट फिच होता, त्याला भेटण्यासाठी तो वॉल्टर रिड आर्मि हॉस्पिटलमध्ये गेला. बराच वेळ बोलणे चालणे झाले.

५ जूनला सकाळी ८ वाजता रॉबर्ट फिचनी आपल्या कार्यालयात डॉ. ॲलनला बोलावून घेतले.

फिच म्हणाला : आपल्याकडून नोकरीचा राजीनामा घेण्यास मला सांगण्यात आले आहे.

डॉ. ॲलन म्हणाला : मग तो कंबोडीया प्रकाराबद्दल असावा?

डॉ. फिच म्हणाला : होय. माझा असा अंदाज आहे.

एवढ्यावरच बोलणे संपले. डॉ. ॲलन निघून गेला. फिचने त्याला दहा वाजेपर्यंत त्याचे लेखी निवेदन आणून देण्याची विनंती केली होती. डॉ. ॲलन तिकडे फिरकलाच नाही.

दुपारी व्हाईट हाऊसमधून सरकारी जाहीर खबर बाहेर पडली. त्यात म्हटले होते. डॉ. ॲलननी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.

त्याची इच्छा असूनही पुढील ४ दिवसात डॉ. ॲलनला फिच यास भेटता आलं नाही.

पुढे २० जूनला निक्सनने रॉबर्ट फिचची राष्ट्रपतींचा सल्लागार म्हणून नेमणूक केली.

५ जून १९७० ला FBI., CIA., NSA., (National Security Agency) DIA (Defenee intelligence Agency) ह्या संघटनेचे प्रमुख निक्सनने व्हाईट हाऊसमध्ये बोलावून घेतले व त्याच्यापुढे विद्यार्थ्यांच्या चळवळी दडपून कशा टाकावयाच्या ह्याची योजना मांडली. ह्या गुप्त बैठकीत काय घडले ह्याचा अंदाज न्यूयॉर्क टाइम्सने आपल्या ७ तारखेच्या अंकात दिला तो असा :

'Nixon has envisaged an American domestic espionage apparatus of a nature and scope unprecedented in the American process of democracy.

Burglary, breaking in, illegal entering, wire tapping all such practices-legal & illegal would, by this plan, be used against American private citizens to protect the State and large public interest, against unknown terrorists.'

'National Security' राष्ट्रीय सुरक्षितता, या गोंडस व बाळसेदार शब्दांखाली गादीवर आरुढ झालेल्या पक्षाला राजकारणामध्ये कुठेही आणि कशीही विरुद्ध पक्षाची लांडगेतोड आणि कुतरओढ करता येते, असे हे एक दिव्य अस्त्र आणि शस्त्र!

सेक्रेटरी ऑफ स्टेट किसिंजर ह्यानेही निक्सनची री ओढण्यास सुरुवात केली. तो म्हणाला— They had driven out one President from office. They had broken Johison's will and are they going to break another President now?'

विद्यार्थ्यांमध्ये अशी वैफल्याची भावना का झाली, अशा चळवळीचा फैलाव का झाला याची चौकशी करण्यासाठी व्हाईट हाऊसने Scanton Commission स्कॅन्टन कमिशन नेमले. वुल्यम वॉरन स्कॅटन हा पूर्वी पेन्सिल्व्हानियाचा गव्हर्नर होता व तो अशा चळ-

वळींचा विरोधक होता, हे युनिव्हर्सिटीतील विद्यार्थी व प्राध्यापक या सर्वांना माहीत होते.

या कमिशनमध्ये जोसेफ ऱ्होडंस' बावीस वर्षांचा विद्यार्थी पुढारी हुस्टेन (California University) हॉवर्डचा प्रेसिडेंट चेक, पोलीस प्रमुख एरन, ह्या मासिकांचा संपादक अेह्‌रिन कॅनम, स्टॅनफोर्डचा मॅनिम हे सभासद होते.

व्हिएटनाम युद्ध न थांबविल्यामुळे अमेरिकेतील विद्यार्थी जगत नाराज झाले होते म्हणूनच दंगेधोपे झाले. जाळपोळी झाल्या.

२० जुलैला दिलेल्या मुलाखतीत निक्सनने सांगितले की विद्यार्थी वर्गात शांतता जरूर पाहिजे आहे. परंतु त्याहीपेक्षा जगात शांतता प्रस्थापित करणे हे मी अधिक महत्त्वाचे समजतो. आणि त्यानंतर लगेच दहा दिवसांनी दिलेल्या मुलाखतीत निक्सन म्हणतो विद्यार्थ्यांच्या विध्वंसक चळवळीचा दोष सरकारवर ठेवणे व तो देखील युनिव्हर्सिटीतील शिक्षक वर्गाने ठेवणे, हे अत्यंत घातुक व तिरस्करणीय आहे.

आग धुमसतच होती. ह्या मुलाखतीने ती विझली नाही. परिस्थिती अधिकच चिघळण्याची लक्षणे दिसू लागली, परंतु २० जून ते १५ सप्टेंबरपर्यंत अमेरिकेतील सर्व युनिव्हर्सिटया बंद असल्यामुळे आता तरी सर्व ठिकाणी स्मशानी शांतता दिसत होती. व्हाईट हाऊसमध्ये नेहमीच निक्सनचा उपदेश असे की,

'When the nation is hot, keep rhetoric cool'

राज्यकर्त्यांच्याकडून राज्यकारभारात न कळत काही चुका घडल्या तर ते दोषार्ह नाहीत. पण जाणून बुजून, सुड बुद्धीने किंवा अविचारीपणाने राज्यकर्ते जिद्दीला पेटून काही वेळेला अशा अक्षम्य घोडचूका करून ठेवतात की त्यांची पुढे निरवानिरव करणे दुरापास्त होऊन बसते व त्याचे परिणाम दुरागामी ठरतात.

तशातलेच अमेरिकेत विद्यार्थ्यांनी केलेल्या उठावानंतर घडलेले एक 'हुस्टेन' प्रकरण.

१९ वर्षांचा असल्यापासून विद्यार्थ्यांच्या चळवळीत पडलेला हुस्टेन Army Intelligence खात्यात नोकरीला राहिला. दिसावयाला रुबाबदार, दुसऱ्यावर झटकन छाप टाकणारा, बोलून गार करणारा, हुस्टेन, पॅट्रीक बुचानन ह्याच्या संगतीत आला. व व्हाईट हाऊसच्या Executive office Buildiny मध्ये त्याच्या खात्यात बातमीपत्रे चुरचुरीत व नीटस् लिहिण्याच्या कामावर लागला. बुचानन मार्फत ह्याने हल्डमनची ओळख करून घेतली व राष्ट्रपतीच्या Speech writers च्या ताफ्यांत तो घुसला. आर्मी Intelligence मध्ये असल्यापासूनच त्याच्या मनाने घेतले होते. की, अमेरिकेत अंतर्गत शत्रु फार वाढले आहेत. त्यामुळे राज्यकारभार धडपणे चालत नाही. १ जुलै १९६९ ला अमेरिकेतील ज्या ध्येयवादांवर आधारभूत झालेल्या संस्था आहेत त्यांच्या हिशोबठिशोबावर कडक नजर ठेवण्यासंबंधी हुस्टनने आय. आर. एसच्या १३ प्रमुख ऑफिसर्सची बैठक घेतली. अमेरिकेत सत्त्याहत्तर अशा संस्था आहेत की, ज्यांच्यावरती आपण कडक नजर ठेवली नाही, तर तो राष्ट्राला धोका आहे, असे त्याचे म्हणणे. काम जोरात सुरू झाले. १९७० मध्ये बॉंब प्रकरण, विद्यार्थ्यांचा संप, चळवळी, जाळपोळी, नंतर निग्रो जनतेच्या धमक्या, व दहशतीला उत्तेजन ह्या गोष्टींनी अमेरिकेचे राजकारण गढूळ झाले होते. अशा वेळी आपण कर्तृत्व करून दाखविले पाहिजे. ह्या विचाराने भारलेला हा महत्त्वाकांक्षी तरुण हुस्टन पुढे पुढे सरकत होता.

टॉम चार्लस हुस्टन ह्याचे ह्यावेळी वय फक्त २९ वर्षांचे. बॉब हल्डमनच्या कृपेने ही व्यक्ती व्हाईट हाऊसमध्ये शिरली व थोडक्याच महिन्यात super police होऊन बसली.

५ जून १९७० ला निक्सनने बोलाविलेल्या F. B. I. वगैरेच्या गुप्त बैठकीला हल्डमन बरोबर टॉम हुस्टेनपण गेला होता. त्या बैठकीत ठरल्याप्रमाणे ७५ वर्षांचा जे. एडगर हुवेर (F. B. I. चा प्रमुख), राजकारणांतला मुरब्बी ह्यास Action Committee चा अध्यक्ष व हुस्टेन कार्यवाह अशा नेमणुका करण्यात आल्या. अध्यक्ष डोईजड होऊ नये म्हणून त्याला हुस्टेन हा तरुणबांड अननुभवी हल्डमनने मदतनीस म्हणून दिला. हे खरे कारण– परंतु झाले भलतेच. रोजचे अहवाल निक्सनकडे जात. त्यावर हुस्टेन सह्या ठोकत असे.

हुस्टेन एका रात्रीत मोठा माणूस झाला. त्याला सर्व ज्ञान प्राप्त झाले. 'मी–मी' म्हणणाऱ्यांची अक्कल हुषारी त्याच्यापुढे फिक्की पडली. एक आठवड्याच्या अहवालानंतर त्याने जो अहवाल खरडला त्यात लिहून टाकले की, देशामध्ये परकीय शत्रूचे हेर फिरत आहेत. प्रत्येक संरक्षित भागात त्याची व्यवस्थित टेहेळणी चालू आहे. C.I.A., F.B.I, ह्या संस्था काहीही काम करीत नसून उगीचच हत्तीसारख्या पोसल्या जात असून त्यावर सरकारी तिजोरीतून भरमसाठ पैसा खर्च होत आहे. तेव्हां हे सर्व काम व्हाईट हाऊसनेच आपल्या कक्षेत घेतले पाहिजे.

हे इतके अफाट ज्ञान ह्या २९ वर्षांच्या तरुणाला कसे झाले ह्याविषयी गुपितपणे व्हाईट हाऊसमध्ये चर्चा सुरू झाली. कोणालाच कल्पना नव्हती की, हा एक हल्डमनचा चमचा आहे. त्याच्या बुद्धिमत्तेची कल्पना हल्डमनने निक्सनच्या कानांवर घातलेलीच होती. सी. आय. ए., एफ. बी. आय., सैन्यातील गुप्त संदेश संस्था एन. एस. ए, डी. आय. ए., ह्या संस्थांतून त्याला मुक्त संचार! ह्यापेक्षा आणखी लायकी पत्र कोणते पाहिजे ?

Intelligence Departments मधून ताबडतोब कोणत्या सुधारणा करावयास पाहिजेत ह्या संबंधीचा एक महत्त्वाचा अहवाल १४ जुलैला हुस्टेनंनी सही केलेला त्यावर हल्डमनचे शिक्कामोर्तब झालेले असा निक्सनकडे गेला. निक्सनने ताबडतोब पसंतीचा शेरा मारला. छोटीशी सही केली आणि परत पाठविला.

असा होता तो अहवाल Hustion Memo.

Name : National Security Agency:—

'The code–cracking and cryptographic worldwide surveillance arm of U. S. A. would be allowed to intercept the cables or correspondence of any

**आग धुमसतच होती. या मुलाखतींनी ती विझली नाही.**

American citizen communicating overseas. All intelligence agencies are now empowered to penetrate or spy on individuals and groups who pose a major threat to the internal security of U. S. A.

Restriction on legal ' Coverage ' of domestic mail between Americans were to be removed. Government would be empowered to barglarize and enter private homes, by a doctrine of justified surreptitious entry. All restraints which limit this coverage are to be removred. '

ह्या मेमोबरोबर एक पत्र छापले होते. ते असे : The president has assigned to Tom Charles Huston staff responsibility for domestic intelligence and internal security affairs. '

२३ जुलै १९७० ला हुस्टेन मेमोच्या प्रति अमेरिकेतील झाडून सह्या Intelligence खात्याच्या कार्यालयाकडे रवाना झाल्या.

ह्या अशा मेमोवर वास्तविक अमेरिकेच्या अध्यक्षांची सही पाहिजे. पण ह्या पाठविलेल्या मेमोवर ' For president ' म्हणून हुस्टेनची स्वतःचीच सही होती. खरा भाग्यवान प्राणि !

ह्या मेमोची अंमलबजावणी १ ऑगस्टपासून होणार होती. ४ दिवसानंतर म्हणजे २७ जुलैला ह्या मेमोची प्रत F. B. I. चा एडगर हुवेर ह्याच्या पहाण्यात आली. तो मिचेलला भेटला. आपल्यावर शेकायला नको म्हणून तो प्रत घेऊन निक्सनला भेटला. निक्सनने नाराज झाल्याचे दर्शविले. मिचेलनी ताबडतोब निक्सनच्या सहीची पत्रे तयार करवून घेऊन ' Memo revoke ' केल्याचे कळवून आपणाकडे तो मेमो परत पाठवून द्यावा असे लिहिले. काही जणांनी मेमो मिचेलनकडे परत धाडून दिले. काहीनी दाबून ठेवले.

आठवड्यातच हुस्टेनची हाऊसमधून उचलबांगडी झाली खरी पण इतिहास जमा झालेल्या मेमोमधील ' National Security ' राष्ट्रीय संरक्षण हे शब्द निक्सनच्या मेंदूत कायमचे घर करून राहिले.

लेखक व्हाईट या प्रकरणावर प्रकाश टाकताना म्हणतो :


' In the White House by 1970. Policy had bubbled from the bottom up into a decision at the top that tore apart the fabric of both Law & Constitution. '

अमेरिकेची मूळ घटना (Constitution) प्रस्तावना preamble आणि नंतरचा १२ पुसत्या Amendment ह्या ब-याच ठिकाणी एकमेकाविरुद्ध केल्या गेलेल्या, व एकमेकांशी असंबंध अशा आहेत. व त्याच्यातूनच पळवाटा मिळत असतात. आणि राज्यकर्ते त्यांचा आश्रय घेऊन कायदेभंग करीत असतात. सिव्हिल वारच्या-वेळी राष्ट्रपती लिंकनने नाही का Writ of Habeas Corpus बाजूला फेकून दिले ?, कशासाठी ? Common Defence, NATIONAL SECURITY-domestic surveillance Peace and Tranguility etc.

१९७० मध्यापासून निक्सनच्या राज्यकारभाराची दिशा बदलली, धोरण बदलले, निक्सन व निक्सनची प्रभावळ घटनाबाह्य वर्तन कसे करावयाचे हाच विचार करू लागली. व त्यातूनच पुढे आय. टी. टी. व वॉटरगेट ह्यासारखी प्रकरणे उदभवली तेव्हा त्या प्रकरणांचाच आपण आता मागोसा घेऊ या.

[ क्रमशः ]


## प्रसिद्ध झाले !



लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

लेखक : पु. ल. इनामदार

मूल्य : वीस रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०

कथा

# आपले लोक

यशवंत देशपांडे

दहा पंधरा हजार वस्तीचं तालुक्याचं लहानसं गाव. त्याला साजेसा छोटासा बसस्टँड, आणि दूर बाजारापर्यंत जाणारी सडक. फिरायला जायचं म्हटलं तर सडकेनं एखादा मैल लांब बस आगारापर्यंत. तिथंच बाजूला इमारत आणि दळणवळण खात्याचं टुमदार गेस्ट हाऊस!, महिना महिना रिकामं पडलेलं!

आज मात्र गेस्ट हाऊसवर हालचाल दिसत होती. सकाळीच सहा वाजता कडक कपडे घातलेल्या ट्राफिक पोलिसानं गेस्ट हाऊसला मुख्य सडकेशी मिळवणाऱ्या अॅप्रोच रोडवर येऊन रहदारीचं नियंत्रण करायला सुरुवात केली होती. गावातल्या सायकल रिक्षा, चार दोन जीप्स आणि क्वचित एखादी अँबेसेडोर, गेस्ट हाऊसकडे जाताना दिसत होती. कधी नव्हे ते बस आगारातून गाड्या वेळेवर निघत होत्या. अन् त्यामुळे बसस्टँडवर अनेकांच्या चुकत होत्या.

याला कारणही तसंच जबरदस्त होतं.

पालकमंत्री आबासाहेब आज गेस्ट हाऊसला होते. कालपासून त्यांचा मुक्काम इथंच होता.

आबासाहेबांचं बालपण याच परिसरात गेलं होतं. त्यांचं मॅट्रीकपर्यंतचं शिक्षण याच गावी झालं होतं. पुढे त्यांचं कार्य, राजकीय कर्तृत्व यांना याच परिसरात बहर आला होता. या भागातलं गाव न् गाव त्यांनी पायी फिरून पाहिलं होतं. याचा परिणाम व्हायचा तोच झाला होता. निवडणुकीत प्रतिस्पर्ध्याला सणसणीत लोळवून त्यांनी विधानसभेवर धडक मारली होती. त्यांची धडक एवढी जोरदार होती की, मंत्रिपद त्यांच्याकडे आपोआप चालून आलं होतं.

तालुक्यात आजतागायत त्यांच्याएवढा कर्तृत्ववान पुरुष निपजला नव्हता!

गावातली गडबड जोशी मास्तरांच्या इथे पण दिसत होती. त्यांच्याकडे भल्या पहाटेपासूनच माणसं येणं सुरू झालं होतं. आबासाहेबांना भेटायला येणाऱ्या सर्वांची सोय गावात कुठे नसली तरी जोशी मास्तरांकडे होत होती.

'आहेत का जोशी गुरुजी घरात?' पहाटे चारलाच दारावर थाप पडली. डोळे चोळत चोळत जोशी मास्तरांनी दार उघडलं. दारात अण्णा उभे होते. आबासाहेबांचे साडू!

'या! या!! या!!!' लगबगीनं जोशी मास्तरांनी अण्णांचं स्वागत केलं. धोतराचा सोगा सावरीत अण्णा आत आले. मास्तरांची चार लहान मुलं गादीवर आडवी तिडवी पडली होती. अन् पहाटेच्या साखरझोपेत गुंग झाली होती.

त्यांना बाजूला सारून मास्तरांनी तिथंच उभी करून ठेवलेली घडीची खुर्ची सरळ करून अण्णांना बसायला दिली.

तारवटलेले डोळे साफ करीत अण्णांनी म्हटलं, 'तीन वाजले बघा! साहेबांकडे गर्दीच फार. चार शब्द बोलायचे म्हटलं तर निवांत नाही. शेवटी आत्ता वेळ मिळाला. आता, जाता जाता वाटलं, गुरुजींकडचा झक्क चहा घेऊनच पहिली S. T. गाठावी.'

'वा! वा!, बरं केलंत. घर आपलंच आहे.' जोशी ओशाळेपणानं उत्तरले. मग त्यांनी तिथंच झोपलेल्या आपल्या, थोरल्या मुलीला उठवलं. म्हणाले, 'कुसूम, ऊठ. आत जाऊन आईला चहा ठेवायला सांग. म्हणावं, अण्णा आले आहेत.'

आतमधे तोवर जाग आली होती. मास्तरांच्या बायकोनं स्टोव्ह पेटवून चहाचं आधण ठेवलं.

अन् मग मास्तरांच्या इथं चहाचं आधण उकळतंच राहिलं.

कारण पुन्हा सकाळी सहा वाजता आबासाहेबांना भेटायला जाणारांची वाट जोशी मास्तरांच्या घरावरून जात होती. कुणाला तोंड धुवायचं होतं. कुणाची आंघोळ व्हायची होती. त्यांना मंजन आणि साबण देता देता मास्तरांची बायको मेटाकुटीला आली. मॅट्रीक झालेली कुसूम त्या सर्वांना चहा देता देता त्यांच्या सहेतुक नजरा आपल्या अंगावर झेलत होती. जोशी मास्तरांना हे सर्व दिसत होतं. कळत होतं. मनातून त्यांना वाटत होतं, 'सालं सर्वांना हाकलून लावावं. या घराला काय समजतायत? धर्मशाळा का स्वतःच्या बापाचं घर?' असेल आबा मंत्री तर आपल्या घरचा. माझं घर फक्त माझं आहे.' पण असले कोणतेही शब्द त्यांच्या मुखातून बाहेर पडले नाहीत. घरी आलेल्या प्रत्येकाचा केव्हा केव्हा वशिला लावून त्यांनी आपली बदली पंधरा वर्षं टाळली होती.

सकाळचे सहा वाजले तशी आबासाहेबांना जाग आली. झोप अपूर्ण झाल्यामुळे त्यांना ताजंतवानं वाटत नव्हतं. आताशा हे नेहमीचंच झालं होतं. रोज झोपायला उशीर व्हायचा अन् सकाळी झोप अर्धवटच टाकून उठायला लागायचं. कूस बदलून त्यांनी तसंच पडून राहायचं ठरवलं. नाहीतरी भेटायला साताची वेळ दिली होती. 'अन् आले भेटायला तरी थांबतील साले.' त्यांच्या मनात आलं. आणि मग रात्रीचे एकेक प्रसंग आठवून त्यांनाच हसू आलं.

त्यांचे साडू त्यांना भेटायला आले होते. खरं म्हणजे त्यांना आधी भेटायला पाहिजे होतं. पण तोवर नियोजित साखर कारखान्याची मंडळी आली होती. त्यांच्याशी बोलण्यातच वेळ गेला होता. त्यानंतर कॉलेजचे लोक आले होते. त्यांना पुन्हा सकाळी यायला सांगितलं होतं. शेवटी पहाटे पहाटे त्यांनी अण्णांना सांगितलं, 'अण्णा, आता उद्या सकाळी आलात तर कसं?'

एरवी अण्णांनी मान, अपमानाचं केवढं नाटक उभं केलं असतं! परंतु आता आबासाहेब मंत्री होते. तोंडावर हसू आणून अण्णांनी निरोप घेतला. त्यांना निरोप देताना आबासाहेब आपल्या मेहुणीची चौकशी करायला विसरले नाहीत.

अण्णांना अगदी भरून आलं होतं?

नियोजित साखर कारखान्याचे लोक त्यांच्या अडचणी सांगत होते. त्यांचे शेअर्स पाहिजे तितके विकले जात नव्हते. आजू-

बाजूच्या सधन शेतकऱ्यांचं म्हणाव असं सहाय्य मिळत नव्हतं. बहुतेक विरोधी पक्षांच्या लोकांचं हे काम होतं.

स्वत:चं उत्तर आबासाहेबांना आठवलं आणि गम्मत वाटली. ते आता मंत्र्यासारखं बोलायला शिकले होते. ते म्हणाले होते–

'प्रत्येक गोष्टीमध्ये सत्ताधारी पक्ष, विरोधी पक्ष असं समीकरण मांडणं आपण सोडून दिलं पाहिजे. अन् त्याचबरोबर प्रत्येक ठिकाणी शासनालाही आणता उपयोगी नाही. शासन आपल्या पाठीमागे आहेच, पण आपन लीही कांही जबाबदारी आहे. याची जाणीव असायला हवी. शासनानं मदत केली तरी ती प्रतिकात्मक असेल. तिचा फारसा उपयोग नाही. म्हणून आपण सर्वांनी मिळूनच हा जगन्नाथाचा रथ ओढला पाहिजे.'

समोरच्या लोकांना माना डोलावण्या-खेरीज गत्यंतर नव्हतं.

साडेसहा वाजत आले होते. अजून अव-काश होता. मागच्या घटना आठवीत, मनात घोळवीत. पलंगावर लोळायला झकास वाटत होतं. इथं यायच्या आधी दहा मैलावर एका गावी आबासाहेबांचा सत्कार झाला होता. त्यांच्या गौरवपर भाषण करण्याची स्पर्धा लागली होती तिथं. त्यांच्यात असले नसलेले गुण दाखवले जात होते. त्यातल्या एका वक्त्यानं मात्र कमाल केली होती. तो म्हणाला होता.

'माननीय नामदार आबासाहेबांची तुलना बाबराशी करण्याचा मोह मला आवरत नाही. असं सांगतात की बाबर समरकंदहून भारतात येताना वाटेत लागणारी प्रत्येक नदी पोहून आला. माननीय नामदार आबा-साहेबांचं पण तसंच आहे. घरून तालुक्याच्या गावी शाळेत जातांना लागणाऱ्या प्रत्येक विहिरीतून आबासाहेब पोहले आहेत. बाब-राला नद्यांची संख्या आठवणं शक्य नव्हतं. आबासाहेबांना मात्र आमच्या भागातल्या विहिरीची संख्या पाचपट करायला हरकत नाही.'

स्तुती कोणाला प्रिय नसते? परंतु या प्रकारच्या स्तुतीनं आबासाहेब विलक्षण सुखा-वून गेले होते. त्यानी त्या वक्त्याबद्दल आजू-बाजूला असलेल्या लोकांकडे चौकशी केली होती. त्या माणसाला बढती द्यायचं त्यांनी ठरवलं होतं. तसं त्यांनी आपल्या पी. ए. ला लिहून ठेवायला सांगितलं पण होतं.

त्याच्या बढतीचा विचार आबासाहेबांच्या मनात आला आणि त्यांना वेळेची जाणीव झाली. पावणे सात वाजून गेले होते. उठाय-लाच हवं होतं. सात वाजता दाजी येणार होते.

सकाळचे सगळे कार्यक्रम आटोपतानासुद्धा दाजीचा विचार त्यांच्या मनातून जात नव्हता. ते स्वतः मंत्रीपदापर्यंत पोहचायला खरं म्हणजे दाजी कारणीभूत होते. दाजी खंबीर-पणे पाठीशी नसते तर आबासाहेब इथपर्यंत आले असते असं सांगता आलं नसतं. दाजींचं हे ऋण आबासाहेबांनी जाहीरपणे मान्य केलं होतं. दाजींची एकसष्टी साजरी झाली तेव्हा आबासाहेब म्हणाले होते–

'दाजींचा धाकटा भाऊ म्हणून घ्यायला मला विलक्षण अभिमान वाटतो आहे. असं म्हणतात की प्रत्येक मोठ्या पुरुषामागे एक स्त्री असते. मी मोठा आहे असं मला अजि-बात वाटत नाही. परंतु आज मी जो आहे तो केवळ दाजीमुळे आहे. म्हणून वरची म्हण थोडीशी बदलून मला असं म्हणावसं वाटतं की प्रत्येक मंत्र्यामागे त्याचा एक मोठा भाऊ असतो.'

श्रोत्यांनी उत्स्फूर्त टाळ्या वाजवून दाद दिली होती.

आपलं घर आणि कुटुंब दाजीवर सोपवून पूर्वी आबासाहेब बिनघोर सगळीकडे हिंडा-यचे. आता देखील जिल्हा दाजीवर सोपवून ते मुंबईत खुशाल राहू शकत होते. दाजींचा विलक्षण धाक त्या भागात होता. त्यामुळे कोणीही आबासाहेबांच्या विरुद्ध जात नव्हतं. एवढं असूनही एखाद्या मांजराप्रमाणं दाजी सदैव दक्ष होते.

परंतु आजकाल दाजी जरा जास्तच करीत होते असं आबासाहेबांना वाटायला लागलं होतं. आपलंच म्हणणं खरं करायची संवय त्यांना लागली होती. अन् त्यामुळे कित्येक गोष्टी तारतम्य बाजूला ठेवून कराव्या लागायच्या.

प्राध्यापकांचा प्रश्न असाच दाजींच्या हट्टामुळे निर्माण झाला होता. आपल्या गावी कॉलेज पाहिजे एवढी एकच गोष्ट दाजींना दिसत होती. गावात एकच हायस्कूल कस-बसं धडपडं करीत चालू होतं. तिथं दाजींनी कॉलेज काढलं होतं. कॉलेज सोसायटीचे अध्यक्ष अर्थातच दाजी होते. एवढं करून दाजी थांबले नव्हते.

कॉलेज काढण्यापाठीमागचा मूळ उद्देश ते साफ विसरले. सगळ्या वशिल्याच्या तट्टांना त्यांनी कॉलेजमध्ये नोकऱ्या दिल्या होत्या. अन् आता साखर कारखान्याचं खूळ त्यांनीच सोडून दिलं होतं. आबासाहेबांना एक गोष्ट कळत होती. सगळं सोंग आणता येतं. पैशाचं सोंग मात्र आणता येत नव्हतं.

दाजींच्या प्रत्येक योजना राबवायच्या म्हटल्या तर अमाप पैसा लागणार होता.

आबासाहेब चहापाणी घेऊन तयार झाले तोवर दाजी आले. दाजी आल्याबरोबर आबासाहेबांनी त्यांना खाली वाकून नमस्कार केला.

'काय म्हणतेय मुंबई?' त्यांना वर उठ-वीत दाजींनी मोठ्या आपुलकीनं विचारलं.

आबासाहेबांनी त्यावर मुंबईची हकीकत सांगितली. त्यांचा एक सहकारी मंत्री आजारी होता. त्याच्या अनुपस्थितीमध्ये त्याचं खातं पण आबासाहेबांकडे होतं. मुख्य-मंत्र्यांच्या आबासाहेबावरच्या विश्वासाचं ते चिन्ह होतं.

एवढं झाल्यावर आबासाहेबांनी दाजींच्या घरची वासपूस केली. भावजयीला सवडीनं मुंबईला पाठवून द्यायला सांगितलं.

दाजींना आपल्या लहान भावाचं मोठं कौतुक वाटलं.

तेवढ्यात कॉलेजचे प्राध्यापक आल्याचा निरोप आला. आबासाहेबांनी दाजींकडे पाहिलं. संमतीदर्शक मान हलवीत दाजी म्हणाले, 'त्यांचं काम संपवून टाक आधी. आपण पुन्हा बोलू.' अन् चंची सोडून त्यांनी पान जमवायला सुरवात केली.

कॉलेजची मंडळी आत आली. मुख्यत्वे-करून त्यात प्राध्यापकांचा भरणा होता. त्यांच्यासाठी चहा आणि बिस्किटांची ऑर्डर देऊन आबासाहेब त्यांना म्हणाले, 'हं! बोला मंडळी!'

मिनिटं दोन मिनिटं कोणीच बोललं नाही. दाजी तिथं असतील असं प्राध्यापकांना वाटलं नव्हतं. त्यामुळे त्यांना पाहिल्यावर ते जरा गांगरून गेले होते. शेवटी त्यांच्या-तल्या एकानं धीर करून सर्व म्हणणं आबा-साहेबांना सांगितलं.

नवीन आकृतीबंधामुळे प्राध्यापकांचं

जीवन अस्थिर झालं होतं. त्यांच्या नोकरीची शाश्वती नव्हती. पंधरा पंधरा वर्ष नोकरी झालेले प्राध्यापक आपली नोकरी कशी टिकवावी या विवंचनेत होते.

त्यांचं गाऱ्हाणं दुरुस्त होतं. आबासाहेबांना त्यांचं म्हणणं पटलं होतं. परंतु एकदम असं कबूल करणं योग्य नव्हतं. म्हणून आबासाहेबांनी त्यांची समजूत घालीत म्हटलं,

'असं पहा, मी एकटा इथं आपल्याला काही आश्वासन देऊ शकत नाही. या प्रश्नावर निर्णय घेणं मंत्रीमंडळालाच शक्य आहे. तरी पण आपलं म्हणणं मी योग्य त्या ठिकाणी निश्चित सांगेन याची खात्री बाळगा.'

'परंतु शासन आमचं म्हणणं ऐकून घ्यायलाच तयार नाही.' त्यातला एक धीट प्राध्यापक म्हणाला.

हीच वेळ होती!

आवाजात किंचित कठोरपणा आणून आबासाहेब म्हणाले, 'देअर आर वेज् टू डू दॅट! इफ यू टॉक लाइफ अॅडल्टस्, एनीबडी वुईल लिसन' (There are ways to that! If you talk like adults, anybody will liston.) पण तुम्ही काय केलंत? शासनाला ब्रो बीट करायचा प्रयत्न केलात. परीक्षांवर बहिष्काराची धमकी दिलीत. अशानं कोणतं सरकार तुमचं म्हणणं ऐकून घेईल?' अन् आवाज पूर्वपदाला आणून ते म्हणाले, 'तरी पण शासन तुमचं आहे अशी माझी भावना आहे. तुमच्या हिताला बाध येईल अशी कोणतीही गोष्ट शासन करणार नाही याची खात्री बाळगा. अन् थोडंसं समजावून घेण्याचा प्रयत्न करा. आपण चाकोरीबद्ध शिक्षणक्रम टाकून देऊन दुसरा उपयोगी असा शिक्षणक्रम शोधण्याचा प्रयत्न करतो आहोत. गाडीनं रूळ बदलले म्हणजे थोडासा खडखडाट होणारच.'

आबासाहेबांना नक्की काय म्हणायचं आहे हे प्राध्यापकांच्या लक्षात येईनासं झालं. त्यांच्यातल्या एकानं दाजींकडे पहात पहात भीत भीत विचारलं.

'आमच्याकडून आम्ही काय करावं?'

त्याच्या खांद्यावर हात ठेवून समजावणीच्या सुरात आबासाहेब त्याला म्हणाले, तुम्ही असं करा, याचं सगळं 'स्टॅटिस्टिक्स' माझ्याकडे पाठवून द्या. किती प्राध्यापक 'अॅफेक्ट' होतात ते समजेल. आणि मला शिक्षणमंत्र्यांशी बोलायला बरं जाईल.'

यापूर्वी अनेकवेळा प्राध्यापकांनी हे सगळं शासनाला कळवलं होतं. काय करावं या विचारात ते गुंतले. मिनिटभर शांततेत गेलं. राजकारणात मुरलेल्या आबासाहेबांनी वेळ साधली. आपल्या जागेवरून उठून दोन्ही हातांनी नमस्कार करीत त्यांनी म्हटलं,

'बरंय तर मंडळी, भेटू पुन्हा सवडीनं.'

शिष्टमंडळ उठून चालायला लागलं. त्यांना निरोप द्यायला दरवाजापर्यंत जाताना त्यातल्या एकाला आबासाहेबांनी आपुलकीनं विचारलं, 'काय भोसले तुमचं Ph. D. कुठपर्यंत आलंय? काही अडचण आल्यास अवश्य कळवा.'

चेहऱ्यावर नम्रपणा आणीत भोसले म्हणाले, 'या चारसहा महिन्यात बहुतेक थेसिस 'सबमिट' करीन.'

'वा! वा!' आबासाहेब म्हणाले. 'आपल्या तालुक्यातले पहिलेच Ph. D. तुम्ही. कौतुक आहे हं!'

'आपला आशीर्वाद आहे साहेब' भोसले म्हणाले.

'आमचा आशीर्वाद नाही हं! आमच्या सदिच्छा! आशीर्वाद वडील माणसांचा असतो. मी काही तुमच्यापेक्षा वयानं फार मोठा नाही. हो, आशीर्वाद पाहिजेच असेल तर दाजींचा घ्या.'

दाजी हे सगळे कौतुकाने पाहत होते. आपला भाऊ राजकारणात पक्का मुरला आहे याची त्यांना खात्री पटली.

प्राध्यापकांना निरोप देऊन आबासाहेब परत आले. दाजींजवळ कसा विषय काढावा याचा त्यांना प्रश्न पडला. पण ती वेळच आली नाही. स्वतः दाजींनीच विषयाला तोंड फोडलं. ते म्हणाले,

'रात्री कायकाय गाऱ्हाणी सांगितली रे या मास्तरांनी?'

त्याच्याकडे पाहत न पाहत आबासाहेब म्हणाले, 'बरंच काही काही सांगत होते. पगाराविषयी पण तक्रार करीत होते.'

दाजी उठून खिडकीशी गेले. त्यांनी पान थुंकलं. अन जिभेनंच दातात अडकलेले कण साफ करीत त्यांनी विचारलं.

'पगाराविषयी काय म्हणत होते?'

'ते म्हणत होते त्यांना वर्षभरात अकरा महिन्यांचाच पगार मिळतो. शिवाय इन्क्रिमेंटस आणि अॅरिअर्स यांचाही घोळ आहे.' आबासाहेबांनी सांगितलं.

तसे दाजी खवळले. म्हणाले, 'हरामखोर साले! 'आपले लोक' म्हणून नोकऱ्या दिल्या तर हे थेर! उपाशी मेले असते. मी कॉलेज काढलं, पुरेशी संख्या नसताना कसे चालवतो ते माझे मलाच ठाऊक. वर्षभरात अकरा महिन्याचा तरी पगार मी देतोय ना? इतर संस्थांमधून काय होतंय ते बघा म्हणावं जरा.'

'त्याचं असं आहे दाजी' आबासाहेबांनी समजावणीच्या सुरात म्हटलं, ''आपले लोक' जरी झाले तरी आर्थिक नुकसान ते कसं सहन करतील? अन् कुठल्याही संस्थेला 'आपलं' 'तुपलं' असं लेबल लागलं की, तिचा ऱ्हास जवळ आला असं समजावं.'

'अरे वा! तुझ्या मोठ्या भावालाही तू



मंत्री म्हणूनच बोलायला लागलास.' दाजींनी आबासाहेबांना मधेच चमकावलं.

'नाही दाजी! तसं अजिबात नाही. पण काही काही वेळा मला माझ्या सहकाऱ्यांना काहीच उत्तर देता येत नाही. गप्प बसावं लागतं.'

'अशा कोणत्या गोष्टी मी केल्या ज्यामुळे तुझी मान खाली जाते, ते तरी एकदा कळू दे मला. म्हणजे पुढे कसं वागावं हे समजेल.' दाजींनी आग्रहानं विचारलं.

'बऱ्याच गोष्टी सांगता येतील दाजी. उदाहरणच द्यायचं म्हटलं तर कॉलेजचं देता येईल. दहा मैलाच्या परिसरातलं हे तिसरं कॉलेज हट्टाला पेटून तुम्ही काढायचं ठरवलंत त्याच वेळी मी सांगितलं होतं. 'हे कॉलेज चालणं अशक्य आहे.' प्राध्यापकांच्या नेमणुका करताना मेरिट अजिबात डावलून अशा पाप्याच्या पितरांना नोकऱ्या दिल्यात. चार इंग्रजी शब्द धडपणे बोलता येत नाहीत.' आबासाहेबांनी दाजींना सांगितलं.

दाजींनी चंचीतली तंबाखू पुन्हा काढली. डबीतून चुना काढून त्यावर चांगला मळला आणि एक एक शब्द शांतपणे परंतु ठामपणे उच्चारीत ते म्हणाले, 'होय! मी या सगळ्या पाप्याच्या पितरांना नोकऱ्या दिल्या. त्यांना अन्नाला लावलं. कारण ते सर्व 'आपले लोक' होते. अन् इतर काही तू विसरलास तरी चालेल पण एक गोष्ट तू कायम लक्षात ठेव. या 'आपल्या' माणसांमुळंच तू निवडणुकीत जिंकलास.'

आबासाहेबांना आता हे अशक्य झालं. दाजींची नजर टाळून खिडकीतून बाहेर पाहत ते म्हणाले, 'आपल्या लोकांमुळे मी निवडून आलो हे खरं आहे. पण निवडून आल्यावर मात्र केवळ आपल्या लोकांपुरतं पाहता येत नाही. तुम्ही हे समजावून घेण्याचा प्रयत्न करा. काही काही वेळा माझी फार 'ऑकवर्ड' पोजिशन होते.'

शेवटी दाजींनीच आवरतं घेतलं. म्हणाले, 'ठीक आहे. तुला अडचणीत टाकणारं आम्ही काही करणार नाही. अन् तू विश्वास ठेव. तुझ्यापेक्षा चार पावसाळे मी जास्त पाहिले आहेत. मुंबईचं राजकारण वेगळं आणि इथलं वेगळं. इथं तू खुशाल माझ्यावर विसंबून राहा.'

दाजांनी एवढ्या लवकर आटोपतं घेतल्यावर आबासाहेबांचा नाईलाज झाला. त्यांनी खालच्या पट्टीत मग दाजींना विचारलं.

'दाजी सोपान काय करतो हल्ली?'

हे विचारण्यामागे आबासाहेबांचा उद्देश होता. दाजींचा हा उडाणटप्पू मुलगा काहीच करत नव्हता अन् काहीच करायचं सोडत नव्हता. चुलत्याला मंत्रीपद प्राप्त झाल्यापासून तर त्याचे चाळे वाढले होते. मागे त्याने मुंबईला केलेले प्रकरण निस्तारता निस्तारता आबासाहेबांच्या नाकी नऊ आले होते.

दाजींना याची कल्पना होतीच, किंचित घोगऱ्या आवाजात ते म्हणाले, 'आबा, तुझी मुलं मी मोठी केली. सांभाळलं त्यांना. त्यांच्या शिक्षणाकडे लक्ष दिलं. नीट मार्गी लावलं. सोपानच्या बाबतीत मात्र मी अपयशी ठरलो. वीस वर्षांचा घोडा झालाय पण मॅट्रिकसुद्धा होत नाही. तूच त्याला कुठं तरी पाठव अन् मार्गी लाव. त्याच्या धंद्यांना मी वैतागलो. काही काही वेळा तोंड दाखवायची चोरी होते.' 'काम कठीण आहे. पण पाहू. काही तरी करू.' आबासाहेबांनी आपल्या वडील भावाचं सांत्वन केलं. अन् थोड्या वेळानं दोघा भावांनी एकमेकांचा निरोप घेतला.

शेजारच्याच खोलीत सोपान सुस्त पडला होता. रात्रीच्या जेवणाची सुस्ती अजून जात नव्हती. आबासाहेबांना भेटायला म्हणून दाजींबरोबर तो आला होता. पण चुलत्याला भेटायला जमलेली गर्दी पाहिल्यावर त्यानं तो विचार रद्द केला होता. दाजी मोटार देणं शक्यच नव्हतं. मग त्यानं चुलत्याची मोटार काढली होती. जोशी मास्तरांच्या घरून चार-दोन मित्रांना धरून आणलं होतं. अन् पंधरा-वीस मैलांवर असलेल्या गावी, रेस्ट हाऊसला पार्टी झोडली होती.

त्या पार्टीची सुस्ती अजून जात नव्हती. विलक्षण गुंगी आली होती. त्या गुंगीतच सोपानला दिसली जोशी मास्तरांची कुसुम! तारुण्यानं रसरसलेली. मनातल्या मनात त्याने योजना तयार केली. त्यासाठी सुरुवात करणं आवश्यक होतं.

गेली पंधरा वर्षं जोशी मास्तर इथंच होते. दाजींना सांगून त्यांची बदली करायला पाहिजे होती. □


# पॅपिलॉन
# पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किंमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# ती संघटना म्हणते :
# आमचे आव्हान शास्त्रज्ञांना, डॉक्टरांना व तंत्रज्ञांना आहे

डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

## विज्ञान आणि तुरुंग

टिळक, गांधी, नेहरू, सावरकर, लोहिया यांच्या चैतन्यस्पर्शामुळे मंतरलेले ते दिवस. त्या काळात वावरणाऱ्या साध्या भोळ्या माणसांनी स्वतःच्या मनाशी एक साधे गणित ठेवले होते. एखाद्या माणसाने आपल्या प्राणप्रिय तत्त्वांसाठी सहजपणे, हसत-हसत किती दिवसांचा तुरुंगवास भोगला यावर त्या माणसाची उंची व किंमत ठरविली जात होती. तुरुंग अनेक प्रकारचे होते. काहींना 'अ' वर्ग मिळाला. या उलट सावरकरांना घाण्याला जुंपले आणि त्यांच्या हातांनी काथ्या कुटून घेतला. पण यापैकी कोणत्याच नेत्याने या तुरुंगाची कधी पत्रास ठेवली नाही. या नेत्यांची गोष्ट सोडा. त्यांच्या छोट्या मोठ्या अनुयायांनी सुद्धा तुरुंगाची कधी फिकीर बाळगली नाही. या तुरुंगात टिळकांनी गीता रहस्याला जन्म दिला. गांधींचे अध्यात्मिक बल तुरुंगात अधिकच वाढले. काथ्या कुटून आणि घाणा ओढूनही सावरकर अंदमानच्या बाहेर पडले ते मुळी चैत्र पालवी-सारखे सळसळत ! कवी मन तेव्हा गर्जून सांगत होते की माणसाचा आत्मा तुरुंगाच्या भिंतीत कोंडता येत नाही. तो नेहेमीच मुक्त असतो... आणि कवीचे हे सांगणे ही कवीकल्पना नव्हती. करण हे महापुरुष आणि त्यांचे अनुयायी आपल्या कृतीने या कविवचनाची सत्यता पटवत होते.

मात्र आज एखाद्या हुकूमशाही असलेल्या देशात एखादा कवी कविकल्पना म्हणून सुद्धा माणसाचा आत्मा तुरुंगांच्या भिंतीत कोंडता येणार नाही असे म्हणू शकणार नाही ! विज्ञानाला वेठीला लावून तुरुंगातील माणसाला पार मोडून काढून त्याच्यात पाहिजे ते बदल घडविण्याचे परिपूर्ण तंत्र आज हुकूमशहांनी अवगत केलंय. कंसापासून अवरंगजेबापर्यंत साऱ्यांना या पूर्वी जे जमले नाही ते विज्ञानाच्या मदतीने आज जगभरच्या हुकूमशहांना शक्य आहे. जागतीक भूतदयावादी संघटनेच्या (Amnesty International) मते विज्ञानाचा येवढा घाणेरडा उपयोग यापूर्वी केव्हांही झालेला नाही ! आपल्याकडे ठिक आहे. आपल्याकडे लोकशाही आहे. तुरुंगात काय होते ते आपणाला कळते. पण हुकूमशाही–विशेषतः साम्यवादी स्वरूपाची हुकूमशाही असलेल्या देशात परिस्थिती खरोखरच गंभीर आहे. सायन्स डायजेस्टच्या जुलै १९७६ च्या अंकात डगलॉस कॉलगीन यांनी या विषयावर एक विस्तृत आणि अभ्यासपूर्ण लेख लिहिलाय. रशियात यासाठी जे प्रकार वापरले जातात त्यांची त्यांनी सविस्तर माहिती दिलीये.

कॉलगीन म्हणतात, ' माणसाला अन्न न देणे, त्याचे पाणी तोडणे, त्याला झोपू न देणे, बर्फाच्या लादीवर झोपवणे हे प्रकार जुने झालेत. कैद्याला कळणार नाही येवढ्या सफाइने डॉक्टर त्याला एक इंजेक्शन देतो. काही वेळात अर्धांग वायू झाल्यासारखा कैद्याला आपल्या शरीराचा एकेक भाग लुळा पडतो आहे असे वाटते. काही वेळाने त्याला धाप लागते. श्वासोश्वास करता येणार नाही असे वाटते. तो अक्षरशः गुदमरू लागतो. त्यावेळी तुरुंगातील अधिकारी, डॉक्टर, हसत खिदळत आपल्या भोवती हिंडत आहेत आणि काही प्रश्न विचा त आहेत असे त्याला दिसत असते. इतक्यात त्याला खूप प्राणवायू असलेल्या दुसऱ्या खोलीत सोडण्यात येते. काही मिनिटात तो कैदी पूर्ववत होतो. हे दररोज अशा सफाईने केले जाते की आपण स्वप्न पहात होतो की जागे होतो हेच कैद्याला काही दिवसांनी समजेनासे होते. बाहेरून तो ताजातवाना वाटत असतो. पण मानसिक-दृष्टया तो पार मोडून जातो. हा झाला एक मामुली प्रकार. दुसरा प्रकार प्रख्यात रशियन गणितज्ज्ञ डॉ. लिओनार्ड प्लायशी (Leonard Plyuch's) सांगितलाय. सरकार विरोधी मते मांडल्यामुळे त्यांना तीन वर्षे तुरुंगात ठेवले होते. पुढे फार मोठ्या आतरराष्ट्रीय दडपणाखाली त्यांची मुक्तता करण्यात आली. मुक्ततेनंतर ते म्हणाले, ' माझ्यावर अगदी पद्धतशीर वैद्यकीय उपचार करण्यात येत होते ! प्रथम मला मानसिक विकृती असलेल्या (Scoizopherenics) रोग्यांना देतात तसे इन्स्युलिनचे मोठे इंजेक्शन देण्यात येई. त्याचा परिणाम म्हणजे रक्तातील साखरेची पातळी एकदम कमी होते. माणूस निपचित जमिनीवर पडून राहतो आणि काही वेळाने आपोआप त्याची शुद्ध जाते. केवळ वेड्यांच्या साठीच वापरतात असे हेलोपेरिडॉल (Heloperidol) हे औषधहि मला अधूनमधून दिले जाई. या सर्वांचा एकत्रित परिणाम येवढाच झाला की माझी स्मरण-शक्ती क्षीण होत होती. मी मानसिक व शारीरिक दृष्ट्या झपाट्याने खच्ची होत होतो. मी बोलतांना खूप अडखळू लागलो. माझे संशोधन, माझे राजकारण, इतकेच काय माझे कुटुंबीय यामधील माझा रस झपाट्याने कमी होऊ लागला.' आणि डॉ. लिओनार्ड खोटे सांगत नसावा. रशियन तुरुंगातून लपवून छपवून जी माहिती बाहेर पाठवण्यात येते त्यातून या माहितीला दुजोरा मिळतो.

पण छळण्याचा हा प्रकार तसा बरा. कारण सारा मामला कसा अगदी खुल्लम खुल्ला असतो. आपणावर पाशवी सैतानी शक्तींचा

जुलूम चालू आहे याची बंदीवानाला जाणीव असते. हा प्रकार मुळी तसा शंभूराजांचे डोळे काढून आणि जीभ उपटून त्यांना वळणावर आणण्याचा जो प्रयत्न झाला ना त्याची सुधारून वाढवलेली आवृत्ती असते. पण आज चिली सारख्या देशात जे होते आहे ते फारच भयंकर आहे. या शिक्षेत डॉक्टर अक्षरशः खाटिकाची भूमिका पार पाडत असतो. सॅन फ्रॅन्सिस्को येथील डॉक्टर लिओनार्ड सॅगन यांनी चिलीमधील तुरुंगातून बाहेर पडणाऱ्या राजकीय कैद्यांचा फार बारकाईने अभ्यास केला. त्यांच्यामते या तुरुंगातून बाहेर पडलेले अनेक राजकीय कैदी एकाच प्रकारच्या विचित्र दुखण्याला बळी पडले. तुरुंगातून बाहेर पडताना त्यांची प्रकृती ठिक होती. पण त्यानंतर काही दिवसांनी त्यांच्या मूत्रपिंडातून वा किडनीमधून रक्तस्राव सुरू झाला. त्या आजारात हे कैदी पुढे मृत्युमुखी पडले. डॉ. सॅगन म्हणतो, ' माझ्या अभ्यासातून मला एक गोष्ट आढळून आली की या कैद्यांना तुरुंगातून सुटण्यापूर्वी कॅन्सर विरोधी प्रभावी समजले जाणारे सायक्लोफॉसफरामाइड (Cyclophosphoramide) औषध मोठ्या प्रमाणात कारण नसताना देण्यात आले होते. ह्या औषधाचे जे अनेक दुष्परिणाम आहेत त्यात या अशा रक्तस्रावाचा समावेश आहे.

चिलीची गोष्ट बाजूला ठेवून लोकशाही परंपरांचा मुकुटमणी समजल्या जाणाऱ्या ब्रिटनची गोष्ट पाहिली तर आपणाला काय दिसते. ब्रिटनने १९७१ साली वेल्स आणि आयरिश स्वातंत्र्यवाद्यांची खोड मोडण्यासाठी आपल्या तुरुंगात एक मानसशास्त्रीय प्रयोग सुरू केला. जागरूक जनमताचे दडपण आल्यावर या प्रकाराची चौकशी करण्यासाठी क्रॉम्प्टन आणि पार्कर यांच्या अध्यक्षतेखाली दोन चौकशी मंडळे नेमली गेली. या चौकशी मंडळांतून अनेक गोष्टी बाहेर आल्या. १९५० साली हेब या कॅनेडियन मानसशास्त्रज्ञानी संपूर्ण एकांतवासाचा मानवी मनावर व शरीरावर काय परिणाम होतो हे पाहण्यासाठी मॅकगील विद्यापीठात काही प्रयोग केले होते. हे प्रयोग फार विकृत स्वरूपात ब्रिटनच्या तुरुंगात वापरण्यात येत होते. कैद्याच्या अंगावर तरटाचा एक पायघोळ अंगरखा घालण्यात येई. ज्याच्यामुळे स्पर्शज्ञानही होणार नाही असे जड बोजड हातमोजे व पायमोजे त्याला वापरण्यास लावत. आणि पहारेकरीही त्याला दिसणार नाहीत अशा प्रकारे त्याला तुरुंगाच्या एका खोलीत बंद करून ठेवत. हेबने आपले मूळ प्रयोग सहा आठवडे करून पाहण्याचे ठरविले होते. पण तीन दिवसांहून कोणा माणसाला असे ठेवणे योग्य नाही अशा निष्कर्षाप्रत तो आला होता. ब्रिटनच्या तुरुंगात ही शिक्षा आठवडे न् आठवडे देण्यात येत होती. या कैद्यांना भेटावयास जेव्हा त्यांचे वकील जात त्यावेळी काही कैदी प्रत्येक वाक्यानंतर ओक्साबोक्शी रडत. काहीजण एक गोष्टही स्पष्टपणे समजावून सांगू शकत नसत. या दोन चौकशी मंडळांचा अहवाल बाहेर आल्यावर मात्र ब्रिटनमधील या प्रकारच्या शिक्षेबद्दल कुविख्यात असलेल्या बेलफास्ट तुरुंगालाच टाळे ठोकण्यात आले.

ब्रिटनमध्ये ही शिक्षा थांबली एवढेच. हेबचा प्रयोग अनेक स्वरूपात जगभरच्या तुरुंगात मात्र चालूच राहिला. ब्राझिलमध्ये हा प्रयोग किती पूर्णावस्थेला गेला आहे याची माहिती फ्रेड मॉरिस यांनी दिली आहे. ते म्हणतात, तेथे राजकीय कैद्याला एका छोट्या पेटीसारख्या खोलीत ठेवतात. त्या खोलीचे तपमान झपाट्याने ५ ते १० अंश सेंटिग्रेडइतके कमी करतात. भोंग्याचे व विमानाच्या इंजिनाचे आवाज त्या खोलीत जोरजोराने वाजविण्यात येतात. आणि खोलीत प्रखर दिवे उघडझाप करीत असतात. त्यानंतर काही वेळाने खोलीचे तपमान ४० ते ४५ अंश सेंटिग्रेड इतके वाढविण्यात येते. खोलीत पूर्ण शांतता असते आणि खोलीत संपूर्ण अंधार करण्यात येतो. होते काय, कडाक्याची थंडी, कानठळ्या बसवणारे आवाज आणि प्रखर प्रकाशझोत यांची कैद्याच्या मनात एक आकृती तयार होते. उकाडा, शांतता आणि काळोख यांचे दुसरे चित्र त्याच्या मनावर उमटवले जाते. त्यानंतर काही वेळाने खोलीतले तपमान वाढवत असताना कानठळ्या बसविणारे आवाज आणि त्याच्याबरोबर उघडझाप करणारे दिवे असा काही बदल करण्यात येतो. या उलट खोलीतील तपमान कमी करीत असताना संपूर्ण काळोख आणि शांतता ठेवण्यात येते. कैद्याच्या मनात निर्माण झालेल्या प्रतिमांना तडे जातात. डॉ. मॉरिस म्हणतो, वरवर पाहता साधी वाटणारी ही शिक्षा कैद्याला मानसिकदृष्ट्या पार बदलून टाकते. त्याने मनाशी पुजलेली मूल्ये तो या शिक्षेत विसरून जातो. मजेची गोष्ट अशी की, आपल्यावर हा प्रयोग सुरू आहे याची कैद्याला जाणीवही नसते. त्याला वाटते, आपल्या तुरुंगाच्या विभागात तपमानात असे बदल होतात. जवळच्या हवाईतळावरून जाणारे विमान आवाज करते. विद्युत प्रवाहात खरोखरच अधूनमधून खंड पडतो.

ब्राझिलमधील तुरुंगात यापेक्षा वेगळा प्रकार वापरतात. कैद्याला विजेचे झटके देत असताना त्याला शिक्षण दिले जाते! त्याच्या खोलीत त्याला अनेक चलत्चित्रे दाखविण्यात येतात. त्यात त्याला जगातील प्रसिद्ध ठिकाणे दाखवितात, त्याचे नातेवाईक दाखवितात. त्याने ज्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला ते राजकीय पुढारी दाखवितात. मात्र या लोकांची चित्रे पाहताना त्याला विजेचा एक सणसणीत झटका देण्यात येतो. विजेचा असह्य झटका आणि आपले आवडते नेते यांची सांगड त्याच्या मनाशी पक्की बसेपर्यंत हा प्रकार चालू ठेवतात.

औरंगजेबानेसुद्धा आदराने पहावी अशी ही ब्राझीलमधील शिक्षा आहे! ही शिक्षा सर्वप्रथम कोणाच्या सुपीक मेंदूतून बाहेर पडली असेल हे शास्त्रज्ञांना खरोखरच माहीत नाही. डॉ. सॅगन म्हणतो, ' रशियात या विषयावर खूप संशोधन झालंय पण ते फार गुप्ततेत ठेवलेले आहे. खुद्द ब्राझीलमध्येही फार प्रगत अशी विद्यापीठे आहेत. त्या विद्यापीठात या विषयावर खास संशोधन करणारे तज्ज्ञ आहेत. त्यांनी कदाचित ही शिक्षा शोधली असेल. पण व्यक्तिस्वातंत्र्याचा जयघोष कोणालाही न घाबरता करणारी अमेरिकन वृत्तपत्रे आणखी पुढे गेली आहेत. त्यांनी या विषयाचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या रॉकफेलर समितीचा अहवाल आता लोकांसमोर ठेवला आहे. त्या अहवालात स्पष्टपणे म्हटले आहे की, ' सी. आय. ए. जगातील शास्त्रज्ञांना राबवून माणसाला गुलाम बनविण्याचे मार्ग शोधून काढते आहे. ' (' CIA's Director of Science and Technology had a special program me to study possible means for controlling human behavior. It explored the potential of everything from electro-shock to different insights of psychiatry and physiology for

possible tools that might be useful in this programme.') आता अमेरिकेने विकसित केलेल्याच या शिक्षा इतर देश मिळवून वापरत नाहीत याची खात्री काय? आणि जर अमेरिकेत हे संशोधन चालू असेल तर रशियात काय चालू असेल याचा विचारही न केलेला बरा.

......हातात एकवटलेली अमर्याद सत्ता अखेर भल्याभल्यांना बिघडवून टाकते–शिवाचा निःसीम भक्त असलेला साधाभोळा भस्मासूर! शिवाच्या पुजेसाठी स्वतःच्या पत्नीचा बळी सहजपणे देऊ शकणारा भस्मासूर! हाती एकदा अमर्याद सत्ता आल्यावर या भस्मासुराने साऱ्या समाजाचा काय बट्याबोळ केला ते आपण पुराणात वाचतो. हाती अमर्याद सत्ता केंद्रित झाल्यावर एक वेळ जनतेचे नम्र सेवक असलेले निक्सन आणि स्टॅलिन यांचे भस्मासुराहून काही वेगळे झाले नाही. आज बाहेर पडणाऱ्या माओच्या पत्नीच्या लीला याचीच साक्ष पटवितात !–'अॅम्नेस्टी इंटरनॅशनल' म्हणते, 'हाती अमर्याद सत्ता असलेल्या राज्यकर्त्यांना आम्ही वा जगभरच्या सुबुद्ध जनतेने सांगून काही होईल असे आम्हाला खरेच वाटत नाही. आमचे आव्हान तंत्रज्ञांना, डॉक्टरांना आणि शास्त्रज्ञांना आहे. आपल्या हातात असलेली शिवशक्ती घाणेरड्या कामासाठी आमच्यातील कोणीच वापरणार नाही अशी जाहीर प्रतिज्ञा त्यांनी घेतली पाहिजे!'

*

## पपा हेमिंग्वेंचा पंचनामा:...

वैज्ञानिकांना अधूनमधून साहित्यिकांची फिरकी घेण्याची लहर येते!

अर्नेस्ट हेमिंग्वे–'द ओल्ड मॅन अॅन्ड द् सी' या व अशा गाजलेल्या कादंबऱ्यांचा लेखक. एका वैज्ञानिकाने कॉम्प्युटरच्या (संगणकाच्या) साहाय्याने त्याच्या कादंबऱ्यांचा चक्क पंचनामा केला.

हेमिंग्वेने आपल्या एका मित्राला पत्र लिहून कळवले होते की, १९५१ मध्ये आपण समुद्र जीवनावरील एक गोष्ट लिहावयास घेतली. नेमक्या नि मोजक्या ३५ हजार शब्दांत ही गोष्ट आपण संपवली. 'द ओल्ड मॅन अॅन्ड द सी' या नावाने १९५२ च्या सप्टेंबरमध्ये लाइफ मासिकाने ती प्रसिद्ध केली. साहित्यिकांच्या या गोष्टीत रस घेणाऱ्या तिकडच्या कोणत्या तरी 'ललित' मासिकाने हे पत्र प्रसिद्ध केले. आणि इंग्लिशचे प्राध्यापक डारेल मॅनसेल यांना फार राग आला. त्यांचा आतला आवाज त्यांना सांगत होता की, हेमिंग्वेने हे चोपडे खरे १९३० च्या सुमारास लिहून ठेवले होते. अनेक दिवस धूळ खात हे चोपडे पडून होते!

आता हे त्रांगडे सोडवायचे कसे?–संगणक विद्येत तज्ज्ञ समजल्या जाणाऱ्या विल्यम कोइंग यांनी, मॅनसेल आणि हेमिंग्वे या दोघांचीही फिरकी ताणण्याचे ठरवले. तो म्हणाला, 'संगणकाच्या साहाय्याने आपण या साहित्यकृतीचे पृथःकरण याने पंचनामा करू या!' प्रोफेसर मॅनसेल यांचे संगणकाचे ज्ञान अगदी अकटो पासून विकटोपर्यंत होते. त्यांना ही कल्पना अर्थातच पटली व एक वेगळा वैज्ञानिक प्रयोग उभा राहिला. या प्रयोगाची माहिती परगॅमॉन प्रकाशन संस्थेने प्रसिद्ध केलेल्या 'कॉम्प्युटरस् अॅन्ड ह्युमॅनिटिज' या ग्रंथाच्या आठव्या खंडात १९५ ते २०६ या पानावर ग्रंथीत झाली आहे.

या प्रयोगात निरनिराळ्या कालखंडात प्रसिद्ध झालेली हेमिंग्वेची प्रसिद्ध पुस्तके निवडण्यात आली. 'टू हॅव अॅन्ड हॅव नॉट' (१९३३ ते ३७), 'द् कॅपिटल ऑफ द वरल्ड' (१९३६), 'आयलंडस इन द् स्ट्रिम' (१९४०–१९५१) आणि 'अॅक्रॉस द रिव्हर अॅन्ड इन टू द ट्रिज' (१९४९–५०) या पुस्तकांचा शब्दशः किस काढण्यात आला. या पुस्तकातील प्रत्येक वाक्य आणि प्रत्येक शब्द वेगवेगळे करण्यात आले. प्रत्येक शब्दात किती व्यंजने वा ध्वनि आहेत. याची नोंद घेतली गेली. प्रत्येक शब्दात किती अक्षरे आहेत हे पाहिले. प्रत्येक वाक्यात किती शब्द आहेत हे मोजले. वाक्याची रचना करताना किती वेळा कर्ता आणि किती वेळा क्रियापद पहिले होते असल्या गोष्टींचा सूक्ष्म अभ्यास झाला. या सर्वांच्यासाठी वेगवेगळ्या आकड्यांची योजना केली आणि ही सारी माहिती संगणकाला पुरविण्यात आली.

अर्थात संगणकातून जे मॅनसेल यांना पाहिजे होते तेच नेमके समजले. 'द् ओल्ड मॅन अॅन्ड द सी' ही कादंबरी ठामपणे १९३० च्या सुमारास लिहिली गेली असावी. कारण ओल्ड मॅन अॅन्ड द सी या कादंबरीतील तीन वेगवेगळे नमुने पाहिले तर प्रत्येक वाक्यात अनुक्रमे १९·८४, १६·९०, आणि १३·५९ शब्द आहेत. किंवा वाक्यातील शब्दांची सर्वसामान्य सरासरी सोळा आहे. १९३६ साली हेमिंग्वेने लिहिलेल्या 'कॅपिटल ऑफ द् वरल्ड' या पुस्तकातील तीन वेगवेगळे नमुने पाहिले तर वाक्यात अनुक्रमे २४·९३, ११·२७, आणि १५·४२ शब्द आहेत. म्हणजे वाक्यातील शब्दांची सरासरी येते १७. या उलट 'अॅक्रॉस द् रिव्हर अॅन्ड इन टू द ट्रिज' या १९४९ ते १९५० या कालखंडात लिहिलेल्या वाक्यातील शब्दांची सरासरी आहे फक्त नऊ. या व अशा इतर अनेक विश्वसनीय पुराव्यावरून असे सिद्ध होते की, 'द् ओल्ड मॅन अॅन्ड द् सी' १९३० च्या सुमारासच लिहिली असावी. मॅनसेलच्या मते संगणकाची माहिती आणि उत्तरे ही शास्त्रीय आहेत. व्यक्तिगत भांडणापासून अलिप्त आहेत (The computer, using a large amount of syntactic information that to a great extent is indepedent of subject matter, 'meaning' or 'content' and using statistical techniques that are free of personal bias)...आणि या सर्वातून जवळ जवळ नक्की सिद्ध होते की, माझे म्हणणे बरोबर आहे.

–या सर्वांवर हेमिंग्वेच्या चाहत्यांचे म्हणणे एवढेच आहे की, प्रोफेसर मॅनसेल याला संगणक विद्येतील काही छदाम माहीत नाही. हे आम्हाला प्रथमपासूनच माहीत होते. पपा साहित्य क्षेत्रातील त्याचे ज्ञानही तेवढेच आहे हे आम्हाला आता प्रथमच समजते आहे! म्हणजे असे. हा उद्या 'एका कोळीयाने' आणि 'ओल्ड मॅन अॅन्ड द् सी' या दोन कादंबऱ्यांचे असे पृथःकरण करेल आणि या दोन्हीमध्ये 'एका कोळीयाने' हे पुस्तक किमान १५-२० वर्षे आधी लिहिलेले आहे म्हणून सांगेल!

प्रोफेसर मॅनसेलचे सोडा. तो तसा इरेला पडलेला विद्वान प्राध्यापक आणि टीकाकार आहे! पण विल्यम कोइंगसारखा

शास्त्रज्ञ या असल्या भलत्या फंदात का पडला ?–कामाच्या शोधात अस्वस्थ होऊन हिंडणारा 'रिकामा सुतार' प्रत्येक व्यवसायात असतो हेच शेवटी खरे ! *

## विज्ञान आणि ग्राहक चळवळ....

डोंगर महमदाकडे आला नाही तर महमदाला डोंगराकडे जावे लागते. गेल्यावर्षी, विज्ञान घेऊन शास्त्रज्ञांनी खेड्यापाड्यात जावे म्हणून आवर्जून सांगणाऱ्या आपल्या पंतप्रधानांनी नेमके तेच सांगितले. आज थोड्या वेगळ्या संदर्भात याचा विचार करावयाचा आहे. जगभरचे आणि भारतातील शास्त्रज्ञही अनेकदा नवे विचार वा नवे शोध घेऊन पुढे येतात. या संशोधनाचा वा या कल्पनांचा पुढे उपयोग होत नाही. हे असे का होते ? पैसे निर्माण करणाऱ्या (वा पैसे गिळणाऱ्या ?) एका प्रचंड राक्षसी यंत्रापुढे ग्राहक उभे असतात. शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञही उभे असतात. ज्या शोधामुळे कंपनीचा फायदा न होता पर्यायाने तोटा होईल ती कल्पना स्वीकारली जात नाही. तो शोध प्रामाणिकपणे राबवला जात नाही. अगदी कोट्यावधी रुपये खर्च करून माणसाला रोगमुक्त करण्यासाठी नवी नवी औषधे शोधणाऱ्या औषधी कंपन्यासुद्धा एखादे नवे औषध बाजारात पाठवावयाचे की नाही हे शास्त्रज्ञांच्या मर्जीनुसार नव्हे तर कंपनीच्या आर्थिक आणि व्यापारी सल्लागारांच्या आदेशावर ठरवितात. जनता आणि ग्राहक येथे नगण्य असतात. हे चित्र बदलवावयाचे असेल तर 'ग्राहक चळवळींनी' हे आव्हान स्वीकारले पाहिजे.

—परकीय औषधी कंपन्यांची गोष्ट आपण क्षणभर बाजूला ठेवू. अगदी साध्या साध्या गोष्टी आपण पाहिल्या तरी काय दिसते. या वेळेपुरते आपण फक्त एका शोधाचा विचार करू. आपल्या 'कौन्सिल ऑफ सायन्टिफिक आणि इंडस्ट्रिअल रिसर्च 'तर्फे 'नव्या कल्पना नवे शोध ?' (Invention intelligence) या नावाचे एक उपयुक्त इंग्रजी मासिक प्रसिद्ध होते. भारतातले शास्त्रज्ञ आपल्या नव्या कल्पना आणि नवे शोध यात मांडत असतात. या मासिकाच्या मार्च १९७६ च्या अंकात कोचिनच्या एका तंत्रज्ञाने सर्वसामान्य विजेच्या दिव्याहून दुपटीने आयुष्य असलेल्या एका नव्या विजेच्या दिव्याची रचना दिलेली आहे. या तंत्रज्ञाचे नाव आहे बेनेडिक्ट. आपल्याकडील सध्याच्या विजेच्या दिव्याबाबत आत असलेली तार (filament) जळून गेली की सबंध दिवा फुकट जातो. खरे पाहता दिव्याच्या वरील काच, वरील आधार (holder) सारे सुव्यवस्थीत असतात. या अगदी साध्या व नव्या शोधामध्ये सोबतच्या चित्रात दाखविल्याप्रमाणे दिव्यात एका ऐवजी दोन विद्युत तारांचे संच (filaments) बसविलेले असतात. त्यापैकी तारांचा एक संच दिव्याच्या वरच्या आधाराला (holder) जोडलेला असतो. दुसरा तरंगता असतो. पहिला तारांचा संच जळून गेला की वरचा आधार थोडा फिरवून दुसरा तारांचा संच आधाराला जोडला जातो. जळून गेलेला तारांचा संच तरंगता होतो. थोडक्यात दिवा तुम्ही दुप्पट वेळ वापरू शकता. त्यातून एकाच वेळी दोनी तारांचे संच आधाराला जोडण्याची सोय असल्याने एकाच दिव्यावर तुम्ही वेगवेगळ्या प्रखरतेचा प्रकाश मिळवू शकाल. म्हणजे जर चाळीस आणि साठ अशा दोन व्होल्टचा प्रकाश देणाऱ्या तारा असतील तर चाळीस, साठ वा शंभर असाही कोणताही प्रकाश तुम्ही मिळवाल. पण कोचीनच्या बेनेडिक्टची ही कल्पना पण तशी नवी नाही. ही कल्पना त्यांनी प्रसिद्ध केल्यावर मासिकाच्या संपादकांना पत्र पाठवून मणीपालच्या इंजिनिअरिंग कॉलेजच्या प्राचार्यांनी कळविले आमचा एक जुना विद्यार्थी श्री. कुमार यांनी पाच वर्षापूर्वीच हा शोध लावलेला आहे आणि त्याचे व्यापारी हक्क (Patents) त्याच्या नावावर आहेत–हे सारे जरी असले तरी दिव्याचे उत्पादन करणारी कोणतीही कंपनी या शोधाचा साधा विचारही करू शकणार नाही. या उलट त्यात ते हजार अडचणी उभ्या करून दाखवतील. समर्थ ग्राहक चळवळ हाच अशावेळी वैज्ञानिकांना आधार असेल. ग्राहक चळवळीच्या झुंजार नेत्यांनी दिवे बनविणाऱ्या कंपन्यांचे प्रतिनिधी, राष्ट्रीय प्रयोगशाळांचे सूत्रधार आणि बेनेडिक्ट यांच्यासारखे तंत्रज्ञ यांना एकत्र आणून या प्रश्नाची तड लावली पाहिजे. कोणाला खरोखरच काही पावले टाकावयाची असतील तर बेनेडिक्ट यांचा पत्ता आहे.

**K. X. Benedict.**
Kuropacherry House,
P. O. Ochanthuruth, Cochin 1.

## गॅस संपलाय का ?....

मापात पाप करू नये हे खरे. रेडिओवर तर नेहमी जाहिरात सुरू असते की, 'शेटजी वस्तूबरोबर कागदी पिशवीचे वजन करणे ही शिक्षापात्र गुन्हा आहे' वर्तमानपत्रात जाहिरात असते की, वजनाच्या बाबत काही घोटाळे आढळले तर वजन विभागाला कळवा. तुमचे नाव गुप्त ठेवून आम्ही कारवाई करू.

हे खाते जेव्हा केव्हा काही करणार असेल तेव्हा करो. एका महत्त्वाच्या गोष्टीत ग्राहकांची कळत नकळत फसवणूक होते असे भारतातील काही तंत्रज्ञांना वाटते. 'इनव्हेनशन इंटिलिजन्स' या 'कौन्सिल ऑफ सायन्टिफिक अ‍ॅन्ड इंडस्ट्रियल रिसर्च' या संस्थेतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या मासिकात तंत्रज्ञ गेले वर्षभर या विषयावर चर्चा करताहेत. कारण शेवटी शास्त्रज्ञांनाही संसार करावयाचा असतो. दोन वेळ सुखाने जेवावयाचे असते.

...आणि होते काय, एक दिवस अचानक घरातील गॅस सिलेंडर संपून जातो. गॅस आला त्यावेळी सिलेंडरमध्ये किती गॅस होता हे समजण्यास काहीही मार्ग नसतो. गॅस संपण्यापूर्वी तो संपणार आहे याची सूचना देण्याचीही सिलेंडरमध्ये काही सोय नसते. गृहिणींना अनेकदा गॅस लवकर का संपला हे समजत नाही. अनेकांना वाटते, 'गॅस भरताना काही तांत्रिक चूक होऊन गॅस कमी भरला गेला असेल. कदाचित कोणी काही बदमाशी करून मुद्दाम कमी गॅस भरला असेल. किंवा गॅस आणणाऱ्या माणसाने वाटेत चार पाच दिवस हॉटेलवाल्याला सिलेंडर वापरावयास देऊन नंतर सिलेंडर घरी आणला असेल. कंपनी किती किलो गॅस दिला हे सांगते. पण गॅस वजन करून देत नाही. फक्त तेवढ्या वजनाचे पैसे मात्र रोख मोजून घेते.'– आता या प्रश्नावरचा उपाय फार सोपा आहे. प्रत्येक सिलेंडरवर तो मोकळा असताना किती वजनाचा आहे हे कोरून

नोंदवलेले हवे. सिलेंडर घेऊन येणाऱ्या मुलाबरोबर कंपनीने एक डॉक्टरांच्याकडे असतो तसा वजनाचा काटा द्यावा. त्या काटयावर वजन करून देऊन नंतर त्या मुलाने पैसे घ्यावेत. यात खरे पाहता कठीण काही नाही. वर्तमानपत्रात जाहिरात देणारे सरकारचे वजन मापाचे खाते खरोखरच अस्तित्वात असेल वा एखादी समर्थ ग्राहक चळवळ कोठे असेल तर हे लगेच होऊ शकेल. सहज होऊ शकेल.

–पण आपले शास्त्रज्ञ वेडे आहेत. प्रयोगशाळा आणि घर यात ते घरकोंबडयासारखे अडकून पडलेले असतात. त्यांना या संस्थांची माहिती नसावी. असली तर या संस्थांच्यावर त्यांचा विश्वास नसावा. ' इनव्हेन्शन इंटिलिजन्स 'च्या फेब्रुवारी १९७५ च्या अंकात व्ही. एस. सत्यनारायण या दिल्लीच्या तंत्रज्ञानी या प्रश्नाला प्रथम वाचा फोडली. त्यात त्यांनी गॅस ठेवण्यासाठी एक वेगळचा प्रकारचे व्यासपीठ सुचवले.

हे व्यासपीठ दोन फळयांचे बनलेले असते. वरच्या फळीवर आपण सिलेंडर ठेवतो. खालच्या व वरच्या फळीमध्ये स्प्रिंग्ज बसवलेल्या असतात. या दोन फळयांच्या मधे एका रबरी भांडयात रंगीत पाणी वा इतर काही द्रव भरलेला असतो. तो द्रव बाहेर एका काचेच्या नळीला जोडलेला असतो. ज्यावेळी सिलेंडर भरलेला असतो त्यावेळी दोन्ही फळया दबून जवळ येतात. रबरी भांडयात भरलेला द्रव नळीत वर चढतो. जसजसा सिलेंडर मोकळा होतो तसा द्रवावरील दाब कमी होतो. तो नळीत खाली खाली सरकू लागतो. एकूण गॅसच्या वजनासाठी द्रव किती इंच खाली उतरला पाहिजे हे तुम्ही गणिताने ठरवू शकता. म्हणजे गॅस संपण्यापूर्वी एक दोन दिवस आधी तुम्हाला सुचना तर मिळतेच, पण सर्व गॅस संपल्यावर गेल्या महिन्यात कंपनीने खरोखरच किती गॅस पुरविला हे पण तुम्ही पाहू शकता.

सत्यनारायण यांचे हे पत्र प्रसिद्ध झाले मात्र. त्यानंतर संपादकांच्याकडे पत्रांचा अक्षरशः पाऊस पडला. अनेक तंत्रज्ञांनीही ही फार महत्त्वाची गोष्ट आहे म्हणून सांगितले. त्या शोधात अनेक नव्या नव्या उपयुक्त सुधारणा सुचवल्या. मुझाफरपूर इंजिनिअरिंग कॉलेजचे एम्. रहमान, जोधपूर विद्यापीठाचे उमा शंकर शर्मा, कानपूरच्या ' इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलजी 'चे हेम प्रकाश, खरगपूरच्या इंडियन इन्स्टिटयूटचे गोपाल क्रिश्न, तामिळनाडूच्या त्रिची येथील इंजिनिअरिंग कॉलेजचे ए. मोहन, मेजर ए. बी. गोगटे, बंगलोरचा आनंदरामही या वाचकांच्या पत्रव्यवहारात भाग घेणाऱ्या तंत्रज्ञांपैकी फक्त काही जणांची वानगीदाखल सांगता येणारी नावे– ज्याचे जळते त्याला कळते हेच खरे !

या सर्वांचा विचार करून व्ही. एस. सत्यनारायण आता नवे व्यासपीठ घेऊन पुढे आलाय. घरातल्या घरात पाहिजे तेव्हा विजेचे बटन सुरू करून गॅस किती संपला आणि किती शिल्लक आहे हे गृहिणी या यंत्रामुळे पाहू शकेल. सत्यनारायण यांच्या मते अशा स्वरूपाची व्यासपीठे बनवावयास सत्तर रुपयाहून अधिक खर्च येऊ नये. श्री. व्ही. एस. सत्यनारायण यांचा पत्ता आहे–

( 1/64, Janakpuri, New Delhi–58. )

## अगदी अमेरिकेतसुद्धा हेच घडते...

समर्थ आणि झुंजार ग्राहक चळवळ एवढा एकच आज सर्वसामान्य माणसाला आधार आहे. अगदी लोकशाहीप्रधान अमेरिकेतसुद्धा.

१९६६ मध्ये अमेरिकन सरकारने ' नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्स आणि नॅशनल रिसर्च कौन्सिल ' यामधील प्रख्यात शास्त्रज्ञांची एक समिती अमेरिकेतल्या औषधव्यवसायाची

## वाहते वारे...

औषधे महाग असतात. गरिबांनाच काय मध्यम वर्गीयांना सुद्धा ती परवडत नाहीत. डॉक्टर्स तपासण्याचे खूप पैसे घेतात, त्यातून खेडयापाडयातून तर डॉक्टर्स मिळतसुद्धा नाहीत...

हे फक्त भारतात घडतंय असे नव्हे, अगदी अमेरिकेतसुद्धा हेच घडतंय्. अस्वस्थ होऊन अमेरिकेतले लोकसुद्धा याचा विचार करताहेत. सी. पिटर्स यांनी ' वॉशिंग्टन मंथली 'च्या ऑक्टोबर १९७६ च्या अंकात याबाबत एक सडेतोड खळबळजनक लेख लिहिलाय्. त्यांच्या लेखाचे नाव आहे, ' A Revolutionary Answer to a Medical costs ' आपल्या या लेखात ते म्हणतात.

' कोणत्याही राजवटीत व्यक्तिंची व समाजाची सुरक्षितता, स्वास्थ्य हे सर्वात महत्त्वाचे असते. व्यक्तीच्या वा समाजाच्या जीवन–मरणाचा प्रश्न जेव्हा असतो तेव्हा इतर वाद वांझोटे ठरतात. या व्यवसायात काम करणाऱ्या व्यक्तींच्यावर समाजाला म्हणूनच एक बंधन घालावे लागते. सैन्यात काम करणारा मोठा अधिकारी वा साधा सैनिक दोघेही आपण कोणत्या आघाडीवर व किती पगारावर काम करणार हे ठरवू शकत नाही. पोलिस अधिकारी पण मी या विभागात व या वेळातच गस्त घालेन म्हणून सांगू शकत नाही. समाजाच्या सुरक्षिततेची व स्वास्थ्याची जबाबदारी घेणाऱ्या सरकारनेच हे ठरवावयाचे असते. अगदी हीच गोष्ट औषधी कंपन्यांना व डॉक्टरी व्यवसायाला लागू करावीच लागेल...

आपण डॉक्टर होणार की नाही एवढेच ठरवण्याचा तरुणाला जरूर अधिकार असेल. पण एकदा डॉक्टर होणार म्हटल्यावर सरकार सांगेल त्या ठिकाणी, सांगेल त्या वेतनावर त्याने काम केले पाहिजे. औषधी कंपन्यांनी कोणती औषधे निर्माण करावयाची व त्यांनी ती कोणत्या किंमतीत विकावयाची हे पण अखेर सरकारनेच ठरविले पाहिजे. डॉ. सी. पिटर्स आपल्या या लेखात पुढे म्हणतो, ' मी साम्यवादी नाही, समाजवादीही नाही. पण राजवट कोणतीही असो, साम्यवादी, समाजवादी, कल्याणकारी, लोकशाही, हुकूमशाही या साऱ्या राजवटी अखेर जनतेचे संरक्षण आणि स्वास्थ्य या मूलभूत कल्पनेशीच प्रामाणिक हव्यात. '

*

चौकशी करण्यासाठी नेमली. त्या समितीने असा स्पष्ट निर्वाळा दिला की, डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय बाजारात मिळणारी डोकेदुखी, पडसे इत्यादींवरील औषधांपैकी ८५ टक्के औषधांबाबत आम्ही साशंक आहोत, कारण जाहिरातीतून या औषधांचे जे गुणधर्म सांगितले जातात त्यांची खात्री पटविणारे वैज्ञानिक पुरावे उपलब्ध नाहीत. याउलट ही औषधे घेतल्यामुळे जे दुष्परिणाम भोगावे लागतील त्याबाबत मात्र संपूर्ण विश्वसनीय पुरावा उपलब्ध आहे.

याबाबत न्यूयॉर्क येथून प्रसिद्ध होणाऱ्या The Village Voice (खेडुतांचा आवाज) या वृत्तपत्राने आवाज उठविला आहे. त्यांच्या मते, 'आज अमेरिकेत विकली जाणारी दोन लाखाहून अधिक छोटी मोठी औषधे या अहवालाप्रमाणे रद्द केली पाहिजेत.' वृत्तपत्र पुढे विचारते, '७१ साली हा अहवाल प्रसिद्ध झाला. पाच वर्षे उलटली तरी याबाबत अजून कोणतीही उपाययोजना का करण्यात आली नाही?' खरे पाहता काही नवा कायदा करण्याचीसुद्धा जरूरी नाही. कारण अमेरिकेतील प्रचलीत कायद्याप्रमाणेच कोणतीही वस्तू विकताना एक आवश्यक बंधन पाळावे लागते. जी गोष्ट तुम्ही पुराव्याने सिद्ध करू शकत नाही ती गोष्ट जाहीर करून आपल्या वस्तूचा खप करणे हा शिक्षापात्र गुन्हा ठरतो.'

म्हणजे असे, कोणताही वैज्ञानिक पुरावा न देता मी ज्ञातातून घडघाळ काढतो म्हणून माझ्याकडे अध्यात्मिक ताकद आहे म्हणून सांगणे आणि वैज्ञानिक पुराव्याशिवाय या गोळीने खोकला वा डोकेदुखी थांबते म्हणणे हे बुवाबाजीचे प्रकार ठरतात. श्रीमंत कंपन्यांनी निर्माण केलेल्या संघटीत बुवाबाजीच्या युगात आम्ही वावरत आहोत! या दोन्ही गोष्टी अखेर फक्त ग्राहकांच्या खिशातील पैसे आपल्या खिशात घालण्यासाठीच वापरल्या जातात.

'व्हिलेज व्हाइस' पुढे म्हणते, येथपर्यंतही एक वेळ ठीक आहे. पण ज्या औषधांच्यामुळे निखालसपणे काही कालावधीने वाईट परिणाम होतात त्यांच्यावर तरी तातडीने बंदी घातली गेली पाहिजे. आणि हे काम खूप कठीण आहे. अपचन व आम्लता यासाठी वापरले जाणारे अमेरिकेतील अल्का सेल्टझर (Alka Seltzer) हे मिल्स लॅबोरेटेरीने (Mills Laboratories) बनविलेले औषध घ्या. याबाबत काही वाईट अहवाल जाऊच नये म्हणून अहवाल समितीचे अध्यक्ष डॉ. चार्लस एडवर्ट यांच्यावर अनेक बरे वाईट दबाव आणण्याचे प्रयत्न झाले असे मुळी 'हाऊस कमिटी ऑन इंटर गव्हर्नमेंट रिलेशन अॅन्ड ह्युमन रिसोर्सेस' यांनी स्पष्टपणे आपल्या अहवालात नमूद केलंय! आणि हे दोन्ही अहवाल बाहेर असूनही ते औषध अजून बाजारात आहेच...आणि अमेरिकेतसुद्धा समर्थ ग्राहक चळवळ उभी राहीपर्यंत हे असेच चालेल. ☐

---

## थिंग्ज् फॉल अपार्ट : पृष्ठ ९ वरून

थिंग्ज् फॉल अपार्ट : पृष्ठ ९ वरून

चिन्वा अॅछेबेंची कादंबरी ही एक मनोज्ञ सुंदर वस्तु आहे. घनदाट आफ्रिकन जंगलातून येणाऱ्या तामसी वायसाप्रमाणे ती खच्चकत वाचकांच्या आतवर घुसून थरथरत राहते. अॅछेबेंनी सांगितलेली कथा भारतीयांना चांगली 'समजण्यासारखी' आहे. कारण 'गोऱ्या' आक्रमणाची भरपूर मेंचट चव आम्ही चाखली आहे. कादंबरीचा वर्ण्य विषय आफ्रिकी आदिवासी असला तरी ती नावे बदलून भारतीय वाटण्याइतकी सच्ची आहे. अॅछेबेंची शैलीही भारतीय वाटण्याइतकी 'भावनापूर्ण' भावडी आहे, पुनरुक्ती, पाल्हाळ, माहिती असलेले सर्व काही वाचकांना सांगण्याचा सोस, विषयांतर —हे सर्व काही असून देखील ती जरूर हृदयस्पर्शी आहे. नवी ख्रिस्ती —गोरी—संस्कृती स्वीकारण्याच्या भरात सारे स्वदेशी तुच्छ वाटू लागले आहे. हे शल्य कादंबरीच्या नायकाइतकेच लेखकाला बोचते. प्रगतीच्या पाणलोटात हे प्राचीन पाषाण शिल्प वाहून जाऊ नये, हे वाटण्यात काय वावगे आहे? पूर्वजांनी जीवापाड जपलेल्या गोष्टी कवडीमोलाने जाताना पाहून ओकोंक्वोच्या डोळ्यातून रक्ताची टीपे गळतात. इंग्रजांच्या 'नव्या' संस्कृतीशी सर्वांनाच व्यवहारी सांधा कुठे जुळविता आला होता? अश्राप आदिम संस्कृतीचा प्रतिनिधी म्हणून ओकोंक्वो 'भुलाये न बने' होऊन वाचकांना झपाटून टाकतो जमातीसाठी माती खाण्यास तयार असलेला ओकोंक्वो या दिखाऊ दिडवितीच्या दुनियेत अखेर एकटा पडतो. नाही तरी स्वार्थत्याग आणि हौतात्म्य या घाऊक प्रमाणावर साधणाऱ्या गोष्टी नाहीतच मुळी. नव्या संस्कृतीचे भन्नाट वादळ आपली कभिन्न छाती थोपवू शकणार नाही याची जाणीव असून देखील ओकोंक्वो खडकासारखा खडतर, कणखरपणे विरोधात उभा राहतो. दोन्ही बाहू उभारून तो स्वजमात बांधवांना अपमानाचा सूड, स्वत्त्वाची जाणीव करून देत राहतो, पण खंत एवढीच की त्याचे ऐकायला कुणाला 'कान' नाहीत. सारे कसे भयचकित आहेत!

एखाद्या सशस्त्र भारतीय क्रांतिकारकासारखा ओकसोंक्वो एकटाच लढतो. जेव्हा क्रांतिचा संदेश वाहण्यासाठी आवतीभोवती कोणीही नसते. तेव्हा आद्यक्रांतिकारकाला स्वतःचा बळी देणे व शत्रूचा बळी घेणे या वाचून पर्याय उरत नाही. 'उठतील या जाळातून भावी क्रांतिचे नेते' ही वेडी आशा उरात बाळगावी लागते त्याला. अशा हुतात्म्याच्या रूपाने समाजात वावरणारा स्वाभिमानाचा, गर्वाचा लसलसणारा लाव्हारस वाळवंटात हरवलेल्या नदीसारखा वायाही जाण्याची शक्यता असते. ओकोंक्वोच्या विवेकाला अति आत्मविश्वासाचे ग्रहण लागले होते, असे म्हणणारे म्हणोत. (ज्युलिअस सिझरलाही तसेच म्हणतात ते!) पण काहीजण हे अतिआत्मविश्वासाचे लेणे घेऊनच जन्माला येतात ना! त्यांना 'हीण' खपत नाही—स्वतःतले, बायकापोरातले, बांधवातले! ओकोंक्वो तसा होता.

सावरकरांचा विनायक १०–१२ वर्षांचा असताना त्या वयाची लक्षावधी बालके भारतात असतील; पण एकटा विनायक 'स्वातंत्र्यासाठी' उशांचे अश्रे भिजवत होता. काही भाग्यवंतांना अशी 'अप्राप्याची'—पिया मिलन की आस लागते. त्यांची चूक नसते, त्यांना घडविणाऱ्या परमेश्वराची 'भूल' आहे ती! ताठ मानेने, जिवंत, स्वतंत्र जगायचे पौरुषपूर्ण व्रत ओकोंक्वोने तारुण्यातच घेतले होते. 'बुद्धयाच सतीचे वाण' घेणाऱ्यांना—लागते जगावे / मरावे त्यांना / हे असे! सरफरोशीकी तमन्ना बाळगणारे कुठल्याही त्यागासाठी सिद्ध असतात. ओकोंक्वोने आत्मबलावर कातीलच्या बाजूतली ताकद अजमाविण्याचा यत्न केला. दुःख एवढेच की कातीलची ताकद ओकोंक्वोपेक्षा वरचढ ठरली!

शेक्सपियरच्या एका टीकाकाराने Romeo & Juliet च्या संदर्भात इंग्लीश भाषेतले 'ओ'—'O' हे अक्षर (व उच्चारही) मोठे ट्रॅजिक असल्याचे म्हटले आहे रोमिओच्या नावात दोन 'ओ' आहेत, तर Okonkwo च्या नावात तीन 'ओ' आहेत. हे तिन्ही 'ओ' कादंबरी संपताना 'गडद'—capital—होतात! ☐

[थिंग्ज् फॉल अपार्ट / चिन्वा अॅछेबे / आफ्रिकन रायटर्स सेरीज / पृष्ठे १८८],

दोन चित्रपट । शिरीष सहस्रबुद्धे

# जवळ ये लाजू नको

## एखाद्याचं नशिब !

कुठल्याही गोष्टीची निर्भेळ आणि दीर्घकाळ भलाई करणं माझ्या, आणि प्रादेशिक चित्रपटांबद्दल आस्था बाळगणाऱ्या अनेक प्रेक्षकांच्या नशिबात नसावं. कारण 'फरारी' या चित्रपटाबद्दल लिहिताना गेल्याच आठवड्यात मराठी चित्रपटसृष्टीला उर्जितावस्था येऊ घातलेली आहे असं दृश्य दिसत असल्याबद्दल मी समाधान व्यक्त केलं होतं. हे दृश्य इतकं शेखमहंमदी असेल आणि त्याच्याबद्दलचं समाधान इतकं क्षणजीवी असेल, हे तेव्हा माझ्या स्वप्नातसुद्धा आलं नव्हतं. गेल्या आठवड्यात 'जवळ ये लाजू नको' नावाचा एक मराठी सिनेमा पाहिला तेव्हा हा भ्रमनिरास घडून आला. एखादा तरी बरा विनोद आत्ता येईल, मग येईल, अशी आशा करीत सिनेमा पाहणं ही सक्तमजुरी किती मनस्ताप देणारी आहे हेही तेव्हा आणि तिथंच लक्षात आलं.

'जवळ ये लाजू नको' ची कथापटकथा रमेश पवार यांची आहे. रमेश पवार हे काहीतरी स्वतंत्र प्रतिभा असलेले लेखक आहेत, असं मी मानतो. असं असताना हा सिनेमा त्यांनी लॉरेल-हार्डीच्या चालीवरहुकूम बेतायचं काही कारण नव्हतं. बरं बेतला तो बेतला, तर त्यांचे यापेक्षा बरे सिनेमे नाहीत का ? पण पवारांची कल्पनाशक्ती तोकडी पडली म्हणा, किंवा निर्मातेदिग्दर्शकांचे हस्तक्षेप वाढले म्हणून म्हणा, पडद्यावर दिसतात ते दोघा उडाणटप्पूचे अस्ताव्यस्त व असंबद्ध चुटके; ज्यात हशे वसूल करायचं मोठं काम करतात ती बबन प्रभू आणि अशोक सराफची व्यक्तिमत्वं.

जाडद्या-रडद्याच्याच धर्तीवर बाज्या आणि गजा (अशोक सराफ व बबन प्रभू) या दोन व्यक्तिरेखा 'जवळ ये...' मध्ये भेटतात. रमेश पवार यांचीच 'म्हॅऽऽ' नामक एक एकांकिका अलिकडेच बऱ्यापैकी प्रकाशात आली आहे, ती बहुधा या चित्रपटाच्या कथापटकथेचे संक्षिप्त रूप असावी, इतके साम्य गजा-बाज्या व 'म्हॅऽऽ' मधील चेंट्या व मेंटया यांच्यात आहे. 'म्हॅऽऽ' प्रमाणे विशुद्ध हास्यपटाच्या अंगाने 'जवळ ये...' चा प्रवास झाला असता तर कदाचित तो कितीतरी सुखावह झाला असता असं वाटतं. पण नाही. पवार यांनी बाज्यावर लट्टू होणारी एक तमासगीर नर्तिका (उषा नाईक) आणि काळे धंदे करणारी एक टोळी ही दोन लचांड अर्धवट गंभीरपणाने कथेत घुसडून सगळा परिणाम पातळ करून टाकला आहे. त्यात पुन्हा विनोदी अभिनेत्यासाठी भूमिका 'पाडायची' प्रवृत्ती नडली. एरवी मा. भगवान यांचा हॉटेलवाला आणि गणपत पाटलांची 'पेटंट' भूमिका या दोहोंचा कथानकाशी कितपत सुसंगत धागा जुळतो? मा. भगवानची अदाकारी (बहुधा) त्यांच्या वयोमानाप्रमाणंच दुबळी झाली आहे; आणि गणपत पाटलांचा विनोद आम्ही तोचतोचपणाची किळस येईपर्यंत पाहिलाच पाहिजे का ? हीच गोष्ट थोड्याफार फरकानं बबन प्रभू व अशोक सराफ यांची. दोघांचाही भर वेडेवाकडे चेहरे आणि अंगविक्षेप यांच्यावरच अधिक आहे, एरवीपेक्षा वेगळं आणि चांगलं असं काहीही दोघांनी केलेलं नाही, संपूर्ण चित्रभर पसरलेली त्यांची धावपळ-पळापळ, पुढेपुढे बोअर होते. नाही म्हणायला संयम राखून सादर केलेल्या एखाददुसऱ्या दृश्य/प्रसंगातच दोघांची कामगिरी बरी वाटते. उदाहरणार्थ चित्रपटाची अगदी सुरुवातीची काही दृश्यं. त्यामानानं बाज्यावर फिदा होणाऱ्या तमासगीर नर्तिकेची भूमिका उषा नाईकनं पुरेशा तयारीनं आणि ठसक्यानं वठवलीय. या कृष्णधवल चित्रपटात ती दिसली आहेही आकर्षक.

तर हा चित्रपट म्हणजे लहानमोठ्या विनोदी प्रसंगांची किंवा किश्श्यांची एक मालिकाच आहे. यातले तुरळक किस्से बरे असले तरी अनेक ठिकाणी लेखक / दिग्दर्शकाच्या हेतूबद्दल शंका उत्पन्न होते, म्हणजे असं, की या किश्श्यातून विनोदापलिकडे लेखकाला काही सांगायचं होतं का, अशी नुसतीच शंका येऊन जाते. उदाहरणार्थ गजा-बाज्या जे द्वंद्वगीत म्हणतात ( 'तुझी-माझी दोस्ती' ) ती स्वतंत्र विनोदी रचना आहे, की शोलेमधल्या 'ये दोस्ती...' सारख्या गाण्यांचं विडंबन ? किंवा गुंड टोळक्याचा अड्डा दाखवितानाही, तिथले आचरट प्रकार गंभीरपणे स्वीकारावेत अशी अपेक्षा आहे, की हिंदी चित्रपटातल्या अलिकडच्या स्मगलर्सच्या चित्रणाचं ते विडंबन आहे ? अर्थात यातला कुठलाच पर्याय पुरेसा प्रभावीपणे पेश केलेला दिसत नाही ते वेगळंच. बरेचसे किस्से जुनाट, बोअर करणारेच आहेत.

दिग्दर्शक अरुण कर्नाटकी यांचा हा दिग्दर्शनक्षेत्रातला पहिलाच प्रयत्न आहे, या एकाच मुद्द्यावर त्यांना काही सवलत दिली तर, एरवी त्यांचं दिग्दर्शन अत्यंत सामान्य प्रतीचं आहे. साधी गोष्ट म्हणजे चित्रातल्या क्रिकेट मॅचच्या वेळी म्हटलं जाणारं गाणं आणि उषा नाईकच्या ओठांच्या हालचाली यात तसूभरही साम्य आढळत नाही. हे काय चित्रीकरण की थट्टा ? संगीतकार दत्ता डावजकर यांना तर त्याही मुद्द्यावर माफी देता येणार नाही; इतकं त्यांचं संगीत गचाळ गोंगाटी आणि अभिरुचीशून्य आहे.

चित्रपटाचं नाव आणि चित्रपट यांचा खरं तर काहीचाही संबंध नाही. ' जवळ ये लाजू नको ' हे उषा नाईकला उद्देशून असलं तर आता ते निरुपयोगी आहे, कारण ती लाजतबिचकत असल्याचं कुठंच दिसत नाही. म्हणूनच की काय, चित्राच्या शेवटी तो प्रकार फलम केल्यासारखा उरकून घेतला आहे. असा एकंदरीतच चित्राचा उरकलेला नूर पाहून वाटलं की रविवारची संध्याकाळ कुणी कशी घालवावी याला काही नियम नाही. काही भाग्यवान मंडळी ती भल्याबुऱ्या प्रकारे एन्जॉय करीत असतीलही. पण त्यावेळी ' जवळ ये लाजू नको ' नावाचा फसलेला, केविलवाणा विनोदी असा चित्रपट पहावा लागणं हे मात्र एखाद्याचंच नशीब म्हटलं पाहिजे, दुसरं काय ? *

## मेरा वचन, गीता की कसम

नाव मोठं . . . !

प्रदीर्घकाळ रेंगाळलेल्या या डाकूजीवनावरच्या चित्रपटानं अखेर पडदा पाहिला खरा, पण आपल्याला हा पडद्यावर पाहणं काही फारसं सुखावह नाही. पहिल्याच आठवड्यात चित्रपटाची बॉक्सऑफिसरवर झालेली दुर्दशा पाहिली म्हणजे डाकूंच्या विषयाचं माहात्म्य किंवा आकर्षणशक्ती संपत आल्याचा अंदाज बांधता येतो. त्यातून बराच काळ निर्मितीअवस्थेत राहिल्याच्या खुणा चित्रात लपत नाहीत आणि संजय-सायराबानू हीसुद्धा काही फारशी इच्छित-अपेक्षित जोडी नव्हे. अशा काही कारणांमुळे भलं अगडबंब नाव असलेल्या या चित्राचं पानिपत झालेलं दिसतं खरं !

'मेरा वचन...' मधली डाकूगिरी मध्यंतरापर्यंतच संपते. डाकू हरीसिंग (संजय) आणि त्याचा लहानपणापासूनचा पालक आणि चाचा डाकू यारखाँ (ओमप्रकाश) एका चकमकीतल्या पराभवानंतर डकैती सोडून शरीफ बनतात. हरीसिंगची प्रेयसी चंपा (सायरा) हिच्यावर त्याचा सहकारी डाकू मंगलसिंह अत्याचार करतो, त्यामुळे ती आत्महत्येचा प्रयत्न करून बेपत्ता होते. दरोड्यात सापडलेल्या एका छोट्या अनाथ मुसलमान मुलीला (सुलताना–नाजिमा) हरीसिंग दिल्या वचनाखातर प्रेमानं वाढवतो. तिच्याचसाठी तो रहिमखान असं नावही लावतो. तिच्या शादीची वेळ येताच मंगल येऊन टपकतो. मग ब्लॅकमेलिंग, झटापट वगैरे. अखेर मंगलला सुडासाठी ठार करून आणि येता येता मांजराला लाथ घालावी त्याप्रमाणे एक वाघ मारून रहिमसाहेब अल्लाघरी जातात. चंपा त्यांना भेटते पण आयुष्याला विटून ती जोगीण बनलेली असते; अखेरीस रहिमचे दफनाऐवजी दहन, सुलतानाचं लग्न, चंपाचा संन्यास आणि यारखाँ गिरफ्तार वगैरे.

लेखक-दिग्दर्शक विनोदकुमार यांचा मला जाणवलेला एक मोठा विशेष हा प्रामाणिकपणा. चित्राची शोकांतिका करताना ते कचरलेले नाहीत. एरवी आधीच्या अनुभवामुळे, शेवटपर्यंत काहीतरी चमत्कार घडून सर्व गोड होईल अशा धास्तीत मी होतो. या प्रामाणिकपणापोटीच मध्यंतरानंतर कथा पुढे नेण्यासाठी कथानकाचा प्रवाह संथ व actionless होऊ देण्याचा धोका त्यांनी पत्करलेला दिसतो. खलनायकाचं जादुई हृदयपरिवर्तन होत नाही हेही विशेषच. अर्थात मजदूर रहिमचा झटपट रईस रहिमखान होण्यासारखे अविश्वसनीय चमत्कारही चित्रपटात अगदीच नाहीत असं नाही.

डाकूची भूमिका आणि संजय यांचं कोष्टक कष्टानंच जुळणारं असलं. तरी संजयनं ती उभी करण्याचा प्रयत्न मनःपूर्वक केल्याचं जाणवतं. सायरा अलीकडच्या काही चित्रांपेक्षा बरीच सह्य दिसलीय आणि तिचं कामही बरंच सुसह्य आहे. नाजिमा आणि अजित-ओमप्रकाश ठीक. जॉनी वॉकर असह्य. छायाचित्रण बरंच समाधान देणारं आहे. शंकर-जयकिशनचं एक भजन त्यांच्या खानदानी संगीताची याद देणारे आहे. तर ' प्यार किया नहीं जाता ' व ' अच्छा लगता है ये भीला ' पूर्वीच लोकप्रिय होऊन गेलेली आहेत. □

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य
या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

। मॅक्झिम गॉर्की ।

। सुमती देवस्थळे ।

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ । पुणे ४११ ०३०

# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**२२।१।७७ ते २८।१।७७**

## काँग्रेस व विरोधी पक्ष यांच्यातील अंतर कमी होऊ लागेल

पंतप्रधान इंदिरा गांधी मकर राशीच्या आहेत. त्यांच्या राशीतच सध्या रवी आहे व मंगळ जरी बारावा असला तरी तो मकर या राशीला वाईट फळे देत नाही. हे ग्रहांचे एकंदर वातावरण लक्षात घेतले तर विरोधी पक्षांकडून स्वत: इंदिरा गांधी जे अपेक्षित आहेत ती अपेक्षा विरोधी पक्षांकडून यावेळी बऱ्याच प्रमाणात पुरी होण्याची प्रक्रिया सुरू होईल, अशारितीने त्यामुळे सत्तारूढ पक्ष स्वत: पंतप्रधान व विरोधी पक्ष यांच्यातील अंतर कमी होऊ लागेल अशी चिन्हे दिसू लागतील. स्थानबद्धतेत असलेले नेते विचारमंथन करू लागतील. आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिका भारताच्या अधिक अनुकूल वर्तन करू लागेल. विज्ञान व इतर क्षेत्रात भारताच्या संशोधनाचा वेग वाढेल. समृद्धीचा उच्चांक काही बाबतीत गाठला जाईल.

**मेष : उद्योगात वाढ**

आज लाभस्थानी चंद्र असून रवी दहावा व शुक्र बारावा आहे. बुध शुक्राचा केंद्रयोग आहे. तो एरवी तसा वाईट नाही. परंतु एखाद्या मुलीच्या ठिकाणी मन गुंतले जाणे शक्य असून त्यामुळे थोडाफार तोटा होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. दहावा रवी व भाग्यस्थानी असलेले मंगळ तुम्हाला काही कमी पडू देणार नाही. चिंता अगर काळजी करण्याचे कारण नाही. तुम्हापैकी जे कुणी विवाहाचा प्रयत्न करीत असतील ते संसारात गुंतले जातील. तसेच स्थावरासंबंधीचा वाद अगर तंटा मिटून नवे पर्व सुरू होईल. आर्थिक बाजू सुधारेल. नोकरीत प्रमोशन, बदली असे काहीतरी घडेल. नको त्या ठिकाणी बदली झाली असेल तर ती रद्द होईल. शुभ दिनांक २२, २५.

**महिलांना :** संसाराच्या दृष्टीने उपयुक्त असा हा आठवडा आहे. नोकरीत यश मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** व्यसनाच्या आहारी जाऊ नका. एरवी शुभकारक आहे.

**वृषभ : प्रगतीला पोषक**

गुरु व केतू बारावा आहे. त्यामुळे तुम्हाला अत्यंत कौशल्याने पाऊले टाकावी लागतील. परंतु एवढे प्रतिकूल सोडल्यास हा आठवडा अतिशय उत्तम जाईल. प्रामुख्याने तुमची जी अनेक बाबतीत कोंडी होत होती ती सुटणार आहे. दहावा चंद्र व भाग्यस्थानी रवी हे तुमची सारी स्वप्ने साकार करण्यासाठी उत्सुक आहेत. अनेक बाबतीत गाडी प्रगतीची क्षितीजे पहाणार आहे. तुमचा कोणताही व्यवसाय असो. त्यातील अडचणी दूर होण्याची प्रक्रिया घडून येणार आहे. विवाहाचा बेत लांबणीवर टाकणे योग्य होईल. करारमदार मात्र यशस्वी होतील. नोकरीतील अडचणी कमी होतील. वरिष्ठाबरोबर जिव्हाळ्याचे संबंध होतील. अनेक मागण्या दृष्टिपथात येतील. शुभ दिनांक २३, २७.

**महिलांना :** अनपेक्षित लोकप्रियता मिळेल. सोने खरेदी करता येईल.

**विद्यार्थ्यांना :** कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. यश मिळेल.

**मिथुन : स्वास्थ्य मिळेल**

अकरावा गुरू, दुसरा शनी, सातवा मंगळ व आठवा रवी अशी ग्रहरचना यावेळी आहे. आठवा रवी जरी तब्बेतीच्या दृष्टीने तेवढासा अनुकूल नसला तरी तो आर्थिक बाजू भक्कम करायला मदत करील. स्थावराचा प्रश्न सुटेल. ज्याच्या त्याच्या परिस्थितीप्रमाणे नवे वाहन खरेदी करण्यास अनुकूलता आहे. आर्थिक बाजू श्रमापेक्षा अनपेक्षित अर्थलाभाने भरून येण्याची शक्यता आहे. रेस-लॉटरीपासून लाभ संभवतो. लेखकांना हा आठवडा लोकप्रियता मिळवून देणार आहे. नोकरीच्या दृष्टीने फार मोठ्या उलाढाली घडणार नाहीत. वरिष्ठांकडे आपले प्रश्न मांडून ते सोडवून घेऊ शकाल. बेकारांना आता फार दिवस वणवण करावे लागणार नाही. शुभ दिनांक २३, २४.

**महिलांना :** घरगुती धंदा तेजीत चालेल.

**विद्यार्थ्यांना :** लेखकाचा सहवास लाभेल.

**कर्क : अडचणींवर मात**

रवी-शनीचा प्रतियोग आहे. त्यामुळे कोणत्याच कामात फार श्रम केल्याशिवाय यश पदरात पडणार नाही. कोणतेच काम सहज सुलभ होणे नाही. आठवडा मात्र अडचणीतून मार्ग काढणारा आहे. कोर्टकचेरीत बरेच रेंगाळत पडलेले प्रश्न निकालात निघतील. स्वतंत्र धंदा सुरू करण्यासाठी जे सहाय्य हवे ते मिळू शकेल. लघुउद्योगाच्या स्वरूपाचा एखादा धंदा यावेळी सुरू करता येईल. कौटुंबिक स्वास्थ्य मिळेल. चालू धंदा विशेषत: व्यापार जोरात चालेल. आजवरचा तोटा भरून निघेल. बेकारांना नोकरी मिळू शकेल. त्यांनी यावेळी प्रयत्न करावा. रेसमध्ये लाभ होण्याची शक्यता आहे. नोकरीत वरचष्मा राहील. शुभ दिनांक २४-२६.

**महिलांना :** सार्वजनिक कार्यात किंवा मंगलकार्यात पुढारीपण मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** बुद्धीचा तल्लखपणा वाढेल.

**सिंह : आता सारे ठीक**

आज कुंभ राशीत चंद्र असताना या आठवड्याची सुरुवात होत आहे. कौटुंबिक व संसारी जीवनात अनुकूल घटना घडणार आहे. प्रेम व आपुलकी वृद्धिंगत होणार आहे. तुमच्यापैकी ज्यांचे विवाह ठरावयास वेळ लागत आहे त्यांचे विवाह यावेळी ठरतील. कित्येकांचे नवे संसार सुरू होतील. चालू आठवडा तसा सारे ठीक करणारा आहे. रवी मकर राशीत ही तुमच्या दृष्टीने एक योग्य अशीच गोष्ट होय. विरोधक आता शरण येणार आहेत. त्यांची चूक ते कबूल करतील. पश्चातापाने लीन होतील. चालू नोकरीत सारे व्यवस्थित चालेल. काम जास्त करावे लागेल. नवीन जबाबदारी उचलावी लागेल. बेकारांना धंद्यांच्या दृष्टीने अधिक अनुकूल आहे. राजकारणात सरशी राहील. शुभ दिनांक २४-२५.

**महिलांना :** हाती घेतलेले काम व्यवस्थित पार पडेल. मानसन्मान मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** एखादी शिष्यवृत्ती मिळ शकेल.

**कन्या : वरचष्मा राहील**

तुमच्या यशाच्या नाड्या आता केवळ रवी या एकाच ग्रहाच्या हाती आहेत. मंगळ चौथा असून काही काळ राहणार आहे. तो मानसिक स्थिती कायम ठेवण्याचा प्रयत्न करणार आहे. प्रत्यक्षात तसे काहीच घडणार

नाही. परंतु भीतीचे दडपण ठेवील त्यावर कुलदेवतेची उपासना हा उत्तम मार्ग होय. रवी मात्र अनुकूल आहे. तो नोकरीत वरचष्मा ठेवील. विरोधक समंजसपणाने वागतील. कार्यक्षमता वाढती राहील. हाती घ्याल ते तडीस नेण्याचे कार्य तुमच्या हातून पार पडेल. सामाजिक क्षेत्रात व राजकारणात प्रतिष्ठा वाढेल. मानाचे योग येतील. जुने येणे वसूल होईल. वरिष्ठांबरोबर प्रेमाचे संबंध राहतील. शुभ दिनांक २४–२७.

**महिलांना :** तब्येत सुधारेल. संसारात गोडवा राहील.

**विद्यार्थ्यांना :** वाङ्मयाचा अभ्यास करा. यश मिळेल.

**तूळ : अनुकूल वातावरण**

तुमच्या मनात जर नवे काही करावयाचे असेल तर त्याला हा आठवडा फारच अनुकूल आहे. तुमची जागेची, बंगल्याची किंवा शेतजमिनीची इच्छा पुरी होईल. त्यासाठी कोर्टकचेरी करावी लागणार नाही. कौटुंबिक व संसारी प्रश्न सलोख्याने मिटतील. फार दिवस रेंगाळत राहिलेली कामे पुरी होतील. आर्थिक स्थिती समाधानकारक राहील. चार पैसे हाती खेळतील. रेस, लॉटरीत लाभ होईल. तुमचा व्यापार तेजीत चालेल. विशेषतः कापडव्यापार जोरात चालेल. तुम्ही स्वतः एखादा धंदा सुरू करू शकाल. त्यासाठी भांडवल व तांत्रिक मदत मिळेल. चालू नोकरीत सारे ठीक व अनुकूल असे वातावरण राहील. वरिष्ठांची मर्जी राहील. शुभ दिनांक २२–२५.

**महिलांना :** विवाहेच्छू तरुणींचे विवाह ठरतील.

**विद्यार्थ्यांना :** प्रेमात यश व प्रगती.

**वृश्चिक : नव्या क्षेत्रात वाव**

दुसरा मंगळ व तिसरा रवी हेच आजच्या घटकेला तुमचे खरे मित्र आहेत. त्यामुळे तुमचे कर्तृत्व नव्या क्षेत्रात उदयाला येण्यासाठी तुम्ही जे प्रयत्न कराल त्याला मोठे यश मिळणार आहे. धंदा असो की नोकरी असो, तुम्हाला नवे क्षेत्र उपलब्ध होईल. तुमच्या गुणांना वाव मिळेल. नोकरी बदलायची असेल तर हरकत नाही. नोकरीत बदली हवी असेल तर ती होऊ शकेल. यावेळी वरिष्ठांकडे तुमचे वजन राहील. वरिष्ठांकडून गुणांची कदर केली जाईल. व्यापारी वर्गाने जपून पावले टाकावीत. प्रामुख्याने रासायनिक खते, औषधे, खाद्य तेले, शेतीचे धान्य यांचा व्यापार कायद्याच्या व नियमाच्या कक्षेत राहूनच करा. कोणास जामीन राहू नये व मोठे वायदे करू नये. आरोग्याची थोडीफार कटकट चालू राहील. पण काळजी नसावी. शुभ दिनांक २४–२६.

**महिलांना :** भांडणाचे प्रसंग टाळा. नोकरीत बदली होईल.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासात हुषारी दिसेल. तेज प्रभाव पडेल.

**धनू : संसारात मतभेद नकोत**

राशीत मंगळ व दुसरा रवी हे कौटुंबिक संबंधात थोडेफार बिघाड निर्माण करण्याचे काम यावेळी करणार आहेत. तुम्ही काळजीपूर्वक व कौशल्याने तसेच दुसऱ्यांच्या भावनेचा विचार करून वागणे आवश्यक आहे. विशेषतः पत्नी ही आपल्या संसाराची देवता आहे, हे पक्के लक्षात ठेवून वागा. कारण तुमच्या राशीतच सध्या जो मंगळ आहे तो तुमच्या अंगात अहंकार निर्माण करणार आहे. त्यामुळे क्षुल्लक क्षुल्लक गोष्टीतसुद्धा तुम्ही पत्नीबरोबर हुकूमशाही पद्धतीने वागणार आहात. ते टाळा. आर्थिक परिस्थिती सुधारेल. लॉटरीत लाभ होईल. मूळचे ग्रह जर उच्चीचे असतील तर धनलाभ होईल. नोकरीच्या दृष्टीने प्रतिकूल असे काही नाही. आरोग्य उत्तम राहील. शुभ दिनांक २३–२५.

**महिलांना :** संसारात जुळवून घेण्याची वृत्ती ठेवा.

**विद्यार्थ्यांना :** स्पर्धेत मोठे यश मिळेल.

**मकर : सहानुभूती हवी**

राशीत रवी आल्यापासून खरे तर तुमचे सामर्थ्य वाढले आहे. तुमचे तंत्र बदलले आहे. शब्द व कर्तृत्व याच्या सामर्थ्याचा प्रत्यय तुम्ही सर्वच क्षेत्रात आणून देत आहात. परंतु रवी–शनी प्रतियोग व शनी–मंगळ षडाष्टक योग तुम्हाला अजून काही काळ सावध राहायचा इशारा देत आहेत. याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कर्ज व पैशाचे संबंध याचे सर्व व्यवहार अत्यंत काळजीपूर्वक करावयास हवेत. व्यापारी क्षेत्रात वायदा कटाक्षाने पाळायला हवा. लोकांबरोबर सहकार्याची वृत्ती ठेवावयास हवी. देणेकरी त्रास देतील. एखादा अकस्मात खर्च उद्भवू शकेल. नोकरीत तुमच्या योजना वा खर्च टीकेचा विषय होईल. वरिष्ठांची मर्जी सफा होण्याची शक्यता आहे. निकटच्या संबंधात कटुतेचे विष निर्माण होऊ शकेल. शुभ दिनांक २३–२६.

**महिलांना :** उष्णतेचे विकार होऊ शकतील. काळजी घ्या.

**विद्यार्थ्यांना :** गाठीभेटी यशस्वी होतील.

**कुंभ : यश जवळ येत आहे**

एक रवी बारावा आहे. तुमची राजकारणातदेखील बुद्धी चालते. त्याबाबतीत थोडेफार अडचणीचे वातावरण वाटत असले तरीदेखील तुमच्या प्रगतीची गाडी आता अत्यंत महत्त्वाच्या वळणावर आलेली असून तुमच्या अपेक्षापूर्तीचा काळ जवळ आला आहे. तुमच्या महत्त्वाकांक्षा सफल होण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. तुम्ही ज्या क्षेत्रात काम करीत आहात ते क्षेत्र तुमच्या मानासाठी सज्ज आहे. नोकरीची परिस्थिती समाधानकारक राहील. ज्यांच्याकडे 'तपासणी' हा विभाग आहे त्यांनी अत्यंत दक्ष राहण्याची मात्र गरज आहे. नियमांच्या बाहेर पैसा मिळवण्याचा मोह कटाक्षाने टाळावयास हवा. प्रमोशन, बढती गुणांवर मिळणार असून गुणांचे चीज होणार आहे. प्रवास सुखकारक होईल. व्यापारात ठरलेले वायदे अचूक ठरतील. रेसमध्ये लाभ होईल. शुभ दिनांक २४–२७.

**महिलांना :** मुलांच्या कौतुकाचा आनंद मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** बुद्धीचे तेज मोठा प्रभाव पाडील.

**मीन : पैसा भरपूर मिळेल**

राशीस्वामी गुरू धनस्थानी, रवी अकरावा, मंगळ दहावा. हे सारे ग्रह तुमच्यावर अतिशय खूष आहेत. त्याचा प्रत्यय अनेक क्षेत्रांत येणार आहे. तुम्ही व्यापारी असाल तर नफ्याचे प्रमाण वाढणार आहे. शेअर्समध्ये गुंतवणूक करा. बँकेची शिल्लक वाढेल. लॉटरी–रेसमध्ये लाभ होईल. नवा उद्योग सुरू करता येईल. नोकरीत सर्व अपेक्षा पुऱ्या होतील. बदली तहकूब होईल. अनेक दिवस रेंगाळलेले हक्काचे प्रश्न मार्गी लागतील. प्रमोशन व बढती मिळेल. वरिष्ठांची मर्जी राहील. खासगी क्षेत्रात मालक खूष राहतील. तुम्ही प्रकाशक असाल तर तुमचे प्रकाशन यशस्वी होईल. प्रसिद्धीचा प्रकाश दिसेल. तुम्ही लेखक असाल तर तुमचे लेखन लोकप्रिय होईल. एखाद्या नव्या कलाकृतीची सुरुवात होईल. शुभ दिनांक २४–२६.

**महिलांना :** संसारात सुख व आरोग्य लाभेल.

**विद्यार्थ्यांना :** हुशारीचे कौतुक होईल. □